संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने १२ (६+६) | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शुक्रवार दि. ३०.१०.२०२६ | अंक नं. १७९ | वर्ष ६१ वे | दैनिक वर्ष ६३ वे | ANR/022/2018-2020

आधारवड हरपला

भाऊ..

।। भावपूर्ण श्रध्दांजली ।।

: दु:खांकित :

स्वानंदी उद्योग समूह,अहिल्यानगर

दशक्रिया विधी

सोमवार दि.०२/११/२०२६ रोजी सकाळी ८.३० वाजता

स्थळ : कोतकर मळा, एकनाथ नगर, केडगाव (देवी),अहिल्यानगर

संस्थापक के. आचार्य गुंदेचा

नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने १२ (६+६) | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शुक्रवार दि. ३०.१०.२०२६ | अंक नं. १७९ | वर्ष ६९ वे | दैनिक वर्ष ६३ वे | ANR/022/2018-2020



जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

मेंटेनन्सच्या वादातून सोसायटीतील रहिवाशावर लाकडी दांडक्याने जीवघेणा हल्ला

नगर - शहरातील गुलमोहर रोडवरील क्रिस्टल टॉवर शिलाविहार परिसरात मेंटेनन्सच्या वादातून एका रहिवाशावर लाकडी दांडक्याने प्राणघातक हल्ला करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत रामेश्वर उध्दव शिरसाठ (वय ४२, रा. क्रिस्टल टॉवर, शिलाविहार, गुलमोहर रोड, सावेडी, अहिल्यानगर) यांनी फिर्याद दिली आहे. तर विजय नामदेव माने (रा. क्रिस्टल टॉवर, शिलाविहार, गुलमोहर रोड, सावेडी, अहिल्यानगर) असे गुन्हा दाखल झालेल्या आरोपीचे नाव आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी रामेश्वर शिरसाठ हे आपल्या मुलीसह सोसायटीच्या पार्किंगमध्ये उभे असताना हा प्रकार घडला. आरोपी विजय नामदेव माने हा अचानक फिर्यादीच्या पाठीमागून आला आणि त्याने विनाकारण वाद घालण्यास सुरुवात केली. तुला दाखवतोच, तू खूप जास्त शहाणा झाला आहेस, मला मेंटेनन्स मागतो का? असे म्हणून आरोपीने फिर्यादीस शिवीगाळ केली. संतापलेल्या आरोपीने फिर्यादीला लाथाबुक्क्यांनी मारहाण करत हातातील लाकडी दांडक्याने कमरेवर वार करून गंभीर जखमी केले. या झटापटीदरम्यान फिर्यादीच्या गळ्यातील दोन तोळे वजनाची सोन्याची चेन खाली पडून गहाळ झाल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. घटनेची माहिती मिळताच तोफखाना पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक परशुराम दळवी यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. या मारहाणीत जखमी झालेल्या फिर्यादीवर शहरातील खाजगी रुग्णालयात उपचार करण्यात आले.याप्रकरणी तोफखाना पोलिसांनी गुन्हा नोंदवला असून पुढील तपास सुरू आहे.

'अन्नधान्य वितरण अधिकारी कार्यालयामध्ये' खाजगी व्यक्तींकडून शासकीय आयडीचा वापर

कारवाई न झाल्यास विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी यांच्याविरोधात न्यायालयात जाण्याचा इशारा

नगर - नगर शहरातील अन्नधान्य वितरण शहर पुरवठा अधिकारी कार्यालयात शहर पुरवठा अधिकारी यांनी आपल्या अधिकाराचा व पदाचा दुरपयोग करत शासकीय कार्यालयात अनाधिकाराने दोन खाजगी संगणक चालकांची नियुक्ती केलेली असून शासकीय कार्यालयातील क्यूआर कोड, पासवर्ड, युजर आयडी व महत्वाच्या सर्व गोपनीय फाईल त्यांच्या ताब्यात देण्यात आलेल्या आहेत. हा अत्यंत गंभीर प्रकार असून याबाबत विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांचे दीड वर्षापासून लक्ष वेधूनही त्यांनी या तक्रारीची अद्याप दखल घेतलेली नाही. संबंधित दोषी अधिकाऱ्यावर तातडीने गुन्हा दाखल करून कारवाई न केल्यास विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांच्याविरोधात न्यायालयात जाण्याचा इशारा तक्रारदार रविंद्र वाबळे यांनी निवेदनाव्दारे दिला आहे.

निवेदनात म्हटले आहे की, खाजगी नेमलेल्या सदर दोन व्यक्ती या कार्यालयात अद्यापही कार्यरत आहेत. वास्तविक शासकीय कार्यालयामध्ये शासकीय व सार्वजनिक कामाची कोणतीही माहिती गोपनिय ठेवावी लागते. ती संबंधित शासकीय अधिकाऱ्यांकडेच असावी लागते. त्याचा वापर खाजगी व्यक्ती कींवा दुसऱ्या शासकीय कर्मचाऱ्यानेही करायचा नसतो. असे असतानाही संबंधित अधिकाऱ्याने आपल्या पदाचा व अधिकाराचा दुरुपयोग करत खाजगी व्यक्तींना हे अधिकार दिले आहेत.

दोषी अधिकाऱ्याला पाठिशी घालू नका

याबाबत नगरच्या जिल्हाधिकाऱ्यांकडे ७ मार्च व २५ एप्रिल २०२५ रोजी असे दोनदा व नाशिकच्या विभागीय आयुक्तांकडे ७ मे रोजी समक्ष भेटून सर्व पुरावे सादर केलेले असतानाही या दोन्ही जबाबदार अधिकाऱ्यांकडून या प्रकरणाची कोणतीही दखल घेतली गेली नाही. याचा अर्थ आपण या अधिकाऱ्यास पाठिशी घालत आहात असा निघतो. त्यामुळे आपल्या विरोधात न्यायालयाचे दरवाजे ठोठावे लागणार आहेत, असा इशारा वाबळे यांनी दिला आहे.

सात दिवसांत कारवाई करा

जिल्हा पुरवठा अधिकारी यांनाही याबाबत निवेदन देऊन सदर अधिकाऱ्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आलेली आहे. या प्रकरणात सात दिवसांत योग्य कारवाई न झाल्यास जिल्हा पोलिस अधिक्षकांकडे गुन्हा दाखल करण्याची मागणी केली जाणार आहे. तसेच या प्रकरणात जर आम्ही खोटी माहिती देत आहोत, असे निदर्शनास आल्यास आमच्यावरही कारवाई करावी, असे वाबळे यांनी निवेदनात म्हटले आहे.

खाजगी कर्मचारी नियुक्त नसल्याचा दावा

तक्रारदार रविंद्र वाबळे यांनी ३१ जानेवारी २०२५ रोजी माहितीच्या अधिकारात अन्नधान्य वितरण शहर पुरवठा अधिकारी कार्यालयात १ जानेवारी २०१९ ते ३१ जानेवारी २०२५ या कालावधीत नियुक्त केलेल्या वा असलेल्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांची माहिती मागविली असता या कार्यालयाकडून वाबळे यांना २० फेब्रुवारी २०२५ रोजी जी लेखी माहिती देण्यात आलेली आहे. यात शासन नियुक्त सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांची माहिती देण्यात आली आहे. परंतु कोणतेही खाजगी कर्मचारी नेमलेले नसून त्यांना कोणतेही मानधन वा वेतन दिले जात नसल्याचे म्हटले आहे. परंतु याला साबळे यांनी तीव्र आक्षेप घेताना असे खाजगी कर्मचारी कार्यरत असल्याचा दावा करताना मागील पंधरा दिवसांतील कार्यालयातील सीसीटीव्ही फुटेज पाहिल्यास वस्तुस्थिति समोर येईल असे म्हटले आहे. त्यासोबतच हे सीसीटीव्ही फुटेज नष्ट करण्याची शक्यता नाकारता येत नाही अशी भिती वाबळे यांनी व्यक्त केली आहे.

व्यावसायिक ठिकाणी घरगुती गॅसचा उघडपणे गैरवापर; शासनाचे आदेश कागदावरच, पुरवठा विभागाचे दुर्लक्ष

नगर - मंगल कार्यालये, लॉन, हॉल्स आणि केटरिंग सेवांच्या ठिकाणी होणारा घरगुती गॅस सिलेंडरचा बेकायदेशीर वापर रोखण्यासाठी राज्य शासनाच्या अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने कडक निर्देश जारी केले होते. व्यावसायिक ठिकाणी येथे केवळ व्यावसायिक गॅस सिलेंडरचाच वापर केला जाईल; घरगुती गॅसचा वापर करणे कायद्याने गुन्हा आहे असा दर्शनी भागात फलक लावणे अनिवार्य करण्यात आले होते. मात्र, शासनाचे हे स्पष्ट आदेश येऊनही स्थानिक पातळीवर जिल्हा पुरवठा अधिकारी आणि अन्नधान्य पुरवठा अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे या निर्णयाची पायमल्ली होत असल्याचे चित्र समोर येत आहे.

ग्राहक दक्षता कल्याण फाउंडेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन सोळंके यांच्या मागणीनंतर सहसचिव अशोक आत्राम यांनी राज्यातील सर्व जिल्हाधिकारी व पुरवठा अधिकाऱ्यांना तात्काळ अंमलबजावणीचे आदेश दिले होते. परंतु, प्रत्यक्षात स्थानिक प्रशासनाने याकडे पूर्णपणे पाठ फिरवली आहे.

शहरातील एकाही प्रमुख हॉटेल, मंगल कार्यालय किंवा लॉनवर नियमानुसार व्यावसायिक गॅस वापराचा अनिवार्य फलक अद्याप लावण्यात आलेला नाही. दरमहा ५ तारखेपर्यंत गॅस एजन्सी आणि व्यावसायिक ठिकाणांची तपासणी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश असताना, स्थानिक स्तरावर कोणतीही ठोस तपासणी मोहीम राबवली गेलेली नाही.नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर दंडात्मक अथवा कायदेशीर कारवाई करण्याऐवजी पुरवठा विभागाचे अधिकारी डोळेझाक करत आहेत.

तपासणीत कसूर करणाऱ्या अधिकाऱ्यांवर 'महाराष्ट्र नागरी सेवा नियमानुसार' शिस्तभंगाची कारवाई करण्याचा इशारा शासनाने दिला होता, मात्र तरीही स्थानिक अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीत काहीही फरक पडलेला नाही. व्यावसायिक ठिकाणी घरगुती गॅसचा वापर करणे ही केवळ कायद्याची पायमल्ली नसून सार्वजनिक सुरक्षेच्या दृष्टीने मोठा धोका आहे. शासनाने अत्यंत गांभीर्याने घेतलेल्या या निर्णयाची स्थानिक जिल्हा पुरवठा अधिकारी आणि अन्नधान्य पुरवठा अधिकारी कधी अंमलबजावणी करणार, असा संतप्त सवाल आता नागरिक व ग्राहक संघटनांकडून विचारला जात आहे.

शहराचे विद्रुपीकरण रोखण्यासाठी अहिल्यानगर फ्लेक्समुक्त करणार

नगर - शहरातील सार्वजनिक रस्ते, चौक आणि अन्य ठिकाणी लावण्यात येणाऱ्या सर्व प्रकारच्या फ्लेक्सवर बंदी घालण्याचा प्रस्ताव प्रशासनाने महासभेसमोर मंजुरीसाठी सादर केलेला आहे. आ. संग्राम जगताप यांनी यासंदर्भात दिलेले पत्र आणि उच्च न्यायालयाच्या जनहित याचिकेतील आदेशांची दखल घेऊन अतिक्रमण विभागाने हा प्रस्ताव तयार केला आहे. शहराचे विद्रुपीकरण रोखून अहिल्यानगरला फ्लेक्समुक्त करण्यासाठी महापालिका प्रशासनाने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे.

महासभेने या प्रस्तावाला मंजुरी दिल्यास शहरात परवानगी असलेल्या आणि विनापरवानगी लावल्या जाणाऱ्या फ्लेक्सवरही बंदी लागू होण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. शहरातील प्रमुख चौक, मोक्याच्या जागा आणि सार्वजनिक रस्त्यांवर विविध कारणांसाठी फ्लेक्स लावण्याचे प्रमाण वाढले आहे. सण-उत्सवांच्या शुभेच्छा, वाढदिवस, राजकीय जाहिरातबाजी तसेच विविध कार्यक्रमांच्या निमित्ताने मोठ्या आकाराचे फ्लेक्स आणि होर्डिंग्ज उभारले जातात. यापैकी अनेक फ्लेक्स विनापरवानगी लावले जात असल्याने शहराच्या सौंदर्याला बाधा पोहोचत आहे. या अनधिकृत जाहिरात फलकांवर कारवाई करण्यासाठी महापालिकेला वारंवार मोहीम राबवावी लागते. त्यासाठी मनुष्यबळ आणि वेळ खर्च होत असून, शहरातील अतिक्रमणाचा प्रश्नही कायम राहत आहे.

नागरिकांच्या सुरक्षिततेचाही प्रश्न

फ्लेक्स लावण्यासाठी अनेक ठिकाणी उभारण्यात येणाऱ्या कमानी आणि मोठ्या जाहिरात फलकांमुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होतो. हे फलक किंवा त्यांची संरचना कोसळल्यास जीवितहानी होण्याबरोबरच मालमत्तेचेही नुकसान होऊ शकते. या सर्व बाबींचा विचार करून शहरात केवळ अनधिकृत फ्लेक्स हटविण्याऐवजी सर्व प्रकारच्या फ्लेक्सवर बंदी घालण्याची भूमिका महापालिका प्रशासनाने घेतली आहे. त्यानुसार फ्लेक्समुक्त अहिल्यानगर ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी प्रस्ताव तयार करण्यात आला आहे.

दुष्काळामुळे जिल्हा परिषदेच्या निवडणुका होणार का?

निवडणूक आयोगाच्या आदेशानंतरच खरे चित्र समोर येणार

नगर - सर्वोच्च न्यायालयाने ओबीसी आरक्षण मुद्यावर अंतिम निकालाच्या अधीन राहून जिल्हा परिषदांच्या निवडणुका घेण्यास परवानगी दिली आहे. त्यामुळे अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या निवडणुकीचा बार तब्बल साडेचार वर्षानंतर उडणार आहे. परंतु सध्या जिल्ह्यात असणारी दुष्काळी परस्थिती बघता या निवडणुका जानेवारी-फेब्रुवारीमध्ये होणार की पुढे ढकलल्या जाणार याबाबत सध्या तरी स्पष्टता नाही. राज्य निवडणूक आयोगाने भूमिका स्पष्ट केल्यानंतरच जिल्हा परिषद-पंचायत समिती निवडणुका होणार की नाही याबाबत निर्णय होणार आहे.

दरम्यान, अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे ७५ गट व १५० गण असून गट-गणांची प्रभाग रचना व आरक्षण मागील वर्षीच जाहीर झालेले आहे. यात ७५ गटापैकी ३८ ठिकाणी महिलांचे आरक्षण होते. तसेच नगर जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद अनुसूचित जाती-जमाती (एसटी) महिलेसाठी राखीव झालेले आहे. परंतु मागील वर्षी काढण्यात आलेल्या आरक्षणाप्रमाणे निवडणुका होणार की पुन्हा नव्याने आरक्षण काढण्यात येणार याबाबत निवडणूक आयोग जोपर्यंत स्पष्ट आदेश काढत नाही तोपर्यंत इच्छुकांचा जीव टांगणीला लागला आहे. नगर जिल्हा परिषदेची मुदत २२ एप्रिल २०२२ रोजी संपलेली असून गेल्या साडेचार वर्षापासून जिल्हा परिषदेची सूत्रे प्रशासक या नात्याने मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे आहेत.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीबाबत जिल्हा निवडणूक विभागाकडे विचारणा केली असता, आता सर्वोच्च न्यायालयाने निकाल दिला आहे. संबंधीत निकालाची लेखी प्रत निवडणूक आयोगाला मिळाल्यावर त्यानूसार अभ्यास करून निवडणूक आयोगाकडून सुचना आल्यावर पुढील प्रक्रिया राबवणे शक्य होणार आहे. निवडणुकांबाबत आताच काही सांगता येणे कठीण आहे. जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुका होणार असल्या तरी याबाबत अंमित निर्णय राज्य निवडणूक आयोगच घेणार आहे, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

एसआयआरमुळे नव्याने मतदार यादी

नगरसह राज्यात सुरू असणाऱ्या मतदार यादी विशेष पुनर्परीक्षण कार्यक्रम (एसआयआर) यामुळे नगर जिल्ह्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी नव्याने मतदार यादी तयार करावी लागणार आहे. जिल्ह्यातील एसआयआर कार्यक्रम हा १२ नोव्हेंबर रोजी संपणार असून हा कार्यक्रम संपल्यानंतर जिल्ह्यातील पात्र मतदारांसह पात्र मतदारांची संख्या निश्चित होणार आहे. एसआयआर कार्यक्रमामध्ये निश्चित होणारी मतदार यादी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी वापरण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा निवडणूक विभागाच्या वतीने देण्यात आली.

कर्तृत्ववान मराठा महिलांचा १ नोव्हेंबरला राज्यस्तरीय सन्मान सोहळ्याचे आयोजन

नगर - विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करून सामाजिक जडणघडणीत मोलाचे योगदान देणाऱ्या मराठा समाजातील कर्तृत्ववान महिलांचा राज्यस्तरीय सन्मान सोहळा १ नोव्हेंबर रोजी पुण्यात आयोजित करण्यात आला आहे. अखंड मराठा साम्राज्य फाउंडेशन (ट्रस्ट) यांच्या वतीने कर्तृत्ववान मराठा नवदुर्गा - राज्यस्तरीय सन्मान सोहळा २०२६ या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. औंधगाव येथील भारतरत्न पंडित भीम सेन जोशी कलामंदिर येथे सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत हा सोहळा होणार आहे. समाजसेवा, शिक्षण, आरोग्य, उद्योग-व्यवसाय, कला-संस्कृती, क्रीडा, कृषी व ग्रामीण विकास, महिला सक्षमीकरण तसेच सार्वजनिक आणि प्रशासकीय क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा यावेळी सन्मान करण्यात येणार आहे.

या सोहळ्यास राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर, पुणे गुन्हे शाखेच्या आयपीएस अधिकारी तेजस्विनी सातपुते, डॉ. ज्योती मेटे आणि मुंबईच्या महापौर ऋतुजा तावडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. स्त्रीशक्तीचा जागरः कर्तृत्वाचा गौरव या संकल्पनेतून आयोजित या सोहळ्याचा उद्देश महिलांच्या सामाजिक योगदानाची दखल घेऊन त्यांच्या कार्याचा गौरव करणे आणि इतर महिलांना समाजासाठी कार्य करण्याची प्रेरणा देणे हा आहे. महिलांचे कर्तृत्व हे समाजाच्या प्रगतीचे महत्त्वपूर्ण बळ असून, निःस्वार्थ भावनेने कार्य करणाऱ्या महिलांना सन्मानित करून त्यांच्या कार्याला व्यापक व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात येत आहे.

कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन फाउंडेशनचे संचालक मनोज सोनवणे व संदीप नवसुपे यांनी केले आहे.

खांब उभारण्यासाठी १ हजारांची लाच मागणाऱ्या 'महावितरण'च्या वरिष्ठ तंत्रज्ञाला रंगेहाथ पकडले

नगर - शेतीपंपाचा वीजपुरवठा सुरू करण्यासाठी पडलेला वीजेचा खांब नव्याने उभारण्याच्या कामासाठी शेतकऱ्याकडे एक हजार रूपयांच्या लाचेची मागणी केल्याप्रकरणी महावितरणच्या वरिष्ठ तंत्रज्ञाला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अटक केली आहे. बापुसाहेब ठकाजी विरकर (वय ४०, रा. वाघोली, ता. शेवगाव) असे या कर्मचाऱ्याचे नाव आहे. तो ढोरजळगाव सेक्शनमध्ये वरिष्ठ तंत्रज्ञ म्हणून कार्यरत आहे. २९ ऑक्टोबर रोजी सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास ही कारवाई करण्यात आली.

तक्रारदार शेतकऱ्याची नांदूर विहिरे गावाच्या हद्दीत शेतजमीन असून, या जमिनीत विहीर आहे. यासाठी त्यांनी महावितरणकडून अधिकृत वीजजोडणी घेतलेली आहे. ६ ऑक्टोबर रोजी तक्रारदार यांनी गावातील वायरमन वीरकर याला फोन करून शेतीपंपाचा वीजपुरवठ बंद असल्याचे कळविले. त्यावेळी गावच्या परिसरातील वीजेचा खांब पडल्याने वीजपुरवठा खंडित झाला असून, नवीना खांब उभारावा लागेल, असे वीरकर याने सांगितले. त्यासाठी तक्रारदार आणि परिसरातील अन्य शेतकऱ्यांनी मिळून सहा हजार रूपये जमा करून द्यावेत. ही रक्कम ठेकेदाराला देऊन नवीन खांब उभारण्याची व्यवस्था करतो, असे त्याने सांगितल्याचा आरोप आहे. या सहा हजार रूपयापैकी तक्रारदाराकडे एक हजार रूपयांची मागणी करण्यात आल्याची तक्रार ८ ऑक्टोबर रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे करण्यात आली होती. या तक्रारीच्या अनुषंगाने त्याच दिवशी लाच मागणीची पडताळणी केली असता वीरकर याने तक्रारदाराकडे एक हजार रूपयांची मागणी केल्याचे पडताळणीत निष्पन्न झाले. त्यामुळे आरोपी लोकसेवक वीरकर याला २९ ऑक्टोबर रोजी अटक करण्यात आली. त्याच्या विरुद्ध शेवगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस उपअधीक्षक अजित त्रिपुटे यांच्या मार्गदर्शनाखाली पो.नि. छाया देवरे, पोलीस अंमलदार गजानन गायकवाड, सचिन सुद्रुक, वैभव सुपेकर, चालक करांडे यांच्या पथकाने केली आहे.

जिल्हा बँकेच्या निवडणुकीसाठी २ नोव्हेंबर रोजी मतदान; केंद्रावर जमावबंदी, सीसीटीव्ही आणि चित्रीकरण करणार

नगर - जिल्हा सहकारी बँकेच्या पंचवार्षिक निवडणुकीच्या १० जागांसाठी ३३ मतदान केंद्रांवर २ नोव्हेंबर रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत मतदान होणार असून जिल्ह्यातील ३ हजार ८३७ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहे. मतदान केंद्रांवर कडक सुरक्षा व्यवस्था राहणार असून जिल्ह्यातील पारनेर, अकोले व कर्जत हे तालुके संवेदनशील आहेत. त्यामुळे तेथे सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार असून उर्वरीत मतदान केंद्रांवर व्हिडिओ चित्रीकरण करण्यात येणार असल्याची माहिती निवडणूक प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदान आणि मतमोजणी प्रक्रिया शांततेत पार पडावी, तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी जिल्हाधिकारी पंकज अशिया यांनी प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत. त्यानुसार मतदान केंद्रे आणि मतमोजणी केंद्रांच्या १०० मीटर परिसरात जमावबंदी लागू करण्यात आली आहे. जिल्हा बँकेच्या निवडणुकीसाठी जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये निश्चित केलेल्या मतदान केंद्रांवर मतदान होणार आहे. मतदान व मतमोजणी प्रक्रिया निर्भय आणि शांततापूर्ण वातावरणात पार पडावी, निवडणूक प्रक्रियेत कोणताही अडथळा निर्माण होऊ नये आणि कायदा-सुव्यवस्था राखली जावी, हा या आदेशामागील उद्देश आहे.

उमेदवारांसह शस्त्रे बाळगण्यास मनाई

मतदान केंद्रे आणि मतमोजणी केंद्रांच्या १०० मीटर परिसरात जमावबंदी लागू करण्यात आली असून, उमेदवारांसह इतर कोणत्याही व्यक्तीला या परिसरात शस्त्रे बाळगण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ मधील कलम १६३ अन्वये हे आदेश जारी करण्यात आले आहेत. २ नोव्हेंबर ते ३ नोव्हेंबर या कालावधीत लागू असलेल्या या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम २२३ तसेच अन्य लागू कायद्यांनुसार कारवाई करण्यात येणार आहे. निवडणूक प्रक्रिया शांततेत पार पाडण्यासाठी प्रशासनाने हे पाऊल उचलले आहे.

अमरज्योत लॉन्स येथे मतमोजणी

नगर-कल्याण रोडवरील बायपास चौकातील अमरज्योत लॉन्स येथे ३ नोव्हेंबर रोजी सकाळी ८ वाजल्यापासून मतमोजणी प्रक्रिया होणार आहे. मतमोजणी पूर्ण होईपर्यंत शंभर मीटरपर्यंत जमावबंदी आदेश लागू करण्यात आला आहे. जिल्हा बँकेच्या २१ जागांपैकी ११ जागा बिनविरोध झालेल्या असून उर्वरीत १० जागांसाठी मतदान होत आहे. जनरलच्या सहा जागांवर पूर्ण जिल्ह्यातून मतदान होईल. तर, पारनेर, अकोले, कर्जत व राहुरी ह्या सेवा सोसायटी मतदारसंघातील चारही लढती चुरशीच्या आहेत. यातील राहुरी वगळता तिन्ही तालुक्यातील मतदान केंद्र संवेदनशील म्हणून घोषीत केलेले असून तेथील मतदान केंद्रांवर कडक सुरक्षा व्यवस्था असणार आहे.

कमलेश गोंधळे यांचे अल्प आजाराने निधन

नगर - गोंधळे मळा, नागरदेवळे येथील रहिवासी कमलेश सुरेश गोंधळे (वय ४४) यांचे २३ ऑक्टोबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर भिंगार अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे आई, वडील, पत्नी, २ मुले असा परिवार आहे. महात्मा फुले पतसंस्थेत ते क्लार्क म्हणून कार्यरत होते.

नगरमध्ये ३१ ऑक्टोबर रोजी गीत गजल गीतांच्या मैफिलीचे आयोजन

नगर - जुन्या व नव्या हिंदी चित्रपट गीतांची सुरेल मेजवानी देणाऱ्या गाता रहे मेरा दिल प्रस्तुत गीत ग़ज़ल गीतांची मैफिलीचे आयोजन ३१ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६.३० वाजता रोज गोल्ड हॉल आकाशवाणी केंद्रासमोर, प्रोफेसर चौक येथे करण्यात आले आहे. गीत ग़ज़ल... या संकल्पनेअंतर्गत नगमों नये पुराने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याचे आयोजक अमीन धारणी यांनी सांगितले.

या मैफिलीत डॉ.विवेकानंद केंगे, मिनानाथ मैड, निलेश गाडेकर, सुनिल भंडारी, अमीन धारानी, माधवी गुजर,नरेश पेवाल,अजय भोसले, विद्या तन्वर, ज्योती भिंगारदिवे, दिनेश मंजरतकर, संजय भिंगारदिवे, चारू ससाणे, मयुरी ढोले, मुकुंद ढोल, धनंजय आरडे, गुलशन धाराणी, सुनील रोजमॅन, जावेद मास्टर हे गायक विविध लोकप्रिय गीते सादर करणार असून कार्यक्रमास पटेल क्लिनिक व वसीम ज्वेलर्सचे सहकार्य लाभले असल्याचे गुलशन धाराणी यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आबिद खान करणार आहेत. संगीतप्रेमींसाठी आयोजित करण्यात आलेला हा कार्यक्रम सर्वांसाठी विनामूल्य असून कार्यक्रम वेळेवर सुरू होणार आहे. जुन्या-नव्या हिंदी गीतांचा सुरेल आनंद घेण्यासाठी अहिल्यानगर शहर व परिसरातील संगीतप्रेमींनी उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक अमीन धारणी यांनी केले आहे.

इलाक्षी ह्युंदाई मध्ये दी ऑल न्यू बेयॉन कारचे अनावरण

तत्पर सेवेतून इलाक्षी ह्युंदाईने ग्राहकांचा विश्वास संपादन केला : राहुल ठाकरे

इलाक्षी ह्युंदाई येथे दी ऑल न्यू बेयॉन कारचे अनावरण राहुल ठाकरे, सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, तुषार शिंदे सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, बालरोग तज्ञ डॉ. चेतना बहुरुपी यांच्या हस्ते झाले.

नगर – मास मार्केट ब्रॅण्ड दरम्यान विक्री पश्चात सेवा सर्व्हिसमध्ये ग्राहकांची प्रथम पसंती मिळवणाऱ्या ह्युंदाई कंपनीचे अधिकृत डीलर इलाक्षी ह्युंदाई येथे दी ऑल न्यू बेयॉन कारचे अनावरण राहुल ठाकरे, सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, तुषार शिंदे सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, बालरोग तज्ञ डॉ. चेतना बहुरुपी यांच्या हस्ते झाले. यावेळी संचालक विजयकुमार गडाख, जनरल मॅनेजर राजू बेजगमवार, सेल्स मॅनेजर अजय मगर, संदीप देवकाते उपस्थित होते.

राहुल ठाकरे हणाले की, व्यवसाय क्षेत्रामध्ये चांगले नावलौकिक असलेला माणूस जीवनशैली गतीमान करण्यासाठी चारचाकी वाहन घेतो. त्यावेळी त्या व्यवसायाला अजून बळकटी मिळण्याचे काम होत असते. ऑटोमोबाईल क्षेत्रामध्ये गडाख परिवाराने पाऊल टाकून ग्राहकांना विविध सोयी–सुविधा देण्याचा प्रयत्न केला आहे. तत्पर सेवेतून इलाक्षी ह्युंदाईने ग्राहकांचा विश्वास संपादन केला आहे. तर सर्वसामान्यांचे चारचाकी वाहनाचे स्वप्न पूर्ण करण्याचे काम इलाक्षी ह्युंदाई करत आहे. यामध्ये राजू बेजगमवार व अजय मगर यांच्या टीमचा मोठा वाटा आहे. नवीन दी ऑल न्यू बेयॉन कारमध्ये मोठे बदल करण्यात आले असून, ग्राहकांना चांगल्या सुविधा निर्माण करुन देण्याचा प्रयत्न कंपनीने केला आहे. सर्वात महत्त्वाचं म्हणजे सुरक्षा ही पहिल्यांदा बघितली जाते. नवीन आलेल्या न्यू बेयॉन गाडीमध्ये पूर्ण सुरक्षा दिलेली असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रास्ताविकात सेल्स मॅनेजर अजय मगर यांनी नवीन दी ऑल न्यू बेयॉन गाडी मधील नव नवीन असलेल्या फीचर्स बद्दल माहिती सांगितली. एकत्र कुटुंब पध्दती असल्याने भारतीय जास्त सदस्य बसू शकतील अशा गाड्यांना पसंती देत असतात. अलीकडच्या काळात ही मागणी फार वाढली असून, त्यामुळे बाजारात पाच सीटर कारची विक्री मोठ्या प्रमाणावर होत आहे. यामुळेच आता कंपन्याही त्यांच्या ५–सीटर ङ्गत कारचे मॉडेल्स लाँच केले आहे. यातच कार निर्माता ह्युंदाई इंडिया सुध्दा देशातील बाजारात मोठा धमाका करण्यासाठी सज्ज झाली आहे.

ह्युंदाई इंडियाने नवीन दी ऑल न्यू बेयॉन आली असून, नवीन वाहनाच्या सेगमेंट मध्ये वाजवी दरात उत्कृष्ट सुविधांचा लाभ मिळणार आहे. ज्या सुविधा इतर स्पर्धक कंपन्यांच्या गाड्यांमध्ये उपलब्ध नाहीत. तसेच मोनोटोन, ड्युअल टोन, हेझेल ब्लू, हेझेल ब्लू, मिस्टिक सफायर न्यू कलर, एटलस व्हाईट, ड्रॅगन रेड, टायटन ग्रे, एटलस व्हाइट, एबिस ब्लॅक, या रंगचा समावेश असून व्हेन्यू मध्ये पेट्रोल १.५ टर्बो इंजिन मध्ये उपलब्ध आहे. ही दिसायला खूपच आकर्षक व मजबूत असून, आकर्षक रंगात उपलब्ध होणार आहे.

कंपनीने त्यात Advanced Driving Assistance System boihb -2 (ADAS) समाविष्ट केला आहे. यात ३२ पेक्षा जास्त सेफ्टी फीचर्स देण्यात आल्याचा कंपनीचा दावा आहे. यात ६ एअरबॅग्ज, व्हॉईस ॲक्टिव्हेटेड इलेक्ट्रॉक सनरूफ, पॅडल शिफ्टर्स, पॉवर ड्रायव्हर आणि पॅसेंजर सीट्स, हवेशीर फ्रंट सीट्स, वायरलेस चार्जिंग पोर्ट, लेदर अपहोल्स्ट्री, इजङए साउंड सिस्टम, ड्युअल झोन क्लायमेट कंट्रोल, रेन सेन्सिंग वायपर, अनुक्रमिक टर्न इंडिकेटर, ऑन–बोर्ड आहेत. नेव्हिगेशन ३६०–डिग्री कॅमेरा आणि इलेक्ट्रॉनिक स्टेबिलिटी कंट्रोल सारखी फीचर्स उपलब्ध आहेत.

नामवंत बँका व फायनान्स कंपन्यांकडून झिरो प्रोसेसिंग फी १०० टक्के ऑन रोड फायनान्स सुविधा उपलब्ध आहे. ह्युंदाई प्रॉमिसच्या माध्यमातून ग्राहकांना जुन्या गाडीची एक्सचेंज सुविधा देण्यात आलेली आहे. दररोज ग्राहकांची बुकिंग साठी प्रतिसाद मिळत असून, सदर वाहन इलाक्षी ह्युंदाई मध्ये डेमो व टेस्ट ड्राईव्हसाठी उपलब्ध आहे. ग्राहकांनी अधिक माहितीसाठी शोरूमला भेट देऊन संधीचा लाभ घेण्याचे आवाहन इलाक्षी ह्युंदाईचे जनरल मॅनेजर राजू बेजगमवार यांनी केले आहे.

साईदीप सहयाद्री हॉस्पिटलमध्ये आयोजित महिला पोलीस आरोग्य तपासणी शिबिराचा प्रारंभ दीपप्रज्वलनाने करताना सौ. गायत्री मुमक्का सुदर्शन.

जबाबदारीसोबत महिला पोलिसांनी आरोग्य तपासणीसुद्धा करणे आवश्यक

डॉ. वैशाली किरण यांचे प्रतिपादन

नगर – आपले कर्तव्य पार पाडताना महिला पोलीस कर्मचारी व अधिकारी यांनी आपली आरोग्य तपासणी करणे आवश्यक हे सामाजिक जवाबदारी सोबत आरोग्य ही तितकेच महत्वाचे आहे, असे प्रतिपादन स्त्री रोग व वंद्धत्व निवारण तज्ञ डॉ. वैशाली किरण यांनी व्यक्त केले.

साईदीप सहयाद्री हॉस्पिटलमध्ये आयोजित महिला पोलीस आरोग्य तपासणी शिबिराच्या निमित्ताने त्या बोलत होत्या. प्रमुख पाहुण्या सौ. गायत्री मुमक्का सुदर्शन होत्या. द्विपप्रज्वल्लन करून शिबिराची सुरवात करण्यात आली.

डॉ. वैशाली किरण यांनी दैनंदिन कामकाजामुळे होणारी धावपळ, नौकरीतील कर्तव्य बजावणे आणि कौटुंबिक जवाबदारी यातून स्वतःसाठी वेळ काढून नियमित व वार्षिक आरोग्य तपासणी अत्यंत महत्वाची बाब आहे काही अनियमितता तपासणी मध्ये आढळ्यास त्वरित उपचार घेऊन पूर्वपदावर येता येते पण निष्कळजी पण केल्यास खूप मोठया आरोग्य समस्या निर्माण होऊ शकतात सोबतच योग्य आहार वेळेवर घेणे आवश्यक आहे आणि नियमित व्यायाम देखील महत्वाचा भाग आहे.

यावेळी बोलताना सौ. गायत्री मुमक्का यांनी महिला म्हणून खूप मोठी जवाबदारी असते. कुटुंब आणि समाज सुदृढ ठेवण्यासाठी प्रथम आपले आरोग्य सुदृढ ठेवणे खूप महत्वाचे आहे.

यावेळी साईदीप सहयाद्री हॉस्पिटल मधील डॉक्टर्स, नर्स आणि प्रशासकीय विभागातील अधिकारी उपस्थित होते. तसेच तपासणी करून घेण्यासाठी महिला पोलीस अधिकारी व कर्मचारी सुद्धा उपस्थित होते.

अहिल्यानगर शहरामध्ये १ नोव्हेंबर रोजी माळी समाजाचा वधू–वर परिचय मेळावा

नगर – अहिल्यानगर सकल माळी समाज संस्थेच्या वतीने माळी समाज वधू–वर परिचय मेळावा बंधन लॉन्स, सावेडी येथे १ नोव्हेंबर रोजी सकाळी १० ते ४ वाजेपर्यंत आयोजित करण्यात आला आहे. मेळाव्याचे उद्घाटन राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांच्या हस्ते होणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून भाजप ओ.बी.सी. मोर्चाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष आ. योगेश टिळेकर तर प्रमुख उपस्थिती म्हणून माजी आमदार पांडुरंग अभंग उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमासाठी विशेष उपस्थिती म्हणून माजी खासदार डॉ.सुजय विखे व आ. संग्राम जगताप यांना निमंत्रण दिले आहे.

या कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष उपमहापौर धनंजय जाधव असून कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे अध्यक्ष किशोर डागवाले तर आयोजक उपाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ हे आहेत. तसेच संस्थेचे मार्गदर्शक पद्माकांत कुदळे, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष अण्णासाहेब शेलार, कर्जतचे प्रथम नगराध्यक्ष नामदेव राऊत, श्रीरामपूरचे नगराध्यक्ष करण ससाणे, रहात्याचे नगराध्यक्ष डॉ. स्वाधीन गाडेकर, श्रीगोंद्याच्या नगराध्यक्षा सुनिता खेतमाळीस हे निमंत्रित उपस्थित राहणार आहेत. या वधू–वर मेळाव्यासाठी जास्तीत जास्त वधू–वर व पालकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन अहिल्यानगर सकल माळी समाज संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

श्रीरामपूर येथे माळी समाज वधू-वर मेळाव्याचे नगराध्यक्ष करण ससाणे यांना निमंत्रण

अहिल्यानगर सकल माळी समाज संस्थेच्या वतीने १ नोव्हेंबर रोजी जिल्ह्यात प्रथमच भव्य वधू–वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्याचे निमंत्रण श्रीरामपूर येथील नगराध्यक्ष करण ससाणे यांना देण्यात आले.

नगर – अहिल्यानगर सकल माळी समाज संस्थेच्या वतीने १ नोव्हेंबर रोजी जिल्ह्यात प्रथमच भव्य वधू–वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्याचे निमंत्रण श्रीरामपूर येथील नगराध्यक्ष करण ससाणे यांना देण्यात आले. याप्रसंगी समाज बांधव उपस्थित होते. श्रीरामपूर व बेलापूर परिसरात या मेळाव्याचा प्रचार दौरा करण्यात आला. यावेळी अहिल्यानगर सकल माळी समाज संस्थेचे उपाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ, विश्वस्त अनिल इवळे, वधू–वर नोंदणी प्रमुख रमेश चिपाडे, मच्छिंद्र बनकर, मनोज भुजबळ उपस्थित होते.

याप्रसंगी श्रीरामपूर–बेलापूर मधील समाज बांधव सतीश भगत (अध्यक्ष केशव गोविंदबन), प्रकाश कुर्हे, भाऊसाहेब पुजारी, डॉ. रमेश गाडेकर, भाऊसाहेब म्हसे, किरण पुजारी, शरद कळमकर, म्हसे सर, चंद्रकांत झुरंगे, देविदास शिरसाट, बाळासाहेब ताजणे, संचित गिरमे, सुभाष गायकवाड, ऋषिकेश श्रीरसागर, राहुरी तालुक्याचे दादा पाटील मेहत्रे, सुनील गुलदगड आदी उपस्थित होते.

यावेळी नगराध्यक्ष करण ससाणे म्हणाले की, अहिल्यानगर सकल माळी समाज संस्थेने समाजहिताचा अतिशय स्तुत्य उपक्रम हाती घेतला आहे. हल्ली मुला–मुलींचे लग्न जमविणे हे पालकांसमोर मोठे आव्हान बनले आहे. अशा परिस्थितीत केवळ २०० रुपये प्रवेश फी घेऊन ना नफा ना तोटा तत्त्वावर वधू–वर मेळावा आयोजित करणे, ही खरी सामाजिक बांधिलकी आहे.

हा मेळावा जिल्ह्यातील माळी समाजासाठी दिशादर्शक ठरेल. श्रीरामपूर नगरपरिषदेच्या वतीने आणि वैयक्तिकरित्या या मेळाव्यासाठी माझे पूर्ण सहकार्य राहील. समाज बांधवांनी या मेळाव्याचा लाभ घ्यावा.

निःस्वार्थ रुग्णसेवा करणाऱ्या डॉक्टरांसह १२ मान्यवरांचा धन्वंतरी पुरस्काराने गौरव

कै. डॉ. केदारनाथ चांडक यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ केडगाव येथे पुरस्कार सोहळा उत्साहात

नगर – अहर्निशं सेवामहे! या सेवाभावी भावनेतून आयुष्याच्या अखेरपर्यंत रुग्णसेवेचा ध्यास घेतलेल्या कै. डॉ. केदारनाथ चांडक (सोनई) यांच्या स्मरणार्थ आरोग्य भरती यांनी केडगाव येथील सरस्वती विद्यालयात धन्वंतरी पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात आरोग्य क्षेत्रात निःस्वार्थ भावनेने सेवा देणाऱ्या चार डॉक्टरांसह योग, सूर्यनमस्कार आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या अन्य आठ जणांचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.

आरोग्य भारतीचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष डॉ सुरेश पाटणकर यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडला. प्रमुख पाहुणे म्हणून सुहास हिरेमठ उपस्थित होते. पुरस्कारातील डॉ. प्रभाकर पवार, डॉ. श्रीवल्लभ घोरपडे, डॉ. श्रीकृष्ण जोशी, डॉ. विजयकुमार वऱ्हाडे, शांतीलाल चंदे, रमेश माधवस्वामी व अन्य पुरस्कार देऊन सन्मानीत करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. किशोर पुरकर यांनी केले. यावेळी त्यांनी आरोग्य भारतीच्या २४ वर्षांच्या सामाजिक व आरोग्यविषयक कार्याचा लेखाजोखा मांडला. संस्थेने या कालावधीत आरोग्य क्षेत्रात केलेले कार्य, विविध सामाजिक उपक्रम आणि जनजागृतीच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहोचवलेले आरोग्यविषयक संदेश यांची माहिती त्यांनी उपस्थितांना दिली.

अध्यक्षीय भाषणात डॉ. सुरेश पाटणकर म्हणाले की, देशातील आरोग्यविषयक परिस्थितीत सकारात्मक बदल घडवून आणणे ही काळाची गरज आहे. परदेशातील वैद्यकीय उपचारपद्धती अधिक चांगल्या असल्याचा अनेकांचा समज असतो; मात्र भारतातही सक्षम वैद्यकीय सुविधा आणि प्रभावी उपचारपद्धती उपलब्ध आहेत. नागरिकांनी स्वतःच्या आरोग्याबाबत जागरूक राहणे आवश्यक आहे. तंबाखू, सिगारेट आणि गुटख्यासारख्या व्यसनांपासून दूर राहिले पाहिजे. सध्या कर्करोगाचे प्रमाण वाढत असून, हवेच्या प्रदूषणामुळे श्वसनविकारांचाही धोका वाढत आहे. हे धोके कमी करण्यासाठी नियमित व्यायाम, प्राणायाम आणि योगाभ्यासाला दैनंदिन जीवनात महत्त्व दिले पाहिजे. आरोग्यविषयक मार्गदर्शन करत त्यांनी पुरस्कारार्थींना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

प्रमुख पाहुणे सुहास हिरेमठ यांनी मन प्रसन्न ठेवण्याचे महत्त्व अधोरेखित केले. धन्वंतरी ही आरोग्याची देवता मानली जाते. शरीर, बुद्धी आणि मन या तिन्ही स्तरांवर निरोगी राहणे आवश्यक आहे. स्वतःचे आरोग्य जपणे हे प्रत्येकाचे पहिले कर्तव्य आहे. बदलत्या जीवनशैलीमुळे अनेकजण व्यसनांच्या आहारी जात आहेत. त्यामुळे जीवनशैलीत सकारात्मक बदल करून आरोग्यदायी सवयी अंगीकारणे गरजेचे आहे, असे त्यांनी सांगितले.

या पुरस्कार सोहळ्याच्या माध्यमातून आरोग्यसेवा, योग, सूर्यनमस्कार आणि सामाजिक कार्यासाठी योगदान देणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करण्यात आला. निःस्वार्थ रुग्णसेवा करणाऱ्या व्यक्तींच्या कार्याची दखल घेऊन त्यांना प्रोत्साहन देण्याबरोबरच समाजात आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करण्याचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

कार्यक्रमा दरम्यान आरोग्य भारती कडून स्व. भानुदास कोतकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी डॉ. जयदीप देशमुख, बी.एड. कॉलेजचे प्राचार्य देसाई सर, सरस्वती विद्यालयाचे मुख्याध्यापक संदीप भोर, संस्थेचे कार्यवाह दादाराम ढवान, रवींद्र चोभे, डॉ. अजित फुंदे, श्रीपाद शिंदीकर, राजेश परदेशी, कैलास चोथे, योगेश सेतवाल, डॉ. मैत्रेयी लिमये, डॉ. पौर्णिमा पुरकर, डॉ.मधुकर भोर, वैशाली चोथे, अयोध्या चांडक आणि प्रणव चांडक यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. रेणुका जोशी यांनी केले.

अहिल्यानगर सकल माळी समाज संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांची भेट घेऊन त्यांना वधू–वर मेळाव्याचे निमंत्रण दिले.

सकल माळी समाजाच्या वधू-वर मेळाव्याचे मंत्री सावे यांना निमंत्रण

नगर – अहिल्यानगर सकल माळी समाज संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांची छत्रपती संभाजीनगर येथे भेट घेऊन त्यांना मेळाव्याचे निमंत्रण दिले. संस्थेच्या वतीने १ नोव्हेंबर रोजी नगरमध्ये होणाऱ्या माळी वधू–वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या संदर्भात समाजाचे पदाधिकारी यांनी सावे यांची भेट घेत वधूवर मेळाव्याची माहिती दिली. याप्रसंगी सकल माळी समाज संस्थेचे उपाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ, कोर कमिटीचे सदस्य उद्योजक राजेंद्र ताठे, सचिव अमोल भांबरकर, विश्वस्त अनिल इवळे, विशाल पाडसवान, शुभम ताठे,जि.प. सदस्य डॉ.संजय गव्हाणे आदी उपस्थित होते.

तसेच माळी महासंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष उद्योजक शांताराम गाडेकर, समता परिषदेचे राज्य पदाधिकारी अनितावाई देवतकर, उद्योजक अशोक जगधने यांनाही निमंत्रण देण्यात आले. यावेळी मंत्री सावे म्हणाले, माळी समाज हा क्रांतीसुर्य महात्मा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या विचारांवर चालणारा पुरोगामी समाज आहे. अशा मेळाव्यामुळे समाज एकसंघ होईल आणि तरुण–तरुणींना योग्य जोडीदार मिळेल. शासन नेहमीच आपल्या पाठीशी आहे.

संस्थेचे उपाध्यक्ष भुजबळ म्हणाले, समाजातील अनेक मुले–मुली उच्च शिक्षित असूनही योग्य जोडीदार मिळत नसल्यामुळे कुटुंबे चिंतेत आहेत. हीच अडचण लक्षात घेऊन आम्ही हा भव्य वधू–वर मेळावा आयोजित केला आहे. सर्व समाज बांधवांनी जास्तीत जास्त संख्येने नोंदणी करून १ नोव्हेंबर रोजी उपस्थित राहाव, असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

आयएमएससीडीआरमध्ये बौद्धिक संपदा हक्क विषयावर कार्यशाळा उत्साहात

आयएमएससीडीआरमध्ये बौद्धिक संपदा हक्क विषयावर कार्यशाळा उत्साहात झाली.

नगर – सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या Centre for Innovation, Incubation Enterprise आणि बी.पी.एच.ई. सोसायटीच्या इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, करिअर डेव्हलपमेंट अँड रिसर्च (IMSCDR) यांच्या संयुक्त विद्यमाने बौद्धिक संपदा हक्क (Intellectual Property Rights - IPR) या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत पेटंट, कॉपीराइट, ट्रेडमार्क, भौगोलिक मानांकन (GI), पेटंट प्रक्रिया, बौद्धिक संपदेचे मूल्यांकन आणि पेटंटचे व्यावसायिकीकरण या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यशाळेचे उद्घाटन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या IIL चे संचालक प्रा. (डॉ.) देविदास गोल्हार यांच्या हस्ते झाले. यावेळी त्यांनी संशोधन व शैक्षणिक संस्थांमध्ये नवोपक्रमाभिमुख वातावरण निर्माण करण्याची गरज अधोरेखित केली. प्रा. ॲड. गणेश हिंगमिरे यांनी पेटंट, कॉपीराइट, ट्रेडमार्क आणि GI मानांकन याविषयी मार्गदर्शन करताना पुणेरी पगडी, नाशिकची द्राक्षे, आदिवासी महुआ यांसारखी उदाहरणे देऊन स्थानिक उत्पादने व पारंपरिक ज्ञानाच्या संरक्षणाचे महत्त्व स्पष्ट केले.

पेटंट तज्ज्ञ श्रीमती रश्मी हिंगमिरे यांनी पेटंट मिळविण्याची प्रक्रिया आणि त्यातील विविध टप्पे सोप्या पद्धतीने समजावून सांगितले.

सीए आशिष बियाणी यांनी बौद्धिक संपदेचे मूल्यांकन व त्यातील आर्थिक आणि व्यावसायिक संधी याविषयी मार्गदर्शन केले.

डॉ. विष्णू डी. वाकचौरे यांनी पेटंटचे व्यावसायिकीकरण, संशोधनातील नवकल्पनांचे बाजारपेठेतील उत्पादनांमध्ये रूपांतर आणि उद्योजकीय संधी यावर पॅनेल चर्चेद्वारे विचार मांडले.

यावेळी संस्थेच्या प्रभारी संचालिका डॉ. प्रोनोती तेलोरे यांनी स्वागत केले. तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सहकार्याने भविष्यातही अशा ज्ञानवर्धक व उपयुक्त उपक्रमांचे आयोजन करण्यात येईल, अशी अपेक्षा व्यक्त केली.

संस्थेचे सल्लागार डॉ. एम. बी. मेहता आणि उपसंचालक डॉ. विक्रम बर्नाबास यांनीही या उपक्रमाला प्रोत्साहन दिले.

या कार्यशाळेचे समन्वयन डॉ. ऋचा तांदुळवाडकर (IMS IIC) यांनी केले, तर कार्यशाळेच्या आयोजनासाठी डॉ. सय्यद मुदस्सर (IMS IQAC) यांनी विशेष परिश्रम घेतले.

गृहिणी

आरोग्य

स्वयंपाकघर आपली औषधशाळा

आपल्या पूर्वजांनी आरोग्याची गुपिते स्वयंपाकघरात दडवून ठेवली आहेत. भारतीय स्वयंपाकघर ही केवळ चवदार जेवणाची जागा नसून ती एक निसर्गदत्त औषधशाळा आहे. म साल्यांच्या डब्यातील अनेक घटक आपल्याला औषधांशिवाय निरोगी ठेवण्यास मदत करतात. हळद ही नैसर्गिक जंतूनाशक आहे. घसा खवखवणे, खोकला किंवा अंगावरील सूज यावर हळदीचे दूध अत्यंत गुणकारी ठरते. आले आणि सुंठ पचनक्रिया सुधारतात. सर्दी किंवा मळमळ होत असल्यास आल्याचा रस किंवा सुंठीचा काढा घेतल्याने आराम मिळतो. जिरे, ओवा आणि मिरे पोटाच्या विकारांवर रामबाण उपाय आहेत. अपचन आणि पोटदुखीवर ओवा कोमट पाण्यासोबत घेतल्यास आराम पडतो. जिऱ्याचे पाणी पचनशक्ती बळकट करते, तर मिरे प्रतिकारशक्ती वाढवतात. लवंगेचे तेल दातांची दुखी थांबवण्यासाठी उपयुक्त ठरते, तर दालचिनी साखरेचे प्रमाण नियंत्रणात ठेवते. लसूण हृदयाचे आरोग्य चांगले ठेवतो आणि कांदा शरीरातील उष्णता कमी करतो. पोटदुखीवर हिंग आणि सांधेदुखीवर मेथीचे दाणे फायदेशीर ठरतात. तुळस, पुदिना आणि कढीपत्ता पचनसंस्थेला बळ देतात. आपल्या स्वयंपाकघरातील हे मसाले केवळ अन्नाची चव वाढवत नाहीत, तर आजारांपासून आपले रक्षणही करतात. म्हणूनच आपले स्वयंपाकघर हीच खरी औषधशाळा आहे.

पाककला

रागी-अक्रोड हलवा

साहित्य : रागी पीठ १/२ वाटी, अक्रोड भरड कुटलेले १/४ वाटी, गूळ किसलेला १/२ वाटी, साजूक तूप ४ चमचे, दूध १ वाटी, पाणी १ वाटी, वेलची पावडर १/४ चमचा, बारीक चिरलेले बदाम १ चमचा, बारीक चिरलेले काजू १ चमचा

कृती : कढईत २ चमचे साजूक तूप गरम करा. त्यात रागी पीठ घालून मंद आचेवर ४-५ मिनिटे खमंग वास येईपर्यंत भाजून घ्या. त्यात भरड कुटलेले अक्रोड घालून १ मिनिट परता. दुसऱ्या भांड्यात दूध आणि पाणी एकत्र गरम करून त्यात किसलेला गूळ घालून विरघळवून घ्या. हे गूळाचे मिश्रण भाजलेल्या रागी पिठात थोडे थोडे घालत सतत ढवळत रहा म्हणजे गुठळ्या होणार नाहीत. मिश्रण घट्ट होऊ लागल्यावर उरलेले २ चमचे तूप घाला. वेलची पावडर घालून मिश्रण एकजीव करा. मिश्रण कडेने सुटून चमक येईपर्यंत मध्यम आचेवर शिजवा. वरून बारीक चिरलेले बदाम आणि काजू घालून सजवा. तयार रागी-अक्रोड हलवा गरम सर्व्ह करा.

वास्तू

मुख्य प्रवेशद्वार आदी संबंधी

* मुख्य दारावर किंवा दारासमोर हिंसक प्राण्यांची किंवा दुःखाची चित्रे लावू नयेत. मुख्य दाराबाहेर नेहमी पुरेसा आणि चमकदार प्रकाश असावा, तिथे अंधार ठेवू नये.

* मुख्य प्रवेशद्वारासमोर चप्पल किंवा बुटांचा खच असू नये, ते बाजूला रांगेत ठेवावेत.

* देवघराच्या भिंतींवर पांढरा, फिकट पिवळा किंवा आकाशी रंग वापरावा.

* शयनकक्षात देवघर ठेवणे टाळावे, जागा नसल्यास त्यावर पडदा लावावा. पाण्याचा नळ उत्तर किंवा पूर्व भिंतीवर असावा.

सौंदर्य

* मेकअप करण्यापूर्वी ५ मिनिटे चेहऱ्यावर बर्फ फिरवल्यास मेकअप दीर्घकाळ टिकतो.

* गव्हाच्या कोंड्याने अंग घासल्यास त्वचा नितळ होते.

* आठवड्यातून एकदा गरम पाण्याची वाफ घेतल्याने व्हाईटहेड्स आणि ब्लॅकहेड्स निघून जातात.

सल्ला

* शिळ्या भातावर थोडे पाणी शिंपडून कुकरमध्ये ५ मिनिटे ठेवावे, भात ताजा होतो.

* उत्तप्प्याच्या पिठात थोडे बारीक चिरलेले टोमॅटो पेरल्यास छान चव येते.

संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा

दैनिक पंचांग

शनिवार, दि. ३१ ऑक्टोबर २०२६

सिंहस्थ प्रारंभ, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, आश्विन कृष्णपक्ष, आर्द्रा ०७।१२, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०६ वा. ३१ मि.

राशिभविष्य

मेष : कामाच्या ठिकाणी नवीन जबाबदाऱ्या येतील.

वृषभ : आर्थिक लाभ संभवतो. आरोग्याची काळजी घेणे गरजेचे ठरेल.

मिथुन : बौद्धिक कामांमध्ये यश मिळेल आणि मित्रांची उत्तम साथ लाभेल.

कर्क : मनातील कोणतीही जुनी चिंता दूर होईल. धनसंपत्तीत वाढ होईल.

सिंह : मान-सन्मानात वाढ होईल. वरिष्ठांचे सहकार्य लाभेल.

कन्या : व्यापारी वर्गाला मोठा आर्थिक फायदा होऊ शकतो.

तूळ : रखडलेले प्रकल्प पूर्णत्वास जातील.

वृश्चिक : मानसिक शांतता लाभेल आणि गुप्त शत्रूंवर विजय मिळवाल.

धनु : धार्मिक कार्यांमध्ये रुची वाढेल. प्रयत्न यशस्वी ठरतील.

मकर : मेहनतीचे फळ उत्तम प्रकारे मिळेल. पदोन्नतीची शक्यता निर्माण होईल.

कुंभ : मित्रपरिवारासोबत वेळ आनंदात जाईल. नवीन लोकांशी

मीन : कला आणि साहित्यात प्रगती होईल. आर्थिक आवक चांगली राहिल.

शब्दगंध क्र. ७५४७ सौ.शैलजा कुलकर्णी



आडवे शब्द :- १) काव्य; कवन ३) यश; जय; जीत ६) बलशाली; शक्तिवान; दणकट ७) माळजमीन; डोंगराळ जमीन ९) खिडकी; वातायन; झरोका ११) खिळे वगैरे ठोकण्याचे लहान हत्यार; लहान घण १३) तपास; शोध; पत्ता १५) धुमश्चक्री; गडबड १७) समुद्र; मर्यादा; अंत १९) समुद्रात लागलेला अग्नी २३) भरभर (झाडावर वगैरे चढणे) २४) ज्याचा कधी कंटाळा येत नाही असा

उभे शब्द :- १) खाटीक; कसाई २) लागलीच; त्वरित ३) स्वस्त; महाग नसलेले ४) मुसलमान धर्मगुरूने काढलेला आदेश ५) दही घुसळून त्यातून लोणी काढल्यानंतर राहिलेला द्रव ८) घरोबा; दाट परिचय; दाटी १०) माफी १२) तूर वगैरे डाळीचे दोन भाग १४) एक शेंगभाजी १५) कोवळे दूध तापवून त्यात साखर वगैरे घालून केलेले खाद्य १६) वेगाने वाहणारी हवा; पवन १७) भिंतीवर सरपटणारा व किडे खाणारा एक क्षुद्र जीव १८) योग्य; रास्त २०) भय; भीती २१) गंध; राहणे २२) कोणत्याही प्राण्यातील पुरुष जात

शब्दगंध क्र. ७५४६ चे उत्तर

फिल्मीचक्कर क्र. १२६० चे उत्तर



* * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

सुविचार : जेथे शब्दांचे वजन उरत नाही, तिथे मौन आपली भाषा बोलते.

मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

ताप मोजण्याच्या थर्मामीटरमध्ये पाऱ्याचाच वापर का केला जातो, इतर द्रव्यांचा का नाही?

ताप मोजण्याच्या थर्मामीटरमध्ये पाऱ्याचाच वापर का केला जातो यामागे अनेक महत्त्वपूर्ण वैज्ञानिक, भौतिक आणि व्यावहारिक कारणे दडलेली आहेत. दैनंदिन जीवनात हवामान मोजण्यापासून ते वैद्यकीय उपकरणांपर्यंत पाऱ्याचा वापर प्रामुख्याने केला जातो कारण इतर कोणत्याही द्रवामध्ये पाऱ्यासारखे सर्वगुणसंपन्न गुणधर्म एकाच वेळी आढळत नाहीत. या संपूर्ण प्रक्रियेत आणि विज्ञानात पाऱ्याचे महत्त्व अधोरेखित करणारे अनेक महत्त्वाचे पैलू आहेत.

सर्वप्रथम, पारा हा एकमेव असा धातू आहे जो सामान्य तापमानावर आणि खोलीच्या तापमानाला द्रव रूपात राहतो. इतर बहुतेक धातू हे कठीण किंवा घण रूपात असतात, तर पारा द्रव असल्याने तो सहजपणे कोणत्याही नळीमध्ये सरकू शकतो. तापमान मोजताना उपकरणातील द्रवाचे प्रसरण अत्यंत एकसारखे, नियमीत आणि अचूक असणे अत्यंत आवश्यक असते. पाऱ्याच्या बाबतीत तापमानात जसा जसा बदल होतो, तसतसे त्याचे प्रसरण किंवा आकुंचन अगदी मोजक्या आणि समान प्रमाणात होते. त्यामुळे थर्मामीटरमध्ये तापमानाची अत्यंत अचूक आणि खात्रीशीर नोंद घेणे सहज शक्य होते.

दुसरे म्हणजे, पाऱ्याचा एक महत्त्वाचा गुणधर्म म्हणजे तो थर्मामीटरच्या काचेच्या नळीला किंवा भिंतींना अजिबात चिकटून राहत नाही. जर आपण पाण्यासारखा द्रव वापरला, तर तो काचेला चिकटून राहतो आणि तापमान खाली उतरताना काचेवर पाण्याचे छोटे थेंब किंवा डाग राहतात, ज्यामुळे अचूक वाचन घेणे कठीण होते. पारा मात्र काचेवर कोणताही अवशेष न सोडता अत्यंत स्वच्छपणे वर आणि खाली सरकतो. याशिवाय पाऱ्याचा रंग चंदेरी आणि अत्यंत चमकदार असतो. त्यामुळे काचेची बारीक नळी असली तरी त्यातील पाऱ्याची पातळी अगदी स्पष्टपणे दिसते, ज्यामुळे थर्मामीटरवरील आकडे किंवा तापमान वाचताना कोणतीही अडचण येत नाही.

तिसरे आणि सर्वात मोठे कारण म्हणजे पाऱ्याची तापमान मर्यादा किंवा त्याचे कार्यक्षेत्र अतिशय विस्तृत असते. पाऱ्याचा गोठण बिंदू उणे ३९ अंश सेल्सिअस इतका खाली आहे, तर त्याचा उत्कलन बिंदू सुमारे ३५७ अंश सेल्सिअस इतका खूप उच्च आहे. याचा अर्थ असा की अतिशय तीव्र थंडीपासून ते अगदी उच्च उष्णतेपर्यंतच्या वेगवेगळ्या वातावरणात पारा न गोठता आणि न उकळता व्यवस्थित काम करू शकतो. याउलट, जर आपण पाणी वापरले तर ते शून्य अंश सेल्सिअसवर गोठते आणि शंभर अंश सेल्सिअसवर उकळू लागते, ज्यामुळे पाण्याचा वापर करून शरीराचे किंवा इतर वस्तूंचे तापमान मोजणे पूर्णपणे अशक्य होते.

चौथ्या मुद्द्यामध्ये पाऱ्याची उष्णता वहन क्षमता किंवा उष्णता शोषून घेण्याचा वेग येतो. पाऱ्याची उष्णता वहन करण्याची क्षमता अतिशय उत्तम असते. जेव्हा आपण थर्मामीटर शरीराला किंवा एखाद्या उष्ण वस्तूला लावतो, तेव्हा पारा त्या संपर्कातील उष्णता अतिशय वेगाने शोषून घेतो आणि त्वरित प्रसरण पावतो. यामुळे कोणतीही प्रतीक्षा न करता अगदी काही सेकंदांतच अचूक तापमान पाहायला मिळते. इतर द्रवांना उष्णता मिळाल्यावर प्रसरण पावण्यासाठी बराच वेळ लागतो, ज्यामुळे वेळेवर अचूक नोंद मिळत नाही.

तसेच, पारा हा रासायनिकदृष्ट्या थोडा स्थिर असतो आणि तो काचेच्या संपर्कात असताना तिच्याशी सहजासहजी कोणतीही रासायनिक प्रक्रिया करत नाही. पाऱ्याची ही रासायनिक निष्काळजीपणा किंवा स्थैर्य उपकरणाचे आयुष्य वाढवण्यास मदत करते. पाणी, अल्कोहोल किंवा इतर रसायने वापरल्यास ती काचेशी किंवा वातावरणातील घटकांशी हवेशी संपर्क आल्यावर प्रतिक्रिया देऊ शकतात, परंतु पारा बंदिस्त नळीत वर्षानुवर्षे टिकून राहतो. या सर्व वैज्ञानिक आणि उपयोगाच्या कारणांमुळेच तापमान मोजण्यासाठी इतर कोणत्याही द्रवाचा पर्याय न निवडता केवळ पाऱ्याचाच सर्वाधिक वापर केला जातो.

मोहावर ताबा

एकदा एक शिकारी जंगलात गेला. त्याने पाहिले, माकडांना पकडण्यासाठी गावकरी एक युक्ती करतात.एक मडके घेतात, त्याला छोटं तोंड असतं. त्या मडक्यात शेंगदाणे टाकतात. माकड येतं, हात आत घालतं आणि मूठभर शेंगदाणे घट्ट पकडतं. मूठ बंद झाली की हात बाहेर निघत नाही. माकडाला वाटतं कोणी तरी माझा हात पकडून ठेवलाय. ते ओरडतं, उड्या मारतं, पण मूठ सोडत नाही. आणि तेवढ्यात शिकारी येऊन त्याला अलगद पकडतो.

शिकारी गुरुने हे आपल्या शिष्याला दाखवले आणि विचारले, माकडाला कोणी पकडले? शिष्य म्हणाला, शिकाऱ्याने.

गुरू म्हणाले, नाही, माकडाला त्याच्या मुठीच्या मोहाने पकडले. जर त्याने शेंगदाण्याचा मोह सोडला आणि मूठ उघडली असती, तर तो या क्षणी मोकळा झाला असता.

आपले पण तसेच आहे.नोकरीचा मोह, पैशाचा मोह, माणसांचा मोह, जुन्या आठवणींचा मोह - आपण मूठ घट्ट धरून बसतो.

आपल्याला वाटते जगाने आपल्याला पकडून ठेवले आहे. पण खरे तर आपणच मोहाची मूठ उघडत नाही. ज्या क्षणी मूठ उघडशील, त्याच क्षणी तू स्वतंत्र होशील.

बोध : मोह आवरता यायला हवा नाही तर तो आपल्याला अडकवतो.

आत्मशक्ति

अध्यात्मिक शक्ती

असा हा ध्यान अभ्यास आम्ही कार्यालयात, घरी, बस किंवा रेल्वेमध्ये, जहाजात अथवा बाहेर कोठेही करू शकतो. ह्यासाठी आम्हाला घरदार सोडून कोठे जंगलात, गिरीकंदरात जाण्याची आवश्यकता नाही. आम्ही कोठेही असू तेथे हा अभ्यास करता येतो. खुर्ची, सोफा किंवा जमिनीवर बसूनही करू शकतो. आम्ही झोपूनही भजन अभ्यास करू शकतो. परंतु हा सल्ला दिला जात नाही, कारण ह्या स्थितीत आम्हाला झोप येऊ शकते. परंतु जर आम्ही आजारी असलो अथवा बसू शकत नसलो तर आम्ही पडल्या पडल्या भजन अभ्यास करू शकतो.

ध्यानअभ्यास : आत्मज्ञानाचा मार्गसुरुवातीस ध्यानाची मुद्रावस्था निश्चित करून आपले डोळे बंद करा. त्यानंतर मनाने थोडावेळ गुरुमंत्राचा जप करा व ध्यान स्थिर करून जो अंधार दिसेल तो पहा. तो अंधार पाहणारे आमचे बाह्य नेत्र नसून अंतर्नेत्र म्हणजेच आत्मनेत्र असते. दिसणाऱ्या अंधाराच्या मध्यभागी पहावे. आम्हाला चक्षु गोलाच्या समोर पहावयाचे आहे. अगदी जमिनीच्या समांतर आठ, दहा इंच अंतर राखून समोरासमोर वस्तु निरखून पाहतो. आम्ही आपले डोळे उर्ध्व करू नये कारण त्यामुळे आमच्या डोळ्यांवर ताण येईल आणि आमचे डोके दुखू लागेल. अगदी आरामात झोपतांना जसे डोळे बंद करता तसे करून आपल्यासमोर पहावयाचे आहे.सुरुवातीला अंधार दिसेल. परंतु आपण समोरच पहात राहिलो तर लाल, पिवळा, नारंगी, निळा, हिरवा, जांभळा अथवा सफेद किंवा सोनेरी रंगाचा प्रकाश दिसेल. आम्हाला अंतरी आकाश दिसेल. त्यात चांदण्या, चंद्र अथवा सूर्य पहावयास मिळतील. आम्हाला जे काही दिसेल त्याच्या मधोमध पहावे. शेवटी आम्ही अंतरीय आश्चर्य पहाण्यात मग्न होऊ म्हणजे आत्मा देहभासाच्या वर जाऊ लागेल आणि तो आध्यात्मिक मंडळात उड्डाण करू लागेल. शब्द (श्रुती) वर ध्यान एकाग्र करण्याच्या अभ्यासाने आम्हाला अंतरकानाने अंतरीय नाद ऐकू येईल.

(क्रमशः)

(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)

चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

नाती घट्ट विणू या

सुरेश ओबेरॉय :

एकदा, माझं विमान उतरल्यानंतर, मी स्वतः माझं सामान उचललं. माझ्या एका सहप्रवाशाने मला, तुम्ही असं का केलंत? असं विचारलं. मी त्याला सांगितलं की, मी स्वतःमध्ये आणि माझ्या मानसिकतेमध्ये बदल करायचा प्रयत्न करत होतो. तो मला म्हणाला की, तुम्हाला स्वतःमध्ये खूप काही बदल करावे लागतील आणि त्यासाठी प्रचंड कष्ट पडतील.

शिवानीदीदी :

जर तुम्ही कुठलाही संस्कार बदलायला गेलात तर सुरुवातीला तुमचं मन त्यासाठी विरोध करेल. कोणत्याही परिस्थितीत ते हाच विचार करेल की, मी इकॉनॉमी क्लासने प्रवास केला तर लोक काय म्हणतील? पण स्वतःमध्ये बदल घडवणं इतकंही अवघड नसतं.तथापि यासाठी आपल्याला आपल्या सुविधांच्या स्तरात जाणूनबुजून तडजोड करत इकॉनॉमी क्लासने प्रवास करायची गरज नाही. आपण कोणत्याही परिस्थितीत आणि आपल्या क्षमतेनुसार काम करायला हवं हे महत्त्वाचं!

सुरेश ओबेरॉय : हो, आपल्या सुखसुविधांचा त्याग करण्यात काहीच अर्थ नाही. आध्यात्मिक गूढताचा मी केलेला तो एक वैयक्तिक प्रयत्न होता. मला खूप प्रसिद्ध लोक माहित आहेत जे अत्यंत विनम्रतेने राहतात. त्यांचे कार्य हीच त्यांची ओळख आहे.

शिवानीदीदी : त्यांच्या कामापेक्षा, लोक त्यांच्या नीतिमूल्यांचा आदर करतात.जर आपण करिअरमध्ये खूप यश मिळवलं पण आपली नीतिमूल्यं विरुद्ध प्रकारची असतील तर लोक आपला आदर करणार नाहीत. तरीसुद्धा कदाचित लोक आपल्याला बसायला जागा देतील किंवा सलाम ठोकतील पण तो सहज भावातून आलेला आदर मात्र नसेल. मनापासून मिळालेला सलाम किंवा आदर आपल्या मिळकतीला, पदाला किंवा यशाला नसतो. तो आपल्या गुणांमुळे आणि वैशिष्ट्यांमुळे मिळतो.

सुरेश ओबेरॉय :

जेव्हा आपण हॉटेलमध्ये जातो तेव्हा तिथला दुसऱ्याल आपल्याला नाही तर आपल्या गाडीला सलाम ठोकतो. जर खरंच कोणी आपला आदर करावा असं आपल्याला वाटत असेल तर आपल्याला या सगळ्यापासून वर यावं लागेल.

(क्रमशः)

(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)

हसा आणि शतायुषी व्हा!

मुलगा : बाबा, मला एक खोटं बोलायचं आहे, पण भीती वाटते.

वडील : का रे? खोटं बोलायला कसली भीती?

मुलगा : तुम्ही लहानपणी कसे हुशार होतात,

हे सांगताना जी भीती तुम्हाला वाटते ना, अगदी तशीच!

करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* 'महाराष्ट्र केसरी' ही कुस्ती स्पर्धा कोणत्या वर्षी सुरू झाली?

– १९६१

– अरविंद ब्राम्हणे, भिंगार मो. ९४०३७३४२८१

आयुर्वेदिक गर्भसंस्कार

आयुर्वेदिक गर्भसंस्कार

यातील पहिले अन्न बाळाला देताना या अन्नापासून माझ्या बाळाची शारीरिक व मानसिक वाढ चांगली होऊन त्याच्यापान ५३ आरोग्याचे रक्षण व्हावे अशी ईश्वराजवळ प्रार्थना करावी व खालील अन्नपूर्णा देवीचा मंत्र म्हणून बाळाला पहिला घास भरवावा

बाळ सहाव्या महिन्याचे झाल्यानंतर शुभदिवशी कान टोचले जातात. मुलगा असल्यास पहिल्यांदा उजवा कान व मुलगी असल्यास पहिल्यांदा डावा कान टोचावा यालाच कर्णवेधन संस्कार म्हणतात.

९) मुंडण संस्कार :

जन्मानंतर काही महिन्यांनी शुभदिवशी बाळाचे जावळ काढतात यालाच मुंडण संस्कार म्हणतात.

१०) उपनयन संस्कार : या उपनयन संस्कारालाच मुंज करणे असे म्हणतात. उपनयनचा अर्थ जवळ घेऊन जाणे. हा संस्कार, वयाच्या आठव्या वर्षी केला जातो. बालक आध्यात्मिक जीवनात प्रवेश करतो; म्हणून त्याचा दुसरा जन्म मानला जातो. शुभदिवशी अग्निदेवता, ब्राह्मण व वेद यांचे पूजन करावे व अधिकाधिकमध्ये दही, मध, साजुक तूप यांची आहुती द्यावी व ॐ भूः स्वाहा : या ॐकाराचा विधीपूर्वक जप करून घृताची आहुती देत राहावी.

११) वेदारंभ संस्कार :

बालकाचे वय शिक्षणाच्या योग्य झाल्यानंतर गुरू किंवा पित्याकडून हा संस्कार केला जातो. आपले बालक वयाच्या चौथ्या व पाचव्या वर्षी ज्ञानार्जनासाठी जेव्हा शाळेत जाईल त्या शुभदिवशी वेदारंभ संस्कार करावा.

(क्रमशः)

डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर

अहिल्यानगर

मोबाईल नं- ८७९३४००४००

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

विज्ञानवार्ता

‘आयव्हीएफ’ उपचार आता होणार वेदनारहित!

इन विट्रो फर्टिलायझेशन’ (आयव्हीएफ) प्रक्रियेतून जार्णा?या महिलांसाठी एक दिलासादायक बातमी आहे. आयव्हीएफ उपचारादरम्यान स्त्री बिजे संकलित करण्यापूर्वी अनेक आठवडे दररोज हार्मोनल इंजेक्शन्स घ्यावी लागतात. आता संशोधकांनी या वेदनादायक सुयांना पर्याय म्हणून एक ‘लाईट-ॲक्टिव्हेटेड मायक्रोनीडल पॅच’ विकसित केला आहे, जो स्वयंचलितपणे शरीरात औषध सोडू शकतो.

मॅकगिल विद्यापीठ आणि क्यूबेक येथील खछठड संशोधन केंद्राच्या शास्त्रज्ञांनी हा ‘स्मार्ट पॅच’ तयार केला आहे. या पॅचमध्ये अतिशय सूक्ष्म सुया आहेत, ज्यात ‘ल्युप्रोलाईड’ नावाच्या हार्मोनचे नॅनोकण भरलेले असतात. या पॅचचे वैशिष्ट्य म्हणजे : प्रकाशामुळे सक्रिय होणारे औषध : यातील नॅनोकणांवर एक खास आवरण असते, जे कमी ऊर्जेच्या ‘निअर-इन्फ्रारेड लाईट’च्या संपर्कात येताच विरघळते आणि औषध शरीरात सोडले जाते. कमी वेदना : हा पॅच त्वचेवर लावल्यावर इंजेक्शन्ससारख्या तीव्रवेदना होत नाहीत. स्वयंचलित टायमिंग : हा प्रकाश विशिष्ट वेळी सुरू होण्यासाठी प्री-प्रोग्राम केला जाऊ शकतो, ज्यामुळे दररोज एकाच ठरावीक वेळी औषध आपोआप शरीरात पोहोचते.

अभ्यासाच्या मुख्य लेखिका आणि मटेरिअल केमिस्ट मार्ता सेरुटी यांनी सांगितले की, ‘आयव्हीएफ अपयशी ठरण्याचे एक मुख्य कारण म्हणजे, औषधे दररोज ठरावीक वेळी न घेतली जाणे.’ सध्या रुग्णांना स्वतःलाच ही इंजेक्शन्स टोचून घ्यावी लागतात, जे अनेकांसाठी भीतीदायक आणि गैरसोयीचे असते. हा पॅच ही समस्या सोडवू शकतो. नोव्हेंबर २०२५ मध्ये ‘स्मॉल’ या नियतकालिकात प्रसिद्ध झालेल्या संशोधनानुसार, उंदरांवर करण्यात आलेली ही प्राथमिक चाचणी यशस्वी झाली आहे. यात कोणतीही बाह्य अपायकारक द्रव्ये शरीरात न सोडता वेदनारहित पद्धतीने हार्मोन वितरण शक्य झाले आहे. सुरुवातीला संशोधक या पॅचचा वापर कर्करोगाच्या रुग्णांना औषधे देण्यासाठी करण्याचा विचार करत होते. मात्र, पीएच.डी. विद्यार्थिनी विविएन टॅम हिच्या सूचनेवरून आयव्हीएफ रुग्णांसाठी याचा वापर करण्यावर संशोधन केंद्रित करण्यात आले. भविष्यात या तंत्रज्ञानाचा वापर मानवी उपचारांसाठी झाल्यास, आयव्हीएफ प्रक्रिया केवळ सोपीच नाही, तर अधिक यशस्वी होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. ◆◆◆

दीड लाख वर्षांपूर्वीची प्रगत दगडी हत्यारे

मध्य चीनमधील हेनान प्रांतात पुरातत्त्वशास्त्रज्ञांना मानवी इतिहासातील अत्यंत महत्त्वाचे पुरावे सापडले आहेत. सुमारे १,६०,००० वर्षांपूर्वीचे आदिमानव प्रगत दगडी हत्यारे वापरत असल्याचे या संशोधनातून समोर आले आहे. या शोधामुळे ‘आशियातील पाषाणयुगीन तंत्रज्ञान युरोप आणि आफ्रिकेच्या तुलनेत मागे होते,’ या जुन्या समजाला मोठे आव्हान मिळाले आहे.

२०१७ मध्ये शोध लागलेल्या ‘शिगौ’ या ठिकाणी उत्खननादरम्यान २,६०० पेक्षा जास्त दगडी हत्यारे सापडली आहेत. ‘नेचर कम्युनिकेशन्स’ या जर्नलमध्ये प्रसिद्ध झालेल्या अहवालानुसार :

जोड-हत्यारे : शास्त्रज्ञांना प्रथमच अशी हत्यारे सापडली आहेत, जी लाकडाच्या किंवा अन्य कोणत्याही दांड्याला जोडलेली होती. पूर्व आशियातील ‘संयुक्त हत्यारांचा’ हा सर्वात जुना पुरावा मानला जात आहे.

नियोजन आणि कौशल्य : ही हत्यारे बनवण्याची पद्धत अत्यंत प्रगत होती. ती तयार करण्यासाठी अनेक मधल्या पार्य?यांचा वापर केला गेला, ज्यातून त्या काळातील मानवाचे ‘नियोजन आणि दूरदृष्टी’ दिसून येते. ग्रिफिथ युनिव्हर्सिटीच्या ऑस्ट्रेलियन रिसर्च सेंटर फॉर ह्युमन इव्होल्युशनचे संचालक मायकेल पेट्राग्लिया यांनी सांगितले की, ‘दगडाला दांडा जोडल्यामुळे हत्याराची ताकद आणि कार्यक्षमता वाढली होती. सूक्ष्म तपासणीत असे दिसून आले आहे की, या हत्यारांचा वापर वनस्पती, लाकूड किंवा बोरू कापण्यासाठी किंवा त्यांना छिद्र पाडण्यासाठी केला जात असावा. ‘ही हत्यारे कोणत्या मानवी प्रजातीने बनवली आहेत, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. युनिव्हर्सिटी ऑफ वॉशिंग्टनचे प्राध्यापक बेन मारविक यांच्या मते, त्या काळात या प्रदेशात ‘डेनिसोव्हन्स’, ‘होमो लाँगी’, ‘होमो जुलुएन्सिस’ किंवा ‘होमो सेपियन्स’ यांसारख्या विविध मानवी प्रजाती अस्तित्वात होत्या. भविष्यात सापडणारे जीवाश्म किंवा डीएनए चाचण्या या रहस्यावरून पडदा उचलू शकतील. पूर्व आशियात ३,००,००० वर्षांपूर्वीची लाकडी हत्यारे आधीच सापडली होती. परंतु, दोन वेगळ्या वस्तूंना जोडून बनवलेले हे पहिलेच प्रगत तंत्रज्ञान समोर आले आहे. हा शोध सिद्ध करतो की, प्राचीन आशियाई मानवी संस्कृती तांत्रिकदृष्ट्या खूप प्रगत होती. ◆◆◆

मशरूमबाबत संभ्रम का?

सोशल मीडियावर अनेकदा अंडी, पनीर किंवा मशरूमवरून वादाच्या फैरी झडत असतात. सध्या मशरूमबाबत पुन्हा एकदा तोच जुना प्रश्न विचारला जात आहे: मशरूम म्हणजेच आळिंबी नक्की शाकाहारी आहे की, मांसाहारी? काही लोक ते आवडीने खातात, तर काही जण त्याला मांसाहारी समजून ताटापासून दूर ठेवतात. मशरूम दिसायला भाजीसारखा असतो; पण त्याची चव काहीशी मांसासारखी लागते, त्यामुळे हा संभ्रम निर्माण होणे स्वाभाविक आहे. आता शास्त्रज्ञांनी यावर स्पष्ट उत्तर दिले आहे.

मशरूमबाबतची सर्वात मोठी चूक म्हणजे लोक त्याला ‘भाजी’ किंवा ‘मांस’ या दोनच श्रेणींमध्ये बसवण्याचा प्रयत्न करतात. मात्र, विज्ञानानुसार मशरूम हे ना झाड आहे ना प्राणी. हे एका वेगळ्या जैविक वर्गात येते, ज्याला ‘फंगी’ किंवा ‘कवक’ म्हटले जाते. या श्रेणीत यिस्ट आणि मोल्डचाही समावेश होतो. म्हणजेच तांत्रिकदृष्ट्या मशरूम ही भाजी नाही; पण याचा अर्थ असाही नाही की, ते मांसाहारी पदार्थ आहे. झाडांना जगण्यासाठी सूर्यप्रकाशाची गरज असते. कारण, ते क्लोरोफिलच्या मदतीने प्रकाशसंश्लेषण करतात; पण मशरूममध्ये क्लोरोफिल नसते.

मशरूम अन्नासाठी सूर्यप्रकाशावर अवलंबून नसून ते कुजलेले पालापाचोळा, लाकूड किंवा मृत जैविक पदार्थांपासून पोषण मिळवतात. त्यांची वाढ होण्याची पद्धत झाडांपेक्षा वेगळी आणि काही प्रमाणात प्राण्यांसारखी (दुसऱ्यावर अवलंबून असणारी) असली, तरी त्यामुळे ते प्राणी ठरत नाहीत. मशरूम जैविकदृष्ट्या वेगळ्या श्रेणीत असले, तरी खाण्याच्या बाबतीत ते पूर्णपणे शाकाहारी आणि ‘व्हेगन’ मानले जाते. याची काही प्रमुख कारणे अशी:

पशू उत्पादनांचा अभाव : मशरूमच्या उत्पादनात कोणत्याही प्राण्याचा किंवा प्राण्यांपासून मिळणाऱ्या पदार्थाचा वापर होत नाही.

पोषक तत्त्वांचा खजिना : यामध्ये प्रथिने, विटामीन बी, विटामीन डी आणि सेलेनियम यांसारखे पोषक घटक भरपूर प्रमाणात असतात.

मांसाहाराला पर्याय : मशरूमची चव आणि पोत मांसासारखा वाटत असल्याने, शाकाहारी लोकांसाठी याला मांसाचा एक उत्तम आणि आरोग्यदायी पर्याय मानले जाते.

निष्कर्ष : स्वयंपाकघरात मशरूमचा वापर भाजीप्रमाणेच केला जातो. त्यामुळे शाकाहारी आणि व्हेगन लोक कोणत्याही संकोचाशिवाय मशरूमचा आपल्या आहारात समावेश करू शकतात. ◆◆◆

पॅरिसमध्ये उभे राहणार भव्य हिंदू मंदिर

फ्रान्स-भारत सांस्कृतिक सहकार्याच्या इतिहासातील एक महत्त्वाचा क्षण नुकताच पॅरिसमध्ये साकार झाला. बुसी-सॉं-झॉर्ज येथे उभारल्या जाणाऱ्या नव्या हिंदू मंदिरासाठी भारतातून आलेल्या पहिल्या दगडांचे औपचारिक स्वागत करण्यात आले. या समारंभाने फ्रान्समधील आपल्या प्रकारातील पहिले पारंपरिक हिंदू मंदिर उभारण्याच्या पुढील टप्प्याची सुरुवात झाली. स्वामीनारायण संप्रदायाचे हे मंदिर प्राचीन कारागिरीच्या पद्धती आणि सामायिक कौशल्यांच्या आधारे बांधले जाणार आहे. भारतामधून आणलेले आणि पारंपरिक तंत्रांनी तयार केलेले हे दगड शतकानुशतके जपल्या गेलेल्या वास्तुकलेच्या वारशाचे प्रतीक आहेत. यातील काही निवडक दगड भारतातील कुशल कारागिरांनी हाताने कोरले आहेत, ज्यामध्ये पिढ्यान्पिढ्या चालत आलेल्या प्राचीन पद्धती जपल्या गेल्या आहेत आणि त्यानंतर त्यांचा फ्रान्सकडे प्रवास सुरू झाला.

फ्रान्समध्ये भारतीय कारागीर फ्रेंच दगडकाम तज्ज्ञांसोबत काम करतील, ज्यात नोट्रे-डाम कॅथेड्रलच्या पुनर्बांधणीमध्ये सहभागी असलेले कारागीरही आहेत आणि अशाप्रकारे भारतीय कोरीव परंपरा व फ्रान्सची सुप्रसिद्ध दगडकाम कौशल्ये एकत्र येतील. हा समारंभ केवळ पारंपरिक पद्धतीने कोरलेल्या दगडांच्या आगमनापुरता मर्यादित नव्हता; तो संस्कृती, मूल्ये आणि ज्ञान यांच्या संगमाचे प्रतीक होता. हे मंदिर केवळ उपासनेसाठीच नव्हे, तर संस्कृती, शिक्षण आणि समुदाय सहभागासाठी समर्पित जागा निर्माण करण्याच्या व्यापक दृष्टिकोनाचा भाग आहे.

पूर्ण झाल्यानंतर हे मंदिर भारत आणि फ्रान्समधील मैत्रीचे चिरस्थायी प्रतीक ठरेल. स्थानिक व राष्ट्रीय प्रतिनिधी तसेच समुदाय नेते या समारंभास उपस्थित होते आणि फ्रान्ससाठी या प्रकल्पाचे महत्त्व व आंतरसांस्कृतिक समज वाढवण्यात त्याची भूमिका याची त्यांनी दखल घेतली. पॅरिस मंदिर बांधकाम प्रकल्पाचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि BAPS UK Europe चे विश्वस्त संजय कारा यांनी सांगितले. ‘भारतामधून आलेल्या पहिल्या दगडांचे आगमन हा एक ऐतिहासिक टप्पा आहे. प्रत्येक दगडात वारसा, काळजी आणि उद्देश दडलेला आहे.

सामायिक आदर आणि सहकार्याच्या माध्यमातून भारतीय परंपरा आणि फ्रेंच अभियांत्रिकी यांचा संगम यातून दिसून येतो. सेवा, नम्रता आणि सलोखा यावर भर देर्णा?या महंत स्वामी महाराज यांच्या मूल्ये व दृष्टिकोनाने मार्गदर्शित होत, भारतीय आणि फ्रेंच तज्ज्ञांना एकत्र आणणाऱ्या या प्रकल्पाचा भाग होणे हा सन्मान आहे. हे मंदिर केवळ भक्तांसाठीच नव्हे, तर व्यापक समाजासाठीही संस्कृती, शिक्षण आणि सौहार्दाचे केंद्र बनेल,’ असे संजय कारा म्हणाले. ◆◆◆

सोडियम बॅटरी: लिथियमला सक्षम पर्याय

स्मार्टफोनपासून इलेक्ट्रिक वाहनांपर्यंत सर्वत्र वापरल्या जाणाऱ्या लिथियम-आयन बॅटरीला आता एक शक्तिशाली आणि सुरक्षित पर्याय उपलब्ध झाला आहे. टोकियो युनिव्हर्सिटी ऑफ सायन्सच्या संशोधकांनी नवीन सोडियम-आयन बॅटरी विकसित केली असून, ही बॅटरी लिथियम बॅटरीपेक्षा अधिक वेगाने चार्ज होणारी, सुरक्षित आणि उच्च ऊर्जा क्षमता असणारी असल्याचा दावा शास्त्रज्ञांनी केला आहे.



सध्याच्या बहुतेक उपकरणांमध्ये लिथियम-आयन बॅटरी वापरली जाते. मात्र, लिथियमचा वाढता खर्च आणि मर्यादित साठा यामुळे शास्त्रज्ञ दीर्घकाळापासून ‘सोडियम’चा पर्याय शोधत होते. सोडियम स्वस्त आणि मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे. ‘केमिकल सायन्स’ या जर्नलमध्ये १५ डिसेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध झालेल्या शोधनिबंधानुसार, संशोधकांनी एका नवीन कार्बन-आधारित इलेक्ट्रोलाईटचा वापर करून सोडियम बॅटरीमधील तांत्रिक अडथळे दूर करण्यात यश मिळवले आहे. सोडियम बॅटरीमध्ये ‘हार्ड कार्बन’चा वापर केला जातो, जो सोडियम आयन साठवण्यासाठी उत्तम मानला जातो. सिद्धांतानुसार हे साहित्य वेगाने चार्ज व्हायला हवे, मात्र प्रत्यक्षात आयनचा प्रवाह वेगवान असताना त्यात ‘ट्रॅफिक जॅम’सारखी स्थिती निर्माण होऊन चार्जिंगचा वेग मंदावत असे. यावर उपाय म्हणून संशोधकांनी ॲल्युमिनियम ऑक्साईडचा वापर : हार्ड कार्बनसोबत ॲल्युमिनियम ऑक्साईडचे मिश्रण करून एक नवीन इलेक्ट्रोड तयार केला. अडथळे दूर केले. यामुळे सोडियम आयन कोणत्याही अडथळ्याशिवाय वेगाने प्रवाहित होऊ लागले. प्रक्रिया सुलभ : संशोधनात असे दिसून आले की, हार्ड कार्बनमधील सूक्ष्म छिद्रांमध्ये आयन जमा होण्यासाठी सोडियमला लिथियमच्या तुलनेत कमी ऊर्जेची गरज भासते. टोकियो युनिव्हर्सिटी ऑफ सायन्सच्या उपयोजित रसायनशास्त्र विभागातील प्राध्यापक आणि या अभ्यासाचे मुख्य लेखक शिनिची कोमाबा यांनी एका निवेदनात स्पष्ट केले की, ‘जलद चार्ज होणाऱ्या सोडियम-आयन बॅटरीसाठी सुधारित ‘हार्ड कार्बन’ साहित्य विकसित करताना, त्यातील छिद्रे भरण्याच्या प्रक्रियेचा वेग वाढवणे हा मुख्य कळीचा मुद्दा आहे, जेणेकरून उच्च चार्जिंग रेटवरही त्याचा वापर करता येईल. तसेच, आमचे निष्कर्ष असे सूचित करतात की, लिथियमच्या तुलनेत कमी सक्रिय ऊर्जा लागत असल्यामुळे, सोडियम समाविष्ट करण्याची प्रक्रिया तापमानातील बदलांना कमी संवेदनशील आहे. ‘प्रत्यक्ष व्यवहारात, या निष्कर्षांमुळे ज्या कामांसाठी अत्यंत जलद चार्जिंग किंवा डिस्चार्जिंगची गरज असते, तिथे सोडियम-आयन बॅटरीचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढण्यास मदत होऊ शकते. उदाहरणार्थ, ग्रीड-स्केल बॅटरी ऊर्जा साठवणूक प्रणालींना गरजेनुसार वेगाने वीजपुरवठा करण्याच्या क्षमतेचा मोठा फायदा होईल. तसेच, अक्षय ऊर्जेपासून तयार झालेली ऊर्जा मोठ्या प्रमाणावर साठवून ठेवताना बॅटरी स्थिर आणि सुरक्षित राहणे अत्यंत महत्त्वाचे आहे, ज्यासाठी हे तंत्रज्ञान उपयुक्त ठरेल.

भविष्यातील फायदे

जलद चार्जिंग : लिथियम बॅटरीच्या बरोबरीने किंवा त्यापेक्षाही अधिक वेगाने ही बॅटरी चार्ज होऊ शकते. **कमी खर्च** : सोडियम सहज उपलब्ध असल्याने बॅटरीच्या किमती कमी होऊ शकतात. **सुरक्षा** : पारंपरिक बॅटरीच्या तुलनेत या बॅटरी अधिक स्थिर आणि सुरक्षित आहेत. या शोधामुळे येणाऱ्या काळात इलेक्ट्रिक वाहने आणि इलेक्ट्रॉनिक उपकरणांच्या क्षेत्रात मोठी क्रांती होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. ◆◆◆

आरोग्यापुढे आव्हान प्लास्टिकचे

प्लास्टिकचा सध्याचा वापर मानवी आरोग्यासाठी अत्यंत चिंताजनक वळणावर पोहोचला आहे. ‘द लॅन्सेट प्लॅनेटरी हेल्थ’मध्ये प्रसिद्ध झालेल्या एका ताज्या अभ्यासानुसार, जर प्लास्टिकच्या वापरात तातडीने बदल केले नाहीत, तर २०४० पर्यंत मानवी आरोग्याला होणारा धोका आजच्या तुलनेत दुप्पट होऊ शकतो. अभ्यासात असे दिसून आले आहे की, प्लास्टिक त्याच्या संपूर्ण जीवनचक्रात पर्यावरणात विष कालवते :

९० टक्के कच्चा माल : प्लास्टिकसाठी लागणारा ९० टक्के कच्चा माल (जीवाश्म इंधन) काढण्यापासूनच धोक्याला सुरुवात होते.

आरोग्यावरील परिणाम : २०२४ पर्यंत या स्थितीत सुधारणा न झाल्यास कॅन्सर आणि असंसर्गजन्य रोगांचा धोका मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. जर सध्याची परिस्थिती अशीच राहिली, तर २०४० पर्यंत प्लास्टिकमुळे होणारे नुकसान पुढीलप्रमाणे विभागले जाईल : ग्लोबल वॉर्मिंग (४० टक्के योगदान) : प्लास्टिक निर्मितीमुळे निघर्णा?या ग्रीनहाऊस गॅसेसमुळे जागतिक तापमान वाढेल आणि त्याचे परिणाम आरोग्यावर होतील.

वायू प्रदूषण (३२ टक्के योगदान) : प्लास्टिक निर्मितीच्या प्रक्रियेमुळे हवेचे प्रदूषण वाढेल.

विषारी रसायने (२७ टक्के योगदान) : पर्यावरणात सोडल्या जार्णा?या विषारी रसायनांचा मानवी शरीरावर परिणाम होईल.

इतर कारणे (१ टक्का) : ओझोन थराचा ऱ्हास आणि रेडिएशनमुळे होणारे नुकसान. लंडन स्कूलच्या संशोधक मेगन डीनी यांनी सांगितले की, जर धोरणांमध्ये बदल झाला नाही, तर दरवर्षी होणारे आरोग्याचे नुकसान दुप्पट होईल. ‘२०१६ ते २०४० या कालावधीत जागतिक प्लास्टिक प्रणालीमुळे लोकांच्या निरोगी आयुष्याची एकूण ८३ दशलक्ष (८.३ कोटी) वर्षे कमी होऊ शकतात,’ असा धक्कादायक निष्कर्ष या अभ्यासातून काढण्यात आला आहे. संशोधकांनी स्पष्ट केले आहे की, फक्त कचरा गोळा करणे किंवा रिसायकलिंग करणे पुरेसे नाही.

यावर उपाय काय?: प्लास्टिकचा अनावश्यक वापर पूर्णपणे बंद करणे आणि साहित्याचा पुनर्वापर करणे हाच एकमेव मार्ग आहे. सरकारने नवीन प्लास्टिकच्या उत्पादनावर कडक नियंत्रण आणणे आणि पर्यायी साहित्याला प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. सर्वात जास्त नुकसान हे प्लास्टिकच्या निर्मितीच्या वेळी आणि ते उघड्यावर जाळल्यामुळे होते, ज्यामुळे घातक वायू थेट फुफ्फुसात जातात. ◆◆◆



स्मृतिभ्रंशाची पूर्वलक्षणे आता ‘एआय’ ओळखणार

बौद्धिक क्षमतेत होणारी घट किंवा स्मृतिभ्रंशाची सुरुवातीची लक्षणे अनेकदा अधिकृत निदानापूर्वीच दिसू लागतात. मात्र, ही लक्षणे डॉक्टरांच्या साध्या टिपणांमध्ये दडलेली असतात. आता कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) वापर करून ही सुरुवातीची चिन्हे ओळखणे शक्य असल्याचे एका नवीन संशोधनातून समोर आले आहे.

नुकत्याच ‘पक्षि डिजिटल मेडिसिन’ या जर्नलमध्ये प्रसिद्ध झालेल्या अभ्यासानुसार, एआय प्रणाली डॉक्टरांच्या नोटस्मधील विशिष्ट पॅटर्न शोधून स्मरणशक्ती, विचार करण्याची प्रक्रिया किंवा वर्तनातील बदल यांसारखे धोक्याचे संकेत ओळखू शकते. संशोधनातील महत्त्वाचे मुद्दे- कुटुंबीयांच्या तक्रारींची दखल : रुग्णाला वारंवार होणारा गोंधळ किंवा त्यांच्यासोबत येणाऱ्या नातेवाईकांनी व्यक्त केलेली चिंता, अशा नोंदींमधून एआय संभाव्य आजाराचा अंदाज घेते.

निदान नव्हे, तर ‘स्क्रीनिंग’ ही प्रणाली थेट आजाराचे निदान करत नाही, तर ज्या रुग्णांकडे विशेष लक्ष देण्याची गरज आहे, त्यांना ‘फ्लॅग’ किंवा चिन्हांकित करते.

डॉक्टरांना मदत : मॅसॅच्युसेटसब जनरल हॉस्पिटलमधील न्यूरोलॉजीच्या सहयोगी प्राध्यापक डॉ. लिडिया मौरा यांनी सांगितले की, ‘या प्रणालीचा उद्देश डॉक्टरांची जागा घेणे नसून, त्यांना एक साहायक म्हणून मदत करणे हा आहे. जिथे तज्ज्ञ डॉक्टरांची कमतरता आहे, तिथे ही यंत्रणा अत्यंत उपयुक्त ठरेल.’ या संशोधनासाठी संशोधकांनी एकाच वेळी पाच एआय एजंटस्च्या संचाचा वापर केला आहे. हे पाचही प्रोग्राम्स एकमेकांच्या कामाचे पुनरावलोकन करतात आणि मानवी हस्तक्षेपाशिवाय क्लिनिकल नोटस्चा अचूक अर्थ लावतात. संशोधकांनी यासाठी मेटाच्या 'Llama 3.1' या मॉडेलचा वापर केला.

या प्रणालीला रुग्णालयातील तीन वर्षांच्या डॉक्टरांच्या नोटस्, प्रगती अहवाल आणि डिस्चार्ज समरी अभ्यासायला देण्यात आली होती. या माहितीच्या आधारे ‘एआय’ ने अत्यंत अचूकपणे मानसिक स्थितीतील बदलांचे संकेत शोधून काढले. युनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफोर्नियाच्या तज्ज्ञ जुलिया ॲडलर-मिल्स्टीन यांच्या मते, या स्क्रीनिंगचा फायदा तेव्हाच होईल जेव्हा हे संकेत अचूक असतील आणि ते योग्य वैद्यकीय पथकापर्यंत वेळेत पोहोचतील. जर या माहितीवर आधारित पुढील उपचार प्रक्रिया स्पष्ट असेल, तरच ही यंत्रणा वैद्यकीय क्षेत्रात क्रांती घडवू शकते. ◆◆◆

ज्येष्ठ नागरिकांसाठी ३१ ऑक्टोबरला 'व्यवसायाची दुसरी संधी' सेमिनार

नगर – शासकीय, निमशासकीय किंवा खाजगी सेवेतून निवृत्त झालेले स्वेच्छानिवृत्ती (व्हीआरएस) घेतलेले किंवा वयाच्या एका विशिष्ट टप्प्यानंतर घरात एकटेपणा अनुभवणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांना पुन्हा एकदा सन्मानाने आणि स्वाभिमानाने उभे राहता यावे, यासाठी नगर शहरात एका प्रेरणादायी सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. ४५ ते ६२ वयोगटातील व्यक्तींना आर्थिक व मानसिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी हा उपक्रम आहे. 'व्यवसायाची दुसरी संधी' या संकल्पनेवर आधारित ज्येष्ठांसाठी ३१ ऑक्टोबर रोजी सकाळी १० ते दु. १.३० वाजेपर्यंत नगर-मनमाड रोडवरील हॉटेल श्रद्धा व्हेज येथे हे सेमिनार होईल.

दीर्घकाळ सक्रिय नोकरी केल्यानंतर निवृत्तीच्या सुरुवातीला विश्रांती चांगली वाटते. मात्र, काही महिन्यांतच दिवसभर घरात बसून कंटाळा, वेळेचा अपव्यय आणि सामाजिक संवादाच्या अभावामुळे अनेकांना मानसिक नैराश्य जाणवू लागते. पूर्वी कार्यालयात मिळणारा आदर आणि व्यस्त दिनक्रम अचानक थांबल्याने व्यक्ती अस्वस्थ होतात. ज्येष्ठांकडे दांडगा प्रशासकीय, तांत्रिक व व्यावहारिक अनुभव असतो. या अनुभवाचा व उपलब्ध वेळेचा योग्य विनियोग करून कमी भांडवलात स्वतःचा लघुउद्योग, सल्लागार व्यवसाय किंवा समाजोपयोगी सेवा सुरू करता येऊ शकतो, हाच विचार केंद्रस्थानी ठेवून हा सामाजिक मार्गदर्शन उपक्रम हाती घेण्यात आला आहे.

दिवसभर रिकामेपणामुळे येणारा मानसिक तणाव व एकाकीपण, नियमित आर्थिक मिळकत थांबल्याने स्वावलंबनाची चिंता. प्रदीर्घ अनुभव व कौशल्यांचा कोणताही वापर न होणे, दैनंदिन सामाजिक संपर्क आणि सहकाऱ्यांच्या संवादाची उणीव या निवृत्तीनंतरच्या प्रमुख समस्या आहेत. याचे निराकरण करून नाश्त्याच्या बिलापेक्षा कमी खर्चात, शून्य व कमी भांडवली व्यवसाय. वय व प्रकृतीस अनुकूल असणारे पार्टटाइम व्यवसाय पर्याय. समविचारी मित्रांचे संघटन आणि सामूहिक अनुभवाची देवाणघेवाण याबाबत सेमिनारमध्ये मार्गदर्शन केले जाईल. खास ज्येष्ठांसाठी सेमिनारनंतर मिष्टान्न भोजनाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी फक्त ५० व्यक्तींनाच प्रवेश दिला जाणार असून, नावनोंदणी आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी व प्रवेश निश्चित करण्यासाठी जनसंपर्क अधिकारी सोनल जाखडे (मो. ८९८३९७४७८५) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

रोटरी क्लब ऑफ अहमदनगर प्रियदर्शिनीच्या अनुराधाताई आठरे आणि प्रा. डॉ. आश्लेषा भांडारकर यांच्याकडून बालक मंदिर महिला मंडळ शाळेला डिजिटल बोर्ड प्रदान.

बालक मंदिर महिला मंडळ शाळेस 'रोटरी क्लब'तर्फे डिजिटल बोर्ड प्रदान

नगर – रोटरी क्लब ऑफ प्रियदर्शिनी यांच्यातर्फे २९ ऑक्टोबर रोजी बालक मंदिर महिला मंडळ शाळेस डिजिटल बोर्ड प्रदान करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महिला मंडळ संस्थेच्या अध्यक्षा सौ. ज्योती केसकर होत्या. कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी म्हणून रोटरी क्लब ऑफ प्रियदर्शिनीच्या प्रा. डॉ. सौ. आश्लेषा भांडारकर, ॲड. सौ. अनुराधाताई आठरे, सौ.विभा तांबडे, सौ.सविता काळे या उपस्थित होत्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. अस्मिता शूळ यांनी केले डिजिटल बोर्ड शाळेला मिळण्याचा उद्देश व्यक्त केला. विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञानाशी जुळवून घेत शैक्षणिक प्रगतीचा अजून एक टप्पा या डिजिटल बोर्डच्याद्वारे ओलांडला आहे असे सांगितले.

तसेच सौ. आश्लेषा भांडारकर यांनी विद्यार्थ्यांना मोबाईलचा वापर किती मर्यादित करावा हे स्पष्ट केले. तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता जरी आज पुढे येत असली तरी त्याचा वापर ठराविक मर्यादेपर्यंत करायचा आणि आपले वाचन वाढवावे याबद्दल सांगितले. तसेच रोटरी क्लबतर्फे शाळेला कंपोस्ट खत बनवण्यासाठी साहित्य उपलब्ध करून देण्यात आले. त्या स्वच्छतादूत असल्यामुळे त्यांनी स्वच्छतेचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.

यावेळी ॲड. सौ. अनुराधाताई आठरे यांनी विद्यार्थ्यांना अशा तंत्रज्ञानाचा अधिकाधिक लाभ घेऊन आपली शैक्षणिक प्रगती करावी; यासाठी आम्ही सर्वतोपरी मदत करु असे आश्वासन दिले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महिला मंडळ संस्थेच्या अध्यक्षा सौ. ज्योती केसकर होत्या. त्यांनी विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारे तंत्रज्ञानाची मदत घेऊन आपला अभ्यास अधिक सुलभतेने करावा हे नमूद केले.

या कार्यक्रमासाठी महिला मंडळ संस्थेच्या उपाध्यक्षा डॉ.सौ विद्या होळेहोन्नूर, सेक्रेटरी सौ. ज्योती कुलकर्णी, खजिनदार सौ. पद्मजा धोपावकर, सौ. मीनल गंधे, सौ. उमा देशमुख व श्रीमती पुष्पा चितांबर उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निरुपमा देशपांडे, आभारप्रदर्शन सौ. ठकू पवार यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

गुणवत्तापूर्ण शिक्षणासह रोजगाराभिमुख प्रशिक्षणावर भर

डॉ. पारस कोठारी यांचे प्रतिपादन; भाई सथ्था नाईट हायस्कूलच्या ५७ विद्यार्थ्यांना मासूम संस्थेची संगणक शिक्षणासाठी शिष्यवृत्ती

नगर – रात्र शाळा आणि मासूम संस्था विद्यार्थ्यांचे करिअर घडविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करत आहेत. आधुनिक युगातील गरजा लक्षात घेऊन कौशल्याधारित शिक्षण देण्यावर संस्थेचा विशेष भर आहे. गुणवत्तेच्या बाबतीत आणि विद्यार्थ्यांच्या संख्येच्या दृष्टीने आपली संस्था राज्यात आघाडीवर असल्याचे रात्र शाळेचे चेअरमन डॉ. पारस कोठारी यांनी नमूद केले. विद्यार्थ्यांना मिळालेल्या संधीचे सोने करण्याचे आवाहन करताना ते म्हणाले, की शिष्यवृत्तीच्या माध्यमातून मिळालेल्या मदतीची जाणीव ठेवा. संस्थेने मोठ्या अपेक्षेने ही संधी उपलब्ध करून दिली आहे. त्या अपेक्षांचा भंग होऊ देऊ नका. मेहनत, जिद्द आणि कौशल्याच्या जोरावर आपले भविष्य उज्ज्वल करण्याचे त्यांनी आवाहन केले.

दिवसभर अर्थार्जनासाठी धावपळ, कौटुंबिक जबाबदाऱ्यांचे ओझे आणि या सर्व आव्हानांवर मात करत रात्री शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या भविष्याला नवी दिशा देण्याचा उपक्रम भाई सथ्था नाईट हायस्कूल आणि मासूम संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत भाई सथ्था नाईट हायस्कूलच्या तब्बल ५७ विद्यार्थ्यांना संगणक शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे. या शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांचे अभिनंदन करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना शिक्षणासोबतच आधुनिक तंत्रज्ञानाचे ज्ञान आणि रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.

आजच्या स्पर्धात्मक युगात संगणकाचे ज्ञान आणि व्यावसायिक कौशल्यांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. ही गरज ओळखून मासूम संस्थेच्या शिष्यवृत्तीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विविध संगणक अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. यामध्ये टॅली, ऑफिस असिस्टंट, ग्राफिक डिझाइन, टॅली प्राइम विथ जीएसटी आणि संगणक टायपिंग आदी अभ्यासक्रमांचा समावेश आहे. या प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांना व्यावसायिक कौशल्ये आत्मसात करून रोजगाराच्या संधी मिळविण्यासाठी मदत होणार आहे.

प्रमुख पाहुणे म्हणून शाळेचे माजी विद्यार्थी आणि आर्मी पब्लिक स्कूलमधील क्रीडा शिक्षक प्रमोद डोंगरे उपस्थित होते. रात्र शाळेचे चेअरमन डॉ. पारस कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम पार पडला.

प्रमुख पाहुणे प्रमोद डोंगरे यांनी रात्र शाळेतील आपल्या अनुभवांना उजाळा दिला. ते म्हणाले की, रात्र शाळेत शिक्षण घेत असताना क्रीडा क्षेत्रातून करिअर घडविण्यासाठी शाळेने मोठा आधार दिला. राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांसाठी जातानाही शाळेने खर्चाची जबाबदारी उचलून सहकार्य केले. रात्र शाळा केवळ शिक्षण देण्याचे काम करत नाही, तर विद्यार्थ्यांना जीवनात स्वतःच्या पायावर उभे करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करते, असे त्यांनी नमूद केले.

प्राचार्य सुनील सुसरे यांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. ते म्हणाले की, इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी मासूम संस्थेच्या माध्यमातून अतिरिक्त तास घेतले जातात. त्याचबरोबर विद्यार्थ्यांना व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रशिक्षणही दिले जात आहे. या संधींचा लाभ घेऊन अनेक विद्यार्थी समाजात स्वतःचे स्थान निर्माण करत आहेत. विद्यार्थ्यांना शिक्षण, शिष्यवृत्ती आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी रात्र शाळा आणि मासूम संस्था एकत्रितपणे कार्यरत आहेत. विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक ज्ञान न देता त्यांना प्रत्यक्ष जीवनात उपयोगी पडणारी कौशल्ये आत्मसात करता यावीत, यासाठी सातत्याने प्रयत्न केले जात असल्याचे प्राचार्य सुसरे यांनी सांगितले.

शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांची यादी बाळू गोरडे यांनी वाचून दाखविली. शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष ॲड. अनंत फडणीस, कार्याध्यक्ष अनंत देसाई, मानद सचिव सुमतीलाल कोठारी, माजी मानद सचिव संजय जोशी आणि ज्येष्ठ मार्गदर्शक अजित बोरा यांनी अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी हिंद सेवा मंडळाच्या सेवकांची सहकारी पतपेढीच्या चेअरमनपदी निवड झाल्याबद्दल अमोल कदम यांचा सत्कार करण्यात आला.विद्यार्थ्यांच्या संगणक शिक्षणासाठी शिष्यवृत्ती उपलब्ध करून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावल्याबद्दल मासूम संस्थेच्या संचालिका निकिता केतकर आणि डायरेक्टर कमलाकर माने यांचे विशेष आभार मानण्यात आले. सूत्रसंचालन अनुराधा दरेकर यांनी केले. कैलास करांडे यांनी परिचय करून दिला. अशोक शिंदे यांनी आभार मानले.

इस्रो शैक्षणिक सहल प्रवेश परीक्षेत दूर्वा बेरड जिल्ह्यात अव्वल

इस्रो शैक्षणिक सहल प्रवेश परीक्षेत दूर्वा बेरड जिल्ह्यात अव्वल आल्याबद्दल शिक्षणाधिकारी प्राथमिक भास्कर पाटील यांच्या हस्ते दूर्वाचा सन्मान करण्यात आला. (छायाचित्र – लहू दळवी)

नगर – मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांच्या संकल्पनेतून आयोजित इस्रो शैक्षणिक सहल प्रवेश परीक्षेच्या अंतिम जिल्हास्तरीय यादीत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, निंबोडी, ता. नगर येथील विद्यार्थिनी दूर्वा बेरड हिने जिल्ह्यात अव्वल क्रमांक पटकावला. या यशाबद्दल शिक्षणाधिकारी प्राथमिक भास्कर पाटील यांच्या हस्ते दूर्वाचा सन्मान करण्यात आला.

इयत्ता सहावीच्या गटातून दूर्वा बेरड हिने जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळविला. नियमित अभ्यास, सखोल मार्गदर्शन आणि सातत्यपूर्ण प्रयत्न यांच्या बळावर तिने हे यश संपादन केले.

यावेळी शिक्षणाधिकारी भास्कर पाटील म्हणाले की, निंबोडी शाळेने सातत्याने विविध शैक्षणिक उपक्रमांमध्ये उल्लेखनीय यश मिळविले आहे. सलग दोन वर्षे या शाळेतील विद्यार्थ्यांना इस्रो शैक्षणिक सहलीसाठी जाण्याची संधी मिळाली असून, शाळेची गुणवत्तेतील आघाडी कायम आहे. 'रीडिंग बेल', 'कुसुमाग्रज वाचनालय', 'माझी आदर्श शाळा', 'मिशन आरंभ' आणि 'मिशन आपुलकी' यांसारखे विविध उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात येत आहेत. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेला चालना मिळत असून, जिल्हा परिषद अहिल्यानगर राज्यात अव्वल ठरण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे, असे पाटील यांनी नमूद केले.

या यशाबद्दल गटविकास अधिकारी अक्षय गोर्डे, गटशिक्षणाधिकारी तृप्ती कोलते, सरपंच जयराम बेरड, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सचिन गवळी, विस्ताराधिकारी प्रवीण बेलदार आणि केंद्रप्रमुख भास्कर नरसाळे यांनी तिचे अभिनंदन केले.

या कार्यक्रमासाठी टाकळी काझी केंद्राचे केंद्रप्रमुख भास्कर नरसाळे, जनाधार सामाजिक संघटनेचे प्रकाश पोटे, माजी सरपंच व दूर्वाचे पालक शंकर बेरड, मुख्याध्यापक रघुनाथ खांदवे, वर्गशिक्षक अंतोन पवार, प्रवीण थोरात, नंदा डहाळे, मंदाकिनी साठे, मनिषा देशमुख, शैला धामणे, शरद बोरूडे, सविता म्हस्के, हिरा देवकर, वर्षा भांबिरे आदी उपस्थित होते.

अहिल्यानगरमध्ये १ नोव्हेंबरला महिलांसाठी मोफत कॅन्सर तपासणी शिबिराचे आयोजन

नगर – महिलांमध्ये वाढत्या कॅन्सरच्या आजारांवर वेळीच नियंत्रण मिळवण्यासाठी आणि जनजागृती करण्यासाठी सावेडी येथील अपंग संजीवन सोसायटीच्या मूकबधिर विद्यालय तसेच डी.बी. फाउंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमानाने विद्यालयामध्ये महिलांसाठी मोफत कॅन्सर तपासणी व मार्गदर्शन शिबिराचे आयोजन १ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता अपंग संजिवनी सोसायटी संचलित, मुकबधीर विद्यालय व वसतिगृह, सावेडी येथे करण्यात आले असल्याची माहिती संचालिका विद्या भावले यांनी दिली.

माता-भगिनींसाठी आरोग्याची ही एक सुवर्णसंधी उपलब्ध करून देण्यात आली असून, प्रवेश पूर्णपणे विनामूल्य आहे. या शिबिरामध्ये मुंबई येथील टाटा मेमोरियल हॉस्पिटलमध्ये उच्च शिक्षण घेतलेल्या व सध्या विखे मेमोरियल हॉस्पिटल अहिल्यानगर येथे कार्यरत असलेल्या कर्करोगतज्ञ डॉ. प्रियंका पठारे या प्रमुख मार्गदर्शन व व्याख्यात्या म्हणून उपस्थित राहणार असून सामाजिक कार्यकर्त्या किरण बारस्कर आणि डॉ. अश्विनी बोरुडे यांची उपस्थिती असणार आहे.

आधुनिक काळात महिलांच्या आरोग्याची काळजी घेणे अत्यंत गरजेचे बनले आहे. या शिबिरात आरोग्यविषयक मुद्द्यांवर सविस्तर मार्गदर्शन केले जाणार आहे कॅन्सरची प्राथमिक लक्षणे व ओळख, कर्करोगाची सुरुवातीची लक्षणे कशी ओळखावीत, जेणेकरून आजार बळावण्यापूर्वीच त्यावर उपचार करणे शक्य होईल. प्रतिबंधात्मक उपाय व आधुनिक उपचार पद्धती, कॅन्सरपासून बचाव कसा करावा आणि वैद्यकीय क्षेत्रातील आधुनिक उपचार पद्धतींची माहिती स्त्री-आरोग्य व जीवनशैली महिलांच्या आरोग्याशी संबंधित इतरआजार, आहार, व्यायाम आणि तणावमुक्त जीवनशैलीबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

आरोग्याविषयी असलेल्या शंकांचे तज्ज्ञ वैद्याधिकाऱ्यांकडून थेट निरसन होणार आहे. कॅन्सर हा असा आजार आहे ज्याची प्राथमिक स्टेजला ओळख पटल्यास तो पूर्णपणे बरा होऊ शकतो. त्यामुळे महिलांनी आरोग्याबाबत कोणतीही भीती न बाळगता या शिबिराचा महिलांनी लाभ घ्यावा, असे आवाहन अपंग संजिवनी सोसायटीचे चेअरमन मधुकर भावले, विद्या भावले आणि डी.बी. फाउंडेशनच्या संस्थापक- अध्यक्षा दिपाली भावले (ताटे) यांनी केले आहे.

अहिल्यानगरमध्ये १ नोव्हेंबरला रोजगार मेळावा; बारावी ते पदवीधर युवक-युवतींना नोकरीची संधी

संत आन्ना चर्च व अवसर केंद्राचा संयुक्त उपक्रम; नामांकित कंपन्यांचा सहभाग

नगर – बेरोजगार युवक-युवतींना रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने संत आन्ना चर्च आणि अवसर केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने अहिल्यानगरच्या सुवर्णमहोत्सवी मतमाऊली यात्रेनिमित्त १ नोव्हेंबर रोजी रोजगार मेळावा व करिअर मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यात विविध कंपन्यांचे प्रतिनिधी सहभागी होणार असून, बारावी उत्तीर्ण ते पदवीधर युवक-युवतींना नोकरी मिळविण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

हा मेळावा सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत संत आन्ना चर्च आवारात, जुने कलेक्टर ऑफिसजवळ, अहिल्यानगर येथे होणार आहे. नोकरीच्या शोधात असलेल्या तरुणांना संभाव्य नियोक्त्यांशी थेट संवाद साधता यावा, विविध कंपन्यांमधील रोजगाराच्या संधींची माहिती मिळावी आणि आपल्या शैक्षणिक पात्रतेनुसार योग्य करिअर निवडता यावे, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे.

या मेळाव्यात नोकरीच्या संधी, कौशल्य विकास व प्रशिक्षण, नामांकित कंपन्यांमधील भरती प्रक्रिया आणि उज्ज्वल करिअरच्या संधी अशा विविध बाबींवर लक्ष केंद्रित करण्यात येणार आहे. विविध कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार असल्याने नोकरीसाठी इच्छुक उमेदवारांना आपल्या पात्रतेनुसार संधी शोधता येणार आहे. बारावी उत्तीर्ण, पदवीधर तसेच रोजगाराच्या शोधात असलेल्या युवक-युवतींनी या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

मतमाऊली यात्रेच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त धार्मिक आणि सामाजिक उपक्रमांसोबतच युवकांच्या भविष्याचा विचार करून रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. तरुणांना स्वावलंबी बनविणे, त्यांच्या कौशल्यांना योग्य दिशा देणे आणि त्यांना रोजगाराच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता आहे. या दृष्टीने हा रोजगार मेळावा युवक-युवतींसाठी उपयुक्त ठरणार आहे.

रोजगार मेळावा यशस्वी करण्यासाठी संत आन्ना चर्चचे प्रमुख धर्मगुरू मॅकेनरो लोपीस, सहाय्यक धर्मगुरू नाथनियल जॉर्ज तसेच रोजगार आयोजन समितीचे पदाधिकारी व सदस्य परिश्रम घेत आहेत. अहिल्यानगर व परिसरातील बेरोजगार युवक-युवतींनी या रोजगार मेळाव्यास उपस्थित राहून उपलब्ध संधींचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

सिद्धीबाग हॉलमध्ये जागतिक ज्युदो दिन उत्साहात

'आपलेपणा'च्या संकल्पनेतून आजी-माजी ज्युदोपटूंचा स्नेहमेळावा; १०० बाल खेळाडूंचा सहभाग

ज्युदोच्या माध्यमातून आपलेपणाची भावना वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने जागतिक ज्युदो दिन यंग मेन्स ज्युदो असोसिएशनच्या वतीने सिद्धीबाग येथील ज्युदो हॉलमध्ये उत्साहात साजरा करण्यात आला.

नगर – ज्युदो खेळाचा प्रसार, खेळाडूंमधील एकजूट आणि ज्युदोच्या माध्यमातून आपलेपणाची भावना वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने जागतिक ज्युदो दिन यंग मेन्स ज्युदो असोसिएशनच्या वतीने सिद्धीबाग येथील ज्युदो हॉलमध्ये उत्साहात साजरा करण्यात आला.

यंदाच्या जागतिक ज्युदो दिनाची 'बिलाँगिंग' अर्थात 'आपलेपणा' ही संकल्पना होती. या संकल्पनेला अनुसरून आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात आजी-माजी खेळाडूंनी एकत्र येत ज्युदो खेळाविषयीच्या आठवणींना उजाळा दिला. माजी ज्युदो खेळाडू डॉ. प्रियन जुनागडे (सुरभी हॉस्पिटल) आणि अहिल्यानगरमधील व्यापारी व राजेंद्र चोपडा प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. शहरातील विविध क्षेत्रांत नावलौकिक मिळविणारे २० ते २५ माजी ज्युदोपटू तसेच सिद्धीबाग ज्युदो हॉलमधील सुमारे १०० बाल खेळाडूंनी या सोहळ्यात सहभाग घेतला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी आंतरराष्ट्रीय ज्युदोपटू आदित्य धोपावकर याने जागतिक ज्युदो दिन का साजरा केला जातो, याविषयी माहिती दिली. ज्युदोचे जनक डॉ. जिगोरो कानो यांच्या वाढदिवसानिमित्त जागतिक ज्युदो दिन साजरा केला जात असल्याचे त्याने सांगितले. त्यानंतर प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते केक कापून जागतिक ज्युदो दिनाचा आनंद साजरा करण्यात आला.

डॉ. प्रियन जुनागडे यांनी २८ वर्षांपूर्वीच्या ज्युदो क्षेत्रातील आठवणी सांगितल्या.

राजेंद्र चोपडा यांनी माजी खेळाडूंशी संवाद साधत अहिल्यानगरमधील विविध खेळांच्या जुन्या आठवणी आणि संस्मरणीय घटनांना उजाळा दिला. सिद्धीबाग ज्युदो हॉलच्या ४१ वर्षांच्या यशस्वी वाटचालीचे कौतुक करत त्यांनी खेळाडूंच्या प्रगतीसाठी आवश्यक क्रीडा साहित्य खरेदी करण्यासाठी ११ हजार रुपयांची देणगी दिली. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे प्रतिनिधित्व करणारे खेळाडू घडविणाऱ्या या ज्युदो हॉलला भविष्यातही आवश्यक सहकार्य मिळावे, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमासाठी माजी खेळाडू अजय कुलकर्णी, पोलीस अधिकारी गणेश लांडगे, शुभम दातरंगे, शेखर वाघ, विशाल उनवणे, हर्षल कांबळे, विनीत बुरला, फैय्याज सय्यद, शिल्पा (मत्रे) कराळे, शिव घेगडे, सतीश शिंदे, विशाल मेहेत्रे यांच्यासह आजी-माजी खेळाडू व पालक उपस्थित होते. सर्वांना अल्पोपहार देऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

नीट, जेईई, एमएचटी–सीईटी या परीक्षांमध्ये यश संपादन करून वैद्यकीय व अभियांत्रिकीच्या शिक्षणासाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा पार पडला.

वेळेचे नियोजन, मेहनत, संयमाची आवश्यकता : डॉ. श्याम तारडे

जे. जे. सायन्स ॲकॅडमीच्या यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा

नगर – डॉक्टर होण्याचे अनेकांचे स्वप्न असते. केवळ बुद्धीमत्तेच्या बळावर ही स्वप्नपूर्ती होत नाही, तर त्यासाठी सातत्यपूर्ण अभ्यास, वेळेचे नियोजन, प्रचंड मेहनत, संयम आणि अपयशातून पुन्हा उभे राहण्याच्या ताकदीची आवश्यकता असते. आजचा हा गौरव सोहळा विद्यार्थ्यांच्या मेहनतीचा, जिद्दीचा, चिकाटीचा आणि स्वप्नपूर्तीच्या दिशेने टाकलेल्या महत्त्वपूर्ण पावलाचा आहे. नामांकित शैक्षणिक संस्थेत प्रवेश मिळविण्याचे विद्यार्थ्यांनी पाहिलेले स्वप्न पूर्ण झाले आहे. नीटसारख्या स्पर्धा परीक्षेत यश मिळवणे सोपी गोष्ट नाही. महिनोनमहिने केलेल्या मेहनतीचे फळ आज या विद्यार्थ्यांना मिळाले आहे, असे प्रतिपादन डॉ. श्याम तारडे यांनी केले.

जे. जे. सायन्स ॲकॅडमीच्या अहिल्यानगर शाखेच्या वतीने नीट, जेईई, एमएचटी–सीईटी या परीक्षांमध्ये यश संपादन करून नामांकित संस्थेमध्ये वैद्यकीय व अभियांत्रिकीच्या पुढील शिक्षणासाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा पार पडला. त्यावेळी डॉ. तारडे बोलत होते. व्यासपीठावर क्लासिक व्हिल्स व सुमेश इंडस्ट्रिजचे संचालक सुनीत मुनोत, तसेच ॲकॅडमीचे संचालक डॉ. कृष्णकांत झा व योगेश जहागिरदार उपस्थित होते.

श्री. मुनोत म्हणाले की, स्पर्धा परीक्षेत यश मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांची मेहनत, प्राध्यापकांचे मार्गदर्शन व पालकांचे कष्ट याची जोड मिळाल्याने ते मोठ्या प्रमाणात यश मिळवू शकले. ॲकॅडमीने अधिकाधिक चांगल्या पद्धतीने मुलांची तयारी करून घेतल्यामुळे त्यांना आयआयटी, एमएनआयटी, व्हीएनआयटीसारख्या नावाजलेल्या संस्थांमध्ये प्रवेश मिळाला. विद्यार्थ्यांनी जिद्द, मेहनत आणि आत्मविश्वासाच्या जोरावर यशाची नवी शिखरे पादाक्रांत करावीत. इंजिनिअरिंग क्षेत्रात करिअरच्या मोठ्या संधी असून, केवळ पदवी मिळविण्यावर लक्ष केंद्रीत न करता ज्ञान, कौशल्य, नाविन्यपूर्ण विचार आणि तंत्रज्ञानातील बदल आत्मसात करण्यावर भर द्यावा. यापुढील काळात विद्यार्थ्यांना नवीनवीन संधी उपलब्ध होणार आहे. सर्वच क्षेत्रात भारताची भावी पिढी अधिक सक्षम व कर्तबगार असेल, असे ते म्हणाले. संचालक डॉ. झा व जहागिरदार यांनी स्वागत करताना नगरबरोबरच मुलुंड (मुंबई) व ठाणे येथील जे. जे. च्या शाखांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना घडविण्यात योगदान दिले जात असल्याचे सांगितले.

वैद्यकीय संस्थेत प्रवेश मिळविलेले विद्यार्थी

नीट, जेईई व एमएचटी–सीईटी–२०२६ परीक्षेत उत्कृष्ट कामगिरी करून विविध संस्थांत प्रवेश मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सन्मान करण्यात आला. वैद्यकीय क्षेत्रात शार्दूल सुरवसे (एम्स, दिल्ली), धन राजहंस (एम्स, नागपूर), मृण्मयी गिरमे (बी. जे. मेडिकल कॉलेज, पुणे), आयुष लांडे (जीडीसी, मुंबई), यश गायकवाड (टोपीवाला नायर मेडिकल कॉलेज, मुंबई), वैष्णवी तरटे (एचबीटी कुपर, मुंबई), गायत्री घुले (जीएमसी, कोल्हापूर), यथार्थ गवळी (जीएमसी, जळगाव), निवेदिता जावळे (हिरे मेडिकल कॉलेज, धुळे), सिद्धेश शिंदे (जीएमसी, अंबरनाथ), अथर्व जाधव (जीएमसी, सिंधूदुर्ग), साक्षी स्नेहील (जीएमसी, मिरज), अर्पिता मोरे (जीएमसी, लातूर), वैष्णवी धारडे (राजीव गांधी मेडिकल कॉलेज, ठाणे), रोहित रणधीर (जीएमसी, यवतमाळ) यांनी प्रवेश मिळविला.

अभियांत्रिकी संस्थेत प्रवेश मिळविलेले विद्यार्थी

अभियांत्रिकीमध्ये यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांपैकी स्वामी साळुंके (आयआयटी, पटना, सीओईपी), संकेत जाधव (एमएनआयटी, अलाहाबाद), रिशिका मंत्री (व्हीएनआयटी, नागपूर), सार्थक जाधव (व्हीएनआयटी, नागपूर), आदित्य पाटील (एसपीआयटी), दर्शन फिरोदिया (सीओईपी), दिव्यल भांड (एसपीआयटी), अथर्व नागरगोजे (पीसीआयटी), अनुष्का सांगळे, ऋतुजा लगड, साक्षी चांदणे (कमिन्स), अथर्व सानप (एसपीसीओई), सागर मुलुक (वालचंद कॉलेज), शाश्वत खत्री (डीजे संघवी) यांचा सन्मान करण्यात आला.

प्रेरणादायी अक्षरधन

दुर्गुणांना बदलून टाकावे

"मुसाफिर"
वाचनीय मननीय
प्रेरणादायी अक्षरधन
संकलन: दिशान फिचर्स

एकदा स्वामी विवेकानंदाकडे एक भक्त आला. देवाला शिव्या देऊ लागला. तो म्हणाला, देवानं देह देऊचं काम, राग, लोभ, मद, मोह, मत्सर असे नानादुर्गुण घातले. माणसाचे हे शत्रू जन्मजात निर्माण केले. आता आम्हा मानवांना सुख कुठलं? देवाला हे करणं शोभलं ?

स्वामीजी काही बोलले नाहीत. उठले आणि भक्ताला माझ्याबरोबर चल म्हणाले. दोघेही बागेत गेले. फुलझाडे पाहत फिरू लागले. भक्ताने गुलाबांचे गेंद पाहिले. शेजारी चाफा फुललेला. सुगंध भरलेला. भक्त सुखावला. तेवढ्यात माळी खत घेऊन आला. खताची घाण भक्ताच्या नाकात भरली. त्याने त्याबद्दल नापसंती दर्शविली. स्वामी बोलले नाहीत. नुसते उभे राहिले. माळ्याने ते खत गुलाबाला घातले. चाफ्यांच्या मुळाशी पेरले. स्वामीजी माळ्याला म्हणाले. अरे, हे काय करतोस ? गुलाबाच्या मुळात घाणेरडं खत घालतोस? चाफ्याच्या अंगात खताची घाण भरतोस ?

माळी म्हणाला, म्हणूनच तर गुलाबाला गेंद लागतात आणि मोहक रंग भरतात. चाफ्याला पिवळीधमक फुलं येतात. ती फुलं सुगंधानं बाग भरून टाकतात.

स्वामीजी म्हणाले, कमाल आहे या गुलाबाची आणि चाफ्याची. दुर्गंधाचा सुगंध करून टाकतात. भक्त समजला. ओशाळला. देवाला आपण उगाच शिव्या दिल्या, हे त्याला उमगले. गुलाब आणि चाफा दुर्गंधाला सुगंधात बदलून टाकू शकतात. माणूस दुर्गुणांना असाच सद्गुणात का नाही बदलून टाकत? दुर्गुणांचे खत अंगात मुरवावे. सदगुण बहरून, फुलून, सुगंधाने भरून द्यावेत. दुर्गुणांना खतासारखे दाबून टाकावे. खताप्रमाणेच सडू द्यावे.

संत मुक्ताबाई म्हणतात, की मुत्यूलाच बदलून टाकावे. उपाधीनाचे समाधीत परिवर्तित करावे. वासनांनाच ध्यानधरणी लावावे.

बा माणसा, आत्मबळ जागव, मद, मोह आदी षड्रिपूंचे बळ अंगी पचव. बहरून येवू दे सत्याचा मोहोर. सुटू दे सुगंध शांतीचा, आनंदाचा, समतेचा, मानवतेचा.

घाणेरड्या अळ्या, पण त्यातून निर्माण होतात भिंगोळ्या. नाही तक्रार भिंगोळीची. अळीच्या घाणेरडेपणाची. उलट या घाणीला ती बदलून टाकते. केवढे हे बळ तिच्या अंगी! माणसाने त्या भुंगीपासून शिकावे. दुर्गुणांचे कासया भय। त्यासी करावे सद्गुणमय।

मेघाला पुरवठा खारट पाण्याचा, पण नाही त्याची तक्रार. अंगी मुरवतो खारे पाणी आणि करतो वर्षाव अमृतमधुर जीवनाचा. असे प्रावीण्य मेघाचे, ते का नसावे माणसाचे? हे सुभाषित हेच सांगते.

– किशोर गांधी

विश्व हिंदू परिषद व इंद्र फाउंडेशन ट्रस्टतर्फे गरजूंना दिवाळी फराळ साहित्याचे वाटप

विश्व हिंदू परिषद, अहिल्यानगर जिल्हा व इंद्र फाउंडेशन ट्रस्ट, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने अहिल्यानगर, शेवगाव व पाथर्डी परिसरातील गरजू नागरिकांना दिवाळीनिमित्त फराळ साहित्याचे वाटप करण्यात आले. गरजू कुटुंबांना दिवाळी फराळ साहित्याचे ११ किलोचे एक किट असे २४० किट प्रत्येकी वाटप करण्यात आला. या प्रसंगी परिषदेचे धार्मिक विभाग क्षेत्र प्रमुख संजय मुर्दाळे, धर्माचार्य संपर्क प्रांत सह प्रमुख नागनाथ, अहिल्यानगर विभाग मंत्री सुनील खिस्ती, जिल्हा सहमंत्री राजेंद्र चुंबळकर, आदर्श आश्रमशाळेचे संस्थापक अशोक चोरमले, मुख्याधापक गर्जे सर, देवा पवार, शिरसाठ सर, शेतकरी बांधव उपस्थित होते.

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर महामार्गावर सजली गृहसजावटीच्या वस्तूंची दुकाने

महागाईच्या काळात सर्वसामान्यांसाठी माफक दरात रंगीबेरंगी सजावटीच्या वस्तू उपलब्ध

नगर – दिवाळीचा सण जवळ येताच सर्वत्र उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, गृहसजावटीच्या वस्तूंच्या खरेदीसाठी बाजारपेठा सजू लागल्या आहेत. अहिल्यानगर–पुणे महामार्गावरील इंडस्ट्रियल इस्टेटसमोर श्रीकृष्ण कुशन्स् शेजारी अनेक छोट्या–मोठ्या व्यावसायिकांनी सजावटीच्या वस्तूंचे आकर्षक स्टॉल थाटले आहेत. त्यामुळे महामार्गालगत दिवाळीच्या खरेदीची लगबग पाहायला मिळत आहे.

अहिल्यानगर–पुणे महामार्गावरील इंडस्ट्रियल इस्टेटसमोर श्रीकृष्ण कुशन्स् शेजारी अनेक छोट्या–मोठ्या व्यावसायिकांनी सजावटीच्या वस्तूंचे आकर्षक स्टॉल थाटले आहेत. (छाया – अमित मनियार)

या स्टॉलवर विविध प्रकारची फुलांची तोरणे, फुलांचे हार, माळा, फ्लॉवर पॉट तसेच घराची सजावट करण्यासाठी लागणाऱ्या विविध रंगांच्या आणि आकर्षक डिझाइनच्या वस्तू विक्रीसाठी उपलब्ध झाल्या आहेत. रंगीबेरंगी सजावटीच्या वस्तूंमुळे या परिसराला दिवाळीच्या सणाचे स्वरूप प्राप्त झाले आहे.

यंदा महागाई आणि दुष्काळाच्या छायेत दिवाळी साजरी होत असली, तरी सर्वसामान्य नागरिकांना सणाचा आनंद घेता यावा, या दृष्टीने व्यावसायिकांनी माफक दरात विविध वस्तू विक्रीसाठी ठेवल्या आहेत. कमी किमतीत आकर्षक सजावटीच्या वस्तू उपलब्ध होत असल्याने नागरिकांनाही आपल्या घराची सजावट करण्यासाठी हा एक चांगला पर्याय ठरत आहे.

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर घराघरांत स्वच्छता, रोषणाई आणि सजावटीची तयारी सुरू झाली आहे. अशा वेळी महामार्गालगत उभारण्यात आलेले हे स्टॉल नागरिकांचे लक्ष वेधून घेत आहेत. सणासुदीच्या काळात छोट्या व्यावसायिकांनाही रोजगार आणि उत्पन्नाची संधी मिळत असून, माफक दरातील या वस्तूंमुळे ग्राहकांना दिलासा मिळत आहे.

एकूणच, दिवाळीच्या स्वागतासाठी अहिल्यानगर–पुणे महामार्गावरील इंडस्ट्रियल इस्टेटसमोरील सजावटीच्या वस्तूंचे स्टॉल आकर्षणाचे केंद्र ठरत आहेत.

शिक्षकांना अपडेट करण्याचा ज्ञानसंपदाचा उपक्रम काळाच्या गरजेचा

ज्येष्ठ विचारवंत विजय कुवळेकर

ज्ञानसंपदा शाळेच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त आयोजित कार्यक्रमात 'शिक्षक प्रशिक्षण केंद्रा'चे उद्घाटन करताना विजय कुवळेकर.

ज्ञानसंपदा शाळेच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त 'शिक्षक प्रशिक्षण केंद्रा'चे उद्घाटन

नगर – कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (एआय) युगात केवळ पुस्तकी ज्ञान देणे पुरेसे नसून विद्यार्थ्यांमध्ये दडलेल्या क्षमतांचा विकास करून त्यांना सर्वगुणसंपन्न बनविणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांमधील क्षमता ओळखण्यासाठी शिक्षकांकडे निकोप, सकारात्मक आणि स्वागतशील दृष्टी असली पाहिजे. शिल्पकाराप्रमाणे शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व घडवावे. ज्याचे शिकणे थांबते, त्याचे शिकवणेही थांबते. त्यामुळे विद्यार्थ्यांप्रमाणे शिक्षकांनीही सातत्याने स्वतःला अद्ययावत ठेवणे गरजेचे आहे. शिक्षकांना अपडेट करण्यासाठी ज्ञानसंपदा शाळेचा प्रशिक्षण केंद्राचा उपक्रम कौतुकास्पद आणि काळाची गरज आहे, असे प्रतिपादन माजी संपादक व ज्येष्ठ विचारवंत विजय कुवळेकर यांनी करून गरिबी आणि शाळा या यशाच्या मार्गातील अडथळे ठरू शकत नाहीत. जीवनात उच्चपदावर पोहोचण्यासाठी परिश्रम, बुद्धिमत्ता, निष्ठा, जिद्द आणि चिकाटी या गुणांची आवश्यकता असते. परिस्थितीपेक्षा स्वतःमधील गुणवत्ता आणि मेहनतीवर विश्वास ठेवून विद्यार्थ्यांनी ध्येयाच्या दिशेने वाटचाल करावी, असा सल्लाही त्यांनी दिला.

संपदा विद्या प्रतिष्ठान संचलित ज्ञानसंपदा शाळेच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त आयोजित कार्यक्रमात 'शिक्षक प्रशिक्षण केंद्रा'चे उद्घाटन विजय कुवळेकर यांच्याहस्ते सरस्वती देवीच्या पूजनाने व दीपप्रज्वलनाने झाले. यावेळी प्रमुख पाहुणे समुपदेशक डॉ. सागर देशपांडे व डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे संचालक डॉ. जयंत कुलकर्णी आदी उपस्थित होते. सावेडीच्या माऊली सभागृहात झालेल्या या समारंभात शाळेच्या रौप्यमहोत्सवी वर्षाच्या बोधचिन्हाचे व चित्रफितीचे अनावरण झाले. यावेळी संपदा विद्या प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रवीण बजाज, उपाध्यक्ष मिलिंद गंधे, सचिव अरुण कुलकर्णी, खजिनदार अविनाश बोपर्डीकर, शाळा समितीचे चेअरमन कारभारी भिंगारे, सदस्य श्रीहरी टिपूगडे, शाळेच्या प्राचार्य शिवांजली अकोलकर व उपप्राचार्य प्रसाद बर्वे यांच्यासह विद्यार्थी, पालक व विविध क्षेत्रातील नागरिक उपस्थित होते.

विजय कुवळेकर पुढे म्हणाले, उद्योगपती एकत्र येत चांगल्या शिक्षणासाठी शैक्षणिक संस्था काढतात याला फार महत्व आहे. यातून लक्ष्मी व सरस्वती एकत्र येत ज्ञानसंपदा शाळा हे ज्ञानमंदिर उभे राहिले आहे. रौप्यमहोत्सवी वर्षातील संस्थेची वाटचाल प्रगतीच्या दिशेने होत आहे.

सागर देशपांडे म्हणाले, ज्ञानसंपदा शाळेची रौप्यमहोत्सवी वाटचाल कौतुकास्पद आहे. मूल्यव संस्कार जपणाऱ्या या संस्थेने आता शहरातील शैक्षणिक संस्थांचे नेतृत्व करावे, आशी अपेक्षा त्यांनी व्यक्त करून शुभेच्छा दिल्या.

जयंत कुलकर्णी म्हणाले, पुढील काळात शैक्षणिक क्षेत्रात फार मोठ्या उलथापालथ होणार आहे. त्यामुळे त्याला तोंड देण्यासाठी आत्तापासूनच नियोजन केले पाहिजे. त्यादृष्टीने ज्ञानसंपदा शाळेने शिक्षक प्रशिक्षण केंद्र सुरु करून पुढील २५ वर्षांची बेगमीची पायाभरणी केली आहे. यातून निर्माण होणारे काम दिशादर्शक असेल, असे सांगून भविष्यातील शिक्षण पध्दती व नियोजन यांचे विश्लेषण त्यांनी केले.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात संस्थेचे सचिव अरुण कुलकर्णी यांनी २५ वर्षांचा आढावा घेत विद्यार्थी कल्याणासाठी भविष्यातील ध्येय धोरणांची माहिती दिली. मुक्ता दिवेकर यांनी सूत्रसंचालन केले.

संस्थेचे खजिनदार अविनाश बोपर्डीकर यांनी आभार मानले. कैलास जाधव यांनी पाहुण्यांचा परिचय दिला. यावेळी शिक्षिका श्रद्धा उगले यांना आदर्श शिक्षक पुरस्कार देण्यात आला तसेच उपप्राचार्य प्रसाद बर्वे यांना सीड्स ऑफ चेंज इनोव्हेटर अवॉर्डने सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमास विनोद बजाज, दिनेश अग्रवाल, राजेंद्र भगत, शरद कुलकर्णी, विजय कुलकर्णी, मुकुंद बिलोलीकर, सुमित सोनवणे, वरून भगत, अक्षय वाघमोडे, सुहास मुळे, डॉ.सुनीता भागवत उपस्थित होते.

चैतन्य संगीत साधना मंचच्या वतीने संगीत सभा रावसाहेब पटवर्धन सभागृह येथे पार पडली.

'चैतन्य संगीत साधना मंचा'ची संगीत सभा ठरली अविस्मरणीय

नगर – संगीत साधनेचा प्रसार आणि नवोदित कलाकारांना दर्जेदार व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने चैतन्य संगीत साधना मंचाचे आयोजक श्रीराम तांबोळी यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेली संगीत सभा रावसाहेब पटवर्धन सभागृह येथे पार पडली. संगीततज्ञ डेव्हिड चांदेकर, टीव्ही स्टार मोहिनीराज गटणे, गायक नंदकुमार महाले, शैलेंद्र गांधी, अशोक गांधी, ज्ञानेश्वर दुधाडे, बोपर्डीकर मॅडम, गायक व वादक सूर्यकांत पुंडे, निलीमा बंडेलु, ॲडव्होकेट शितोळे यांची यावेळी उपस्थिती लाभली.

आयोजक तांबोळी यांनी चैतन्य संगीत साधना मंचाच्या माध्यमातून संगीताची आवड जोपासणाऱ्या साधकांना सातत्याने व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचे कार्य हाती घेतले आहे. मंचाचे बाळासाहेब पतंगे, अनघा मुळे, डॉ.सुनीता येवतकर, श्रुती कुलकर्णी, डॉ. रुपाली कुलकर्णी, जयश्री कुटे, सुषमा वैद्य, मनिषा देशमुख, सुनिल भंडारी, आनंद कुलकर्णी साधकांनी विविध मराठी भक्तिगीते व भावगीतांचे उत्कृष्ट सादरीकरण करून रसिकांची मने जिंकली. कार्यक्रमादरम्यान कलाकारांना सन्मानपत्र प्रदान करून त्यांच्या संगीत क्षेत्रातील मेहनत आणि कलागुणांचा गौरव करण्यात आला.

उपस्थित रसिकांनी प्रत्येक सादरीकरणाला टाळ्यांच्या गजरात प्रतिसाद दिला. साथसंगत तबला अजय पिंपळे, संवादिनी प्रणव देशपांडे तसेच तालवाद्य शंतनु पिंपळे यांनी दिली.

कार्यक्रमाचे निवेदन डॉ. सुनीता येवतकर यांनी केले.

वीज तांत्रिक कामगार सहकारी पतसंस्थेचा पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात

दहावी–बारावीनंतर करिअरच्या अनेक संधी; विद्यार्थ्यांनी ध्येय निश्चित करून सातत्यपूर्ण प्रयत्न करावेत : विकास आढे

नगर – वीज तांत्रिक कामगार सहकारी पतसंस्था मर्यादित, अहिल्यानगर यांच्या वतीने संस्थेच्या सभासदांच्या गुणवंत पाल्यांसाठी आयोजित करण्यात आलेला शालेय पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात झाला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेचा गौरव करणे, त्यांच्या यशाला प्रोत्साहन देणे आणि भविष्यातील शैक्षणिक व व्यावसायिक वाटचालीसाठी योग्य दिशा देणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे उपाध्यक्ष प्रवीण देशमुख होते, तर उद्घाटन अहिल्यानगर मंडळाचे अधीक्षक अभियंता रमेशकुमार पवार यांच्या हस्ते झाले. प्रमुख उपस्थितीमध्ये जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे, किरण आव्हाड, तांत्रिक कामगार युनियन ५०५९ (महाराष्ट्र राज्य)चे सरचिटणीस प्रभाकर लहाणे, व्यवस्थापक सुदीप साळवे, पाथरकर काका, हवालदार, बारवकर, रघुनाथ लाड, माऊली बडदे आणि भारत साळुंखे यांचा समावेश होता.

यावेळी नाशिक परिमंडळाचे जनसंपर्क अधिकारी तथा व्याख्याते विकास आढे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. दहावी आणि बारावीनंतर विद्यार्थ्यांसमोर शिक्षणाच्या तसेच करिअरच्या अनेक संधी उपलब्ध असतात. या संधींची योग्य वेळी माहिती घेऊन स्वतःच्या आवडीनिवडी, क्षमता आणि कौशल्ये ओळखणे आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले.

वीज तांत्रिक कामगार सहकारी पतसंस्था मर्यादित, अहिल्यानगर यांच्या वतीने संस्थेच्या सभासदांच्या गुणवंत पाल्यांसाठी आयोजित करण्यात आलेला शालेय पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात झाला.

विद्यार्थ्यांनी केवळ गुण मिळविण्यावर लक्ष केंद्रित न करता भविष्यात कोणत्या क्षेत्रात करिअर करायचे, याचे नियोजन शालेय जीवनापासूनच करावे. स्पर्धा परीक्षांची तयारी, तांत्रिक शिक्षण, कौशल्य विकास आणि विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या माध्यमातून प्रगतीच्या अनेक वाटा खुल्या होऊ शकतात. त्यासाठी सातत्यपूर्ण अभ्यास, वेळेचे नियोजन, शिस्त आणि आत्मविश्वास या गोष्टी महत्त्वाच्या आहेत. अपयश आले तरी खचून न जाता त्यातून शिकण्याची वृत्ती विद्यार्थ्यांनी जोपासावी, असे आवाहन आढे यांनी केले.

विद्यार्थ्यांच्या प्रगतीमध्ये पालक आणि शिक्षकांची भूमिकाही महत्त्वाची असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. मुलांच्या आवडी समजून घेऊन त्यांना योग्य मार्गदर्शन आणि प्रोत्साहन दिल्यास ते आपल्या क्षमतेनुसार निश्चितच प्रगती करू शकतात. बदलत्या काळात उपलब्ध होणाऱ्या शैक्षणिक संधींचा अभ्यास करून विद्यार्थ्यांनी आपल्या भविष्याची दिशा ठरवावी, असेही त्यांनी सांगितले.

संस्थेच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिके देऊन त्यांच्या शैक्षणिक यशाचा गौरव करण्यात आला. या सन्मानामुळे विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी प्रोत्साहन मिळाले. सभासदांच्या कुटुंबातील विद्यार्थ्यांच्या प्रगतीची दखल घेणारा हा उपक्रम संस्थेच्या सामाजिक बांधिलकीचे प्रतीक असल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेचे चेअरमन सतीश भुजबळ, सचिव अशोक मते, संचालक कुशाबा वायसे, संतोष शेलार, संतोष भिंगारदिवे, अरुण भोसले, रुपेश चाकणे, चंद्रकांत सुरवसे, बाबासाहेब भांड, दिनेश निकम, आजिनाथ शिरसाट, सुनील गुळमकर, सुनीता मेढे, सचिन चोरगे, आशिष वेळापुरे, कर्मचारी दिलीप घोडेचोर, दीपक हुशारे आणि संस्थेच्या सभासदांनी सहकार्य केले.

दिवाळी यंदाची...गंभीर पाणीबाणीची... आपल्या आनंदात ग्रामीण कुटुंबास सहभागी करण्याची...

दिवाळी उंबरठ्यावर आली आहे. अलनिनोच्या दुष्प्रभावाने उष्णता उन्हाळ्यासम चटके देत आहे. त्यात पावसाच्या कमीने चिंता अधिकच वाढवली आहे. त्यामुळे एकूणात आता कुठे पाण्याची व पर्यायाने धनधान्य, पशुंचा चारा याबद्दल सर्वदूर समस्या, प्रश्न आवासून पुढे आले आहेत. शासन, प्रशासन आपआपल्या परीने नियोजन करतील पण खरं सांगू आपण शहर वासियांनी या नैसर्गिक आपत्तीत आपल्या खेड्यापाड्या, वाड्यावस्तीतील असहाय्य बंधुभगिनींसाठी पुढे यावे लागेल.

होतंय काय, धरणाचे पाणी थेट नळाच्या वाटे घरात येत असल्याने पाण्याची दुर्भिक्षता व महत्त्व आपल्याला जाणवत नाही. २-४ कोसांपासून १/२ हंडे आणणाऱ्या भगिनी, माता पाहून आपले मन तितके दु:खी होत नाही. म्हणूनच वाटते शक्य झाल्यास दिवाळीत एकदिवस तरी ग्रामीण भागातले आताच बनलेले हे भकास चित्र पाहायला, अनुभवायला पाहिजे. धान्याचा दुष्काळ पडल्यास कुठून ना कुठून आयात करता येते. थोडा फार पर्याय मिळतो पण पाण्याचं काय? एक वेळ अन्नाविना १/२ दिवस राहता येऊ शकेल पण पाण्याविना नाही.

मग आपण काय करू शकतो? अगदी छोट्या छोट्या गोष्टी करुन मोठी मदत करू शकतो! आंघोळीला अर्धी बादलीच घेऊ शकतो. विनाकारण गाड्या, आंगण 'धुऊन' काढणं टाळू शकतो. वाचवलेले पाणी आजूबाजूच्या वृक्षवल्लींना देऊन त्यांनाही वाचवावे लागेल.

विनाकारण घरात चालू असलेल्या वीजेसह पाण्याची बचत करणे अत्यंत आवश्यक आहे. थोडक्यात अपव्यय टाळून पाण्याची काटकसरीने बचत करणे सर्वात पहिली व महत्त्वाची जबाबदारी आहे. या बाबीला धार्मिक, श्रद्धेचे अनुष्ठान दिल्यास हे सर्वोत्तम पुण्याचे काम असेल. आम्हा शहरवासियांना पाण्याचे महत्त्व समजून घ्यावेच लागेल.

आता पुन्हा वळू या दिवाळीच्या महासणाकडे! मनुष्य हा आयुष्याच्या फुलांवरला सुखाचा मध शोधू पाहणारा भुंगा जणू! सध्याच्या स्वार्थांध वातावरणात तर असे म्हणता येईल की आयुष्याच्या उकीरड्यावर सुखाचे क्षण शोधणारे भिकारी आपण!

प्रत्येक क्षण व सणाला आनंद शोधतो आपण. दिवाळी तर उत्साह, उमंग, आनंदाचा महाउत्सव. नव्या दमाने जगण्याची उर्मी दिवाळी देते. म्हणून तर प्रत्येक व्यक्ती, कुटुंब व सारा देश या सणाची आतुरतेने वाट पाहात असतो. तन मनाला नव्याने सुशोभित करताना मिठाया, फराळांची चंगळ असते. खऱ्या अर्थाने संपूर्ण भारत देश आनंदाच्या आतषबाजीत न्हाऊन निघालेला असतो.

अर्थातच प्रत्येकाने दिवाळीचा सर्वोत्तम आनंद घेतलाच पाहिजे. त्यासाठी सर्वांना आमच्याही शुभेच्छा ! फक्त यावर्षी एक प्रण करण्याचा प्रयत्न करू या. यंदा ग्रमीण भागात पाण्याचे दुर्भिक्ष आहे व पुढे अजून अधिक गंभीर राहील. वैयक्तिक पातळीवर खेड्यातल्या विशेषत: जिरायती शेतकरी, शेतमजूरांना आपल्या आनंदात सहभागी करुन घ्यायचा विचार करूया.

आपल्या अपार्टमेंट, सोसायटी तर्फे वर्गणी गोळा करुन पुढील पावसाळ्यापर्यंत एखाद्या खेडेगावास, वाडीस पाण्याचा पुरवठा करण्याचा प्रयत्न व नियोजन करता येईल. तेथील वृक्षसंपदेला टिकवण्याचा प्रयत्न व्हावा कारण सगळ्याच गोष्टीसाठी सरकार, सरकार करुन भागणार नाही. अधिक पाण्यावाल्या पिकांना बंदी घालावी लागेल. राजकीय नेत्यांसह प्रशासनाला यासाठी नि:स्वार्थ व प्रामाणिक राहावे लागेल. मनापासून कामे करावी लागतील.

तात्पर्य दिवाळी आहे तरी खेड्यातली अर्थव्यवस्था जीवंत ठेवण्यास त्यांच्या वस्तूंचीच खरेदी करावी. पाणीबाणीवर दिर्घकालीन ध्येय धोरण सर्वांनीच मिळून ठरवावे लागेल. आपण निसर्गाचा करीत आलेला छळ, ऱ्हास यास मोठी किंमत द्यावी लागणार आहे. पाणीबाणी भविष्यात अधिक भयाण रुप घेऊ शकेल. पाणी वाचवून साठा जपणाऱ्याला प्रोत्साहन द्यावे लागेल. नदीतलं झुळझुळ पाणी मोटेत तेथून नळीत आता तर बाटलीत विकत घ्यावे लागतेय.

येवो जल गंगा निरंतर अंगणी
वाटो तृष्णार्त जीवनी
सर्वांसाठीच या शुभेच्छा
दिपोत्सवाच्या शुभदिनी.

दिवाळीचा आनंद घेऊ या. इतरांनाही देऊ या.

– **किशोर गांधी** (दिशान गांधी)

नगर-मनमाड रोडवरील सावेडी नाका येथे नगर फटाका असोसिएशनच्या वतीने होलसेल फटाका मार्केट सुरू करण्यात आले आहे. त्याचा शुभारंभ आ. संग्राम जगताप यांच्या हस्ते झाला.

दिवाळीनिमित्त सावेडी नाक्यावर होलसेल फटाका मार्केटचा शुभारंभ

नगर- दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर फटाक्यांच्या खरेदीसाठी नागरिकांची होणारी गर्दी आणि ग्राहकांची वाढती गरज लक्षात घेऊन नगर-मनमाड रोडवरील सावेडी नाका येथे नगर फटाका असोसिएशनच्या वतीने संचलित होलसेल फटाका मार्केटचा शुभारंभ आ. संग्राम जगताप यांच्या हस्ते करण्यात आला. या सुविधेमुळे जिल्हा व जिल्हाबाहेरील ग्रामीण भागातून शहरात खरेदीसाठी आलेल्या नागरिकांना दिवाळीसाठी विविध प्रकारचे फटाके होलसेल दरात खरेदी करण्याची सोय उपलब्ध झाली आहे.

याप्रसंगी नगरसेवक सुरेश बनसोडे, विकी जगताप, नगर फटाका असोसिएशनचे दीपक खेडकर, बाळासाहेब महामुनी, निलेश विळदकर, सनी घोरपडे, ऋत्विक, दरंदले बंधू, संकल्प राऊत, योगेश रोकडे, गोपाल बोरुडे, मंगेश सांगळे, कोतकर मेजर, हरिदास सांगळे, जालिंदर सातपुते, अशोक तांदळे, योगेश मुदळ, अक्षय भगत, दत्ता वाबळे, अमोल जाधव, सतीश बारस्कर, दत्तात्रय वाबळे, योगेश भुजबळ, योगेश रोकडे, अशोक तांदळे, गोपाळ बोरुडे, सनी घोरपडे, निलेश खळदकर आदी उपस्थित होते.

अहिल्यानगरच्या ग्रामीण भागासह जिल्ह्याला लागून असलेल्या इतर जिल्ह्यातील नागरिकांना सोय होण्याच्या उद्देशाने नगर फटाका असोसिएशनच्या माध्यमातून सावेडी नाका येथे प्रशस्त जागेत होलसेल फटाका मार्केट सुरू करण्यात आले आहे. दिवाळीच्या काळात फटाक्यांची खरेदी करण्यासाठी नागरिकांना सोयीचे ठिकाण उपलब्ध व्हावे, हा या उपक्रमामागील उद्देश आहे.

आर्किटेक्ट इंजिनिअर्स अँड सर्व्हेअर्स असोसिएशनच्या दांडिया-गरबा नाइटला प्रतिसाद

११० सभासदांसह कुटुंबीयांचा सहभाग; ३५० जणांच्या उपस्थितीत रंगला कौटुंबिक सोहळा

नगर - आर्किटेक्ट इंजिनिअर्स ॲण्ड सर्व्हेअर्स असोसिएशन (ऐसा) यांच्या वतीने सभासद आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी दांडिया व गरबा नाइट या कौटुंबिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात ११० सभासदांसह त्यांच्या कुटुंबातील सदस्य अशा एकूण ३५० जणांनी सहभाग नोंदविला. पारंपरिक राजस्थानी पेहराव, आकर्षक सजावट, विविध सेल्फी पॉइंट्स, डीजे संगीत आणि रोषणाईमुळे कार्यक्रम ला रंगत आली. विविध स्पर्धा आणि बक्षिसांच्या माध्यमातून उपस्थितांनी गरबा व दांडियाचा आनंद घेतला.

आर्किटेक्ट इंजिनिअर्स अँड सर्व्हेअर्स असोसिएशन (ऐसा) यांच्या वतीने सभासद आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी दांडिया व गरबा नाइट या कौटुंबिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विजेत्यांना पारितोषिके देण्यात आली. (छायाचित्र - लहू दळवी)

ऐसा संस्थेचे अध्यक्ष प्रदीप तांदळे म्हणाले की, आपल्याला सण-उत्सवांची महान परंपरा लाभली आहे. या परंपरेच्या माध्यमातून आपली संस्कृती आणि वारसा जतन केला जातो. हा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी ऐसा संस्थेच्या माध्यमातून सभासद आणि त्यांच्या कुटुंबीयांना एकत्र आणून विविध सण-उत्सव उत्साहात साजरे केले जातात. अशा उपक्रमांमुळे सभासदांमध्ये कौटुंबिक स्नेहाचे ऋणानुबंध निर्माण होतात. आगामी काळातही संस्थेच्या वतीने विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि कौटुंबिक उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

या कार्यक्रमाच्या आयोजनाची मुख्य जबाबदारी सांस्कृतिक समितीचे प्रमुख अजय दगडे आणि महिला विंग प्रमुख वैशाखी हिरे यांनी सांभाळली. सभासद व त्यांचे कुटुंबीय खास राजस्थानी पद्धतीचा पारंपरिक पेहराव करून उपस्थित राहिले होते. महिला विंग प्रमुख वैशाखी हिरे यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहिलेल्या महिलांचे स्वागत केले. आगामी काळात महिला दिनासह विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. स्पोर्ट्स कमिटीचे प्रमुख जितेश सचदेव यांनी आगामी बॉक्स क्रिकेट स्पर्धेची माहिती दिली. सूत्रसंचालन आर.जे. प्रसन्न यांनी केले, संस्थेचे सचिव भूषण पांडव आणि सांस्कृतिक समितीचे प्रमुख अजय दगडे यांनी आभार मानले.

विजेत्यांना पारितोषिकांचे वितरण

गरबा आणि दांडिया नाइटनिमित्त विविध स्पर्धांचे आयोजन करून आकर्षक बक्षिसे जाहीर करण्यात आली होती. उपस्थितांनी या स्पर्धांना प्रतिसाद दिला. विजेत्यांना उपस्थित अतिथी आणि कमिटी प्रमुखांच्या हस्ते पारितोषिकांचे वितरण करण्यात आले. बेस्ट सोलो डान्सर पुरुष गटात अमोल येनगंदुल, तर महिला गटात कोमल कुलकर्णी यांनी बाजी मारली. बेस्ट ड्रेसअप महिला गटात शिवानी पादीर, तर पुरुष गटात संम्कित गांधी विजेते ठरले. मुलांच्या गटात नमिषा लुनिया विजयी ठरली. लहान मुलांच्या बेस्ट डान्स स्पर्धेत हीर सचदेव हिने प्रथम, आरोही येनगंदुल हिने द्वितीय, तर आर्या तांदळे हिने उत्तेजनार्थ पारितोषिक मिळविले. बेस्ट कपलचा पुरस्कार रोहित आणि प्रीती लुनिया यांना, तर बेस्ट ग्रुपचे पारितोषिक राधा आणि कृष्णा ग्रुपला देण्यात आले. दीप्ती सबलोक आणि डिंपल परदेशी यांनी स्पर्धांमध्ये परीक्षक म्हणून काम पाहिले.

विविध संस्थांचे लाभले प्रायोजकत्व

कार्यक्रमाचे मुख्य प्रायोजक एस.आर.जे. स्टीलचे अविनाश पुरोहित, विशाल येसेकर, टोस्टेम विंडोचे शुभम बनसोडे, शनीराज टाइल्सचे शिवाजी शिंदे आणि व्यंकटेश इन्फ्राचे ओम आठरे होते. तसेच अंबिका स्टोन क्रशर, श्री आनंद ट्रेडिंग कंपनी, श्री आनंद सेल्स, पटेल सिरॅमिक, वैष्णवी टाइल्स, डायकीन एसी, श्रीराम मार्बल, अर्टिको लिफ्ट, पंकज स्टील, ढोणे ट्रेडर्स, अभय सेल्स कॉर्पोरेशन, शुभारंभ टाइल्स, संकल्प इंटरप्रायजेस आणि डायमंड टाइल्स या संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते. विशाल येसेकर यांनी एस.आर.जे. स्टील संस्थेच्या माध्यमातून विविध तांत्रिक उपक्रमांशी जोडले जात असताना वर्षभर तांत्रिक, कौटुंबिक आणि सामाजिक उपक्रम एकत्रितपणे आयोजित करण्यास प्रोत्साहन दिले जात असल्याचे सांगितले.

यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष सुनील औटी, संतोष खांडेकर, अनमोल जैन, सुनील जाधव, सचिन डागा, संकेत पादिर, गौरव मांडगे, अमोल येनगंदुल, आदिनाथ आंबेकर, सागर ढगे, अमेय कुलकर्णी, विजय उजनीमठ यांच्यासह संस्थेचे सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

खेळ, आरोग्य अन् अभ्यास यांची सांगड घालावी : डॉ. किरण गायकवाड

नालंदा स्कूलमध्ये विद्यार्थ्यांच्या आरोग्यविषयक जागृती

नगर - विद्यार्थ्यांचे शारीरिक व मानसिक आरोग्य सुदृढ राहावे त्यांच्यात आरोग्याविषयी जागरूकता निर्माण व्हावी आणि अभ्यासासोबतच खेळ व व्यायामाची आवड जोपासली जावी या उद्देशाने नालंदा स्कूल वाळुंज येथे विद्यार्थ्यांचे आरोग्य व खेळ या विषयावर मार्गदर्शनपर उपक्रम राबविण्यात आला. फिजी बेटांच्या सरकारचे मानसिक आरोग्य सल्लागार डॉ. किरण गायकवाड यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत आरोग्य, शिक्षण, करिअर नियोजन आणि जीवनातील यश यांविषयी मार्गदर्शन केले. यावेळी ले. कर्नल यशवंत बहादुर्गे, पल्लवी बहादुर्गे, मुख्याध्यापिका हैदर डिसूजा व विद्यार्थी उपस्थित होते.

नालंदा स्कूल वाळुंज येथे फिजी बेटांच्या सरकारचे मानसिक आरोग्य सल्लागार डॉ. किरण गायकवाड यांचे स्वागत करताना ले. कर्नल यशवंत बहादुर्गे. (छायाचित्र - समीर मन्यार)

आरोग्याचा विद्यार्थ्यांच्या एकाग्रतेवर, स्मरणशक्तीवर, अभ्यासातील सातत्यावर आणि शैक्षणिक कामगिरीवर होणारा परिणाम डॉ. गायकवाड यांनी स्पष्ट केला. शरीर निरोगी असेल पुरेशी झोप मिळत असेल आणि आहार संतुलित असेल, तर विद्यार्थ्यांना अभ्यासात अधिक लक्ष केंद्रित करता येते. याउलट सततचा थकवा, अपुरी झोप, अनियमित दिनचर्या आणि आरोग्याकडे दुर्लक्ष यामुळे अभ्यासावर परिणाम होऊ शकतो. विद्यार्थ्यांनी नियमित वेळापत्रक करावे, वेळेवर आणि संतुलित आहार घ्यावा, मोबाईलचा वापर टाळावा. पुरेसे पाणी प्यावे, वैयक्तिक स्वच्छता राखावी तसेच दररोज शारीरिक हालचालींना वेळ द्यावा, असे डॉ. गायकवाड म्हणाले.

कोणतीही आरोग्यविषयक समस्या जाणवल्यास ती दुर्लक्षित न करता पालक किंवा शिक्षकांना सांगून आवश्यकतेनुसार वैद्यकीय सल्ला घ्यावा,अभ्यासाच्या स्पर्धेत अनेकदा विद्यार्थ्यांचे खेळांकडे दुर्लक्ष होते. मात्र, मैदानी खेळ हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून शरीर तंदुरुस्त ठेवण्याबरोबरच संघभावना, शिस्त, नेतृत्वगुण आणि निर्णयक्षमता विकसित करण्याचे प्रभावी माध्यम आहे. विद्यार्थ्यांनी अभ्यास आणि खेळ यांचा योग्य समतोल साधावा. धावणे, आजच्या स्पर्धात्मक वातावरणात विद्यार्थ्यांवर अभ्यास, परीक्षा, गुण आणि करिअर यांचा ताण येऊ शकतो. अशा वेळी मानसिक आरोग्य जपले पाहिजे मनातील चिंता, भीती किंवा अडचणी विश्वासू व्यक्तींशी मोकळेपणाने बोलून व्यक्त कराव्यात, असा सल्ला डॉ. गायकवाड यांनी दिला.

शिक्षणासोबतच शारीरिक, मानसिक आरोग्य महत्त्वाचे

यशवंत बहादुर्गे म्हणाले की, या संवादामुळे विद्यार्थ्यांना आरोग्याचे महत्त्व समजण्याबरोबरच भविष्यातील ध्येय निश्चित करण्यासाठी नवी प्रेरणा मिळाली. नालंदा स्कूलच्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना शिक्षणासोबतच शारीरिक आणि मानसिक आरोग्य जपण्याची जाणीव झाली. निरोगी शरीर, प्रसन्न मन, नियमित अभ्यास आणि खेळांची आवड यांच्या समन्वयातून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक जीवन अधिक समृद्ध होऊ शकते विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळेने आयोजित केलेला हा उपक्रम मार्गदर्शक आणि प्रेरणादायी ठरला असून डॉ.गायकवाड यांनी विद्यार्थ्यांचे शंकांचे निरसन करताना आरोग्याची काळजी कशी घ्यावी, असा महत्त्वाचा सल्ला दिला असल्याचे ते म्हणाले.

दत्तात्रय अंकम यांना उत्कृष्ट शाखाधिकारी म्हणून प्रथम पुरस्कार सिने अभिनेता पंढरीनाथ कांबळे यांच्या हस्ते अधिकारी व कर्मचारी वार्षिक गुणगौरव सोहळ्यात प्रदान करण्यात आले.

श्री रेणुकामाता मल्टीस्टेट को- ऑप. सोसायटीचे दत्तात्रय अंकम यांना उत्कृष्ट शाखाधिकारी पुरस्कार

नगर - श्री रेणुकामाता मल्टीस्टेट सोसायटी लिमिटेड अहिल्यानगरच्या ९ राज्यातील १४२ शाखांमधून दत्तात्रय अंकम यांना उत्कृष्ट शाखाधिकारी म्हणून प्रथम पुरस्कार सिने अभिनेता पंढरीनाथ कांबळे यांच्या हस्ते अधिकारी व कर्मचारी वार्षिक गुणगौरव सोहळ्यात प्रदान करण्यात आले.

याप्रसंगी कर्मचाऱ्यांच्या वतीने मनोगत व्यक्त करतांना दत्तात्रय अंकम यांनी सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष डॉ.प्रशांत भालेराव हे वेळोवेळी मार्गदर्शन, प्रोत्साहन व प्रशिक्षण देऊन कर्मचाऱ्यांचे व्यक्तिमत्व घडवतात, यामुळेच आम्ही कर्मचारी ग्राहकांना चांगली सेवा देऊन ग्राहकांचा विश्वास संपादन केल्याचे सांगितले असून त्यांच्या प्रेरणादायी व शिस्तबद्ध संस्थेत आम्ही काम करतोय याचा आम्हाला सार्थ अभिमान असल्याचे आणि यापुढेही सातत्याने कामाची गती वाढवून रेणुकामाता मल्टिस्टेटची आणखी प्रगती करणार असल्याचे सांगितले.

यावेळी माजी आमदार बाळासाहेब मुरकुटे, अहिल्यानगरचे माजी महापौर भगवान फुलसौंदर, पाथर्डीचे माजी नगराध्यक्ष सुभाष घोडके, हंडीनिमगावचे सरपंच भिवाजी आघाव, माजी प्राचार्य चंद्रकांत गलगट्टे, तारकेश्वर देवस्थानचे महंत शांतीब्रह्म आदिनाथ महाराज शास्त्री, रेणुका भक्तानुरागी मंगल भालेराव, पत्रकार अनिरुद्ध देवचक्के, ॲड. नितीन भालेराव, सभासद, खातेदार, ठेवीदार, कर्जदार व कर्मचारी उपस्थित होते.

भास्कर पांडुरंग हिवाळे शिक्षण संस्थेच्या इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज करिअर डेव्हलपमेंट ॲण्ड रिसर्च, अहिल्यानगर येथे एमबीए प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी पालक-शिक्षक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

आयएमएस - एम बी ए पालक-शिक्षक मेळावा उत्साहात

संवादातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना

नगर - भास्कर पांडुरंग हिवाळे शिक्षण संस्थेच्या इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज करिअर डेव्हलपमेंट ॲण्ड रिसर्च, अहिल्यानगर येथे २३ ऑक्टोबर रोजी एमबीए प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी पालक-शिक्षक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यास पालकांनी उपस्थित राहून प्रतिसाद दिला.

प्रभारी संचालिका डॉ. प्रणोती तेलोरे यांनी उपस्थित पालकांचे स्वागत करून पालक-शिक्षक मेळाव्याची उद्दिष्टे स्पष्ट केली.

संस्थेचे सल्लागार डॉ. एम. बी. मेहता यांनी भास्कर पांडुरंग हिवाळे शिक्षण संस्था आणि आयएमएसच्या समृद्ध शैक्षणिक परंपरेचा व संस्थेच्या वाटचालीचा परिचय करून दिला.

उपसंचालक डॉ. विक्रम बार्नबस यांनी विद्यार्थ्यांसाठी असलेली आचारसंहिता, शिस्त यांवर प्रकाश टाकला.

एमबीए विभागप्रमुख डॉ.हातिम कय्युमी यांनी विभागाच्या अपेक्षा व विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत पालकांच्या भूमिकेचे महत्त्व अधोरेखित केले.

तसेच प्रा. श्रुती राव यांनी विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असलेल्या प्लेसमेंटविषयक संधींची माहिती दिली.

औपचारिक कार्यक्रमानंतर पालकांचे विविध गट तयार करून प्रत्येक गटासोबत प्राध्यापकांची नियुक्ती करण्यात आली. या संवाद सत्रामध्ये विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसह विविध प्रशासकीय बाबींवर चर्चा करण्यात आली. पालकांनी उपस्थित केलेल्या शंकांचे व प्रश्नांचे निरसनही प्राध्यापकांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी एमबीए प्रथम वर्षाचे वर्ग समन्वयक डॉ. सय्यद मुदस्सर, पीटीएम - समिती तसेच व्यवस्थापन विभागातील सर्व प्राध्यापकांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचा समारोप डॉ. सय्यद यांनी मानलेल्या आभारप्रदर्शनाने झाला. पालक आणि संस्था यांच्यातील समन्वय अधिक दृढ होण्यास मदत झाली.

बेसबॉल स्पर्धेत श्री समर्थचे वर्चस्व कायम

सलग पाचव्यांदा विभागीय स्तरावर धडक; जिल्हास्तरीय स्पर्धेत प्रथम क्रमांक; बारामती येथे होणाऱ्या पुणे विभागीय स्पर्धेसाठी संघाची निवड

नगर - जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व अहिल्यानगर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शालेय जिल्हास्तरीय बेसबॉल स्पर्धेत श्री समर्थ विद्यामंदिर प्रशाला, सावेडी येथील खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत सलग पाचव्यांदा जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला. या यशामुळे प्रशालेच्या संघाची बारामती येथे होणाऱ्या पुणे विभागीय बेसबॉल स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

संघातील खेळाडूंनी उत्कृष्ट सांघिक खेळ, अचूक नियोजन आणि जिद्दीच्या जोरावर प्रतिस्पर्धी संघांवर मात करत हे यश संपादन केले. यामध्ये कर्णधार अर्चित कवडे याच्यासह सोहम रुपनर, अभय खंडागळे, तन्मय फुले, आयुष हापसे, वेदांत लटके, कृष्णा टेंभुर्कर, कार्तिक कुलकर्णी, ऋग्वेद कुलकर्णी, सार्थक गायकवाड, तनिष्क वालझाडे, सर्वेश मुटकुळे, सात्विक दातीर, संग्राम जरे, सर्वेश येमूल, साईराज तुरे आदी खेळाडूंनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. या सर्व खेळाडूंना प्रशालेचे क्रीडा विभागप्रमुख पी. पी. लोंढे यांचे प्रशिक्षण व मार्गदर्शन लाभले.

प्रशालेच्या खेळाडूंनी सलग पाचव्यांदा जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक मिळवून प्रशालेच्या क्रीडा क्षेत्रातील यशाची परंपरा कायम राखली आहे. या यशाबद्दल संस्थेचे सर्व पदाधिकारी, शालेय समितीचे चेअरमन किशोर देशपांडे, प्रशालेच्या प्राचार्या सौ. वसुधा जोशी, पर्यवेक्षिका सौ. शारदा होशिंग तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी खेळाडूंचे अभिनंदन करून पुणे विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

दुष्काळी परिस्थितीत कर्जवसुलीला स्थगिती द्यावी

अनधिकृत वसुली एजंटांवर कारवाईसाठी छावा संघटनेचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जागरण-गोंधळ

नगर - जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन बँका, पतसंस्था आणि फायनान्स कंपन्यांकडून करण्यात येणाऱ्या कर्जवसुलीला स्थगिती द्यावी, तसेच कर्जवसुलीच्या नावाखाली नागरिकांना धमकावणे, दहशत निर्माण करणे आणि मारहाण करून पैसे वसूल करण्याच्या कथित प्रकारांना आळा घालावा, या मागण्यांसाठी अखिल भारतीय सह्याद्री छावा संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जागरण-गोंधळ आंदोलन करण्यात आले. पारंपरिक जागरण-गोंधळाच्या माध्यमातून आंदोलकांनी कर्जवसुलीच्या गंभीर प्रश्नाकडे प्रशासनाचे लक्ष वेधत निदर्शने केली.

या आंदोलनात अखिल भारतीय सह्याद्री छावा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष रावसाहेब काळे, छावा संघटना भटके-विमुक्त आघाडीचे प्रदेशाध्यक्ष सुभाष काकडे, जिल्हाध्यक्ष उत्तम पवार, धडक जनरल कामगार संघटनेचे जिल्हाध्यक्ष श्रीधर शेलार, स्वराज्य पक्षाचे जिल्हाप्रमुख योगेश शेंडगे, जनार्दन कंद, शिवसेना सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष विनोद साळवे, आबा राठोड, किसन शिरडकर, मच्छिंद्र पाटोळे, साहेबराव पाटोळे, दत्ता वामन, ज्योती माळी, मुक्ता शेडाळे, अभिषेक घोडके, रामदास मोढवे, विजया पवार, मालनबाई गरड, संगीता वाल्हेकर, एकनाथ दातीर, महादेव खामकर, विष्णू जरे, भानुदास ससे, बाळासाहेब फाटके आदी सहभागी झाले होते.

जिल्ह्यात दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी, शेतमजूर आणि सर्वसामान्य नागरिक आर्थिक संकटाचा सामना करत आहेत. अशा परिस्थितीत कर्जाच्या हप्त्यांसाठी तगादा लावला जात असल्यास आर्थिक अडचणीत असलेल्या नागरिकांवरील ताण अधिक वाढू शकतो. त्यामुळे परिस्थितीचा विचार करून कर्जवसुलीला स्थगिती देण्याबाबत शासन व प्रशासनाने योग्य निर्णय घ्यावा, अशी मागणी संघटनेने केली.

वसुलीच्या नावाखाली दहशत निर्माण

फायनान्स कंपन्यांकडून कर्जवसुलीसाठी काही ठिकाणी अनधिकृत एजंटांची नियुक्ती केली जात असून, त्यांच्यामार्फत नागरिकांवर दबाव आणला जात असल्याचा आरोप संघटनेने केला आहे. वसुलीच्या नावाखाली दहशत निर्माण करणे, वाहनचालकांना रस्त्यात अडवणे, कागदपत्रांची मागणी करणे आणि पैशांसाठी धमकावणे, असे प्रकार घडत असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे. काही व्यक्तींकडून पैसे देण्यास नकार देणाऱ्या नागरिकांना मारहाण केली जात असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. अशा कथित प्रकारांना विरोध करणाऱ्या स्थानिक नागरिकांना शिवीगाळ केली जात असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे. कर्जवसुलीच्या नावाखाली कायदा हातात घेण्याचे प्रकार घडत असतील, तर त्यांची सखोल चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी आंदोलकांनी केली.

नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण

शहरातील विविध चौकांमध्ये वसुली एजंटांचा वावर वाढल्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होत असल्याचा दावा संघटनेने केला आहे. कर्जवसुलीची प्रक्रिया कायदेशीर चौकटीतच पार पडली पाहिजे. कोणत्याही नागरिकाला धमकावणे, अपमानित करणे किंवा शारीरिक बळाचा वापर करून पैसे वसूल करणे, अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करावा, अशी भूमिका संघटनेने मांडली. कर्जवसुली करणाऱ्या एजंटांची नियुक्ती करताना भारतीय रिझर्व्ह बँकेच्या (आरबीआय) लागू निर्देशांचे पालन करण्यात यावे. संबंधित व्यक्तींची पार्श्वभूमी तपासून आवश्यक पोलीस पडताळणी केल्यानंतरच त्यांना वसुलीचे काम देण्यात यावे. गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तींचा अशा कामासाठी वापर होणार नाही, याची दक्षता घ्यावी, अशी मागणी संघटनेने केली आहे.

कर्जवसुलीच्या प्रक्रियेवर प्रशासनाने लक्ष ठेवावे

फायनान्स कंपन्यांमधील काही कर्मचाऱ्यांकडून ग्राहकांची खासगी माहिती बाहेरील व्यक्तींना पुरवली जात असल्याचाही आरोप संघटनेने केला. या माहितीचा गैरवापर करून काही व्यक्ती वाहनचालकांना अडवतात आणि त्यांच्याकडून पैशांची मागणी करतात, असे निवेदनात म्हटले आहे. या आरोपांची स्वतंत्रपणे चौकशी करून संबंधित कंपन्यांच्या वसुली प्रक्रियेची तपासणी करावी. ग्राहकांच्या वैयक्तिक माहितीचे संरक्षण करावे आणि नियमबाह्य कृत्यांमध्ये सहभागी असणाऱ्यांवर कायद्यानुसार कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली. जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीचा विचार करून बँका, पतसंस्था आणि फायनान्स कंपन्यांच्या कर्जवसुलीला स्थगिती देण्याबाबत निर्णय घ्यावा, अनधिकृत वसुली एजंटांच्या हालचालींवर नियंत्रण ठेवावे, नागरिकांना धमकावणाऱ्या आणि मारहाण करणाऱ्या व्यक्तींवर कारवाई करावी, तसेच कर्जवसुलीच्या प्रक्रियेवर प्रशासनाने लक्ष ठेवावे, अशा प्रमुख मागण्या आंदोलनातून करण्यात आल्या.

कर्जवसुलीची प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने राबवावी

कर्जदारांनी घेतलेल्या कर्जाची परतफेड करण्याची जबाबदारी असली, तरी वसुली करताना कायदेशीर प्रक्रिया आणि नागरिकांच्या हक्कांचे पालन होणे आवश्यक आहे. आर्थिक अडचणीत असलेल्या नागरिकांना कायद्याच्या चौकटीबाहेर जाऊन त्रास देण्याचे प्रकार सहन केले जाऊ नयेत. नागरिकांना सुरक्षित वातावरण मिळावे आणि कर्जवसुलीची प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने राबवली जावी, अशी भूमिका संघटनेने व्यक्त केली.

गुरुवाणी - ९६
'नाथ' कोण?

व्यक्ती स्वतःला नाथ म्हणून जगतो. पित्याला वाटते मी मुलांचा नाथ आहे. पतीला वाटते मी पत्नीचा नाथ आहे. राजाला वाटते मी प्रजेचा नाथ आहे. पण नाथ म्हणजे नेमकं काय? नाथ म्हणजे, जो दुःख मुक्त करू शकतो. ज्याच्या सान्निध्यात भीतीची अनुभूती होत नाही. हे. सगळे मार्ग बंद होऊनही जो नवीन रस्ता तयार करू शकतो तो व्यक्ती नाथ बनू शकतो. परमात्म्याने निर्वाण कल्याणक देशनामध्ये 'अनाथ' आणि 'नाथ' विषयक विवेचन केले आहे. डॉक्टरांनी औषध दिल्यानंतर औषधाचा उपयोग रूग्णाला होतो की नाही हे सर्वस्वी रूग्णाच्या आतील शक्तीवर अवलंबून असते राजा श्रेणिकच्या मनात सुरूवातीला तीर्थंकर भगवान महावीर यांच्या विषयी अनास्था होती. पण त्याची राणी चेलना ही तीर्थंकरांची निस्सीम भक्त होती. राणी चेलना हिने भक्तीचा असा अद्भुत जागर केला की श्रेणिक सुद्धा भगवान महावीरांचा श्रेष्ठतम साधक बनला. एकदा बगिचात त्याला एक युवा योगी दिसला. राजा श्रेणिक उत्सुकतेने त्याला विचारले , इतक्या कमी वयात

दीक्षा का घेतली ? तो योगी म्हणतो, 'मी अनाथ आहे म्हणून दीक्षा घेतली'. त्यावर राजा म्हणतो, 'मी तुझा नाथ होतो, तू आरामात सर्व सुखांचा उपभोग घे'. पण तो योगी म्हणतो, 'जो स्वतःच अनाथ आहे, तो माझा नाथ कसा होईल'. राजा आश्चर्यचकित होतो. योगी म्हणतो, भौतिक गोष्टींचे मालक असलेले नाथ असतील तर श्रीमंत लोक दुःखी का असतात?. योगीने राजाला आपली कथा सांगितली. तो म्हणाला, मी कोसंबी नगरीत राहत होतो. मला सगळा परिवार होता. पण तरूणपणी मला भयंकर आजार झाला. मी तडफडत होती. औषधींचा उपयोग होत नव्हता. एके रात्री मी खूप चिंतन केले, मी वेदना मुक्त का होत नाहीय? मला कळले, पूर्वजन्मी मी लोकांना दुःख, वेदना दिल्या. तेच याजन्मी मला भोगावे लागत आहे. मी संकल्प केला, एकदा या वेदनेपासून मुक्त झालो की मी कधीच कोणावर अन्याय, अत्याचार करणार नाही. याच अनुभूतीत मी झोपी गेलो आणि आश्चर्य म्हणजे सकाळी मी पूर्ण निरोगी झाले. आजचे मेडिकल सायन्स सुद्धा सांगते, तुमच्या आतील प्रतिकारशक्ती जागृत होण्यासाठी मनात क्षमाभाव हवा. शरीर स्वतःच बरे होऊ शकते. फक्त ती शक्ती आपण जागृत केली पाहिजे. राजा श्रेणिकने ही कथा ऐकली आणि त्याचे डोळे उघडले. तो योगीची क्षमा मागून त्याची भक्ती करतो.

- उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.

अहिल्यानगर-पुणे महामार्गावर दरोड्याच्या तयारीत असलेली मोक्का गुन्ह्यातील फरार आरोपींची टोळी पकडली

नगर - नगर-पुणे महामार्गावर चास घाटात वाहने अडवून दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेल्या सराईत गुन्हेगारांच्या टोळीवर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने छापा टाकून मोक्का गुन्ह्यातील फरार आरोपींसह चार जणांच्या मुसक्या आवळल्या आहेत. या कारवाईत पोलिसांनी ३ लाख २ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून सहा आरोपी पळून जाण्यात यशस्वी झाले आहेत.

नगर जिल्ह्यातील दरोडा व जबरी चोरीच्या गुन्ह्यांना प्रतिबंध घालण्यासाठी पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी विशेष दरोडा प्रतिबंधक पथक तैनात केले होते. २९ ऑक्टोबर रोजी पथक नगर तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीत गस्तीवर असताना, नगर-पुणे महामार्गावरील चास गावच्या शिवारातील घाटात भारतीय सैन्य दलाच्या वाय-आकाराच्या चिन्हाजवळ ८ ते १० जण धारदार शस्त्रांसह दरोड्याच्या उद्देशाने थांबल्याची गुप्त बातमी मिळाली.

प्राप्त माहितीच्या आधारे पथकाने घटनास्थळी छापा टाकला असता संशयित पळून जाऊ लागले. पोलिसांनी पाठलाग करून सुशांत सुरेश भोसले (वय २३, रा. पिंपळगाव कौडा, ता. नगर), वैभव किरण भोसले (वय २६, रा. धानोरा, ता. आष्टी, जि. बीड), अविनाश सावंत उर्फ सावत्या भोसले (वय २३, रा. पिंपळगाव कौडा, ता. नगर) आणि राम उर्फ बोकड्या उर्फ बठ्या लखन काळे (वय १९, रा. कामरगाव, ता. नगर) या चौघांना ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान जाक्या संजय काळे, आवेश मिरफा भोसले, जयपाल संजय काळे, प्रथमेश मिरफा भोसले, परमेश मिरफा भोसले आणि तुषार सावत्या भोसले हे सहा साथीदार फरार झाल्याचे निष्पन्न झाले.

नगर-पुणे महामार्गावर दरोड्याच्या तयारीत असलेली मोक्का गुन्ह्यातील फरार आरोपींची टोळी पकडल्यानंतर त्यांच्या समवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

पोलिसांनी घटनास्थळावरून ३ मोटारसायकल, दोन चाकू, टायटन कंपनीचे घड्याळ आणि गलोर असा ३ लाख २ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. चौकशीत आरोपींनी चास व कामरगाव शिवारात महामार्गावर ५ ते ६ वाहने अडवून मारहाण करत चोऱ्या केल्याची कबुली दिली. अटक करण्यात आलेल्या आरोपींपैकी सुशांत भोसले, अविनाश भोसले आणि राम काळे हे सुपा पोलीस ठाण्यातील संघटित गुन्हेगारी प्रतिबंधक कायद्यान्वये (मोक्का) दाखल गुन्ह्यात फरार होते.

आरोपींवर विविध पोलीस ठाण्यांत गंभीर गुन्हे दाखल असून, या प्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता व आर्म अ‍ॅक्टनुसार गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

शालेय क्रीडा स्पर्धांच्या माध्यमातून गुणवंत खेळाडू घडतात

ज्ञानेश्वर खुरांगे यांचे प्रतिपादन; जिल्हास्तरीय शालेय किक बॉक्सिंग स्पर्धेचे उद्घाटन; ३०० खेळाडूंचा सहभाग

नगर- अहिल्यानगर जिल्ह्यातील खेळाडूंनी विविध शालेय क्रीडा प्रकारांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली असून, राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांसाठी जिल्ह्यातील १०० हून अधिक खेळाडू सहभागी झाले होते. जिल्ह्यातील खेळाडू महाराष्ट्रात विविध क्रीडा प्रकारांमध्ये चांगली आगेकूच करत आहेत. किक बॉक्सिंगमधील खेळाडूंनीही राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर आपली ओळख निर्माण केली आहे, असे प्रतिपादन जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे यांनी केले.

जिल्हास्तरीय शालेय किक बॉक्सिंग स्पर्धेचे उद्घाटन जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे यांच्या हस्ते झाले. (छायाचित्र - अमित मन्यार)

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय आणि अहिल्यानगर जिल्हा किक बॉक्सिंग स्पोर्ट असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय शालेय किक बॉक्सिंग स्पर्धेचे उद्घाटन खुरांगे यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. या स्पर्धेत १४, १७ आणि १९ वर्षांखालील वयोगटांतील सुमारे ३०० खेळाडूंनी सहभाग नोंदविला. यावेळी क्रीडा अधिकारी प्रवीण कोंढावळे, सचिन मकासरे, जयेश आनंदकर, ओंकार झोडगे, माऊली जमदाडे, सचिन साळवे, प्रशांत बोऱ्हाडे, लखन शिंदे, गोकुळ सोलाट, अमोल कासार यांच्यासह खेळाडू, प्रशिक्षक आणि पालक उपस्थित होते.

महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांमध्ये क्रीडा आयोजनाच्या बाबतीत अहिल्यानगर जिल्हा प्रथम क्रमांकावर आहे. यंदा जिल्ह्यात १३ राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांसह कबड्डीच्या राष्ट्रीय स्पर्धेचेही आयोजन करण्यात आले. सन २०३६ मधील ऑलिंपिक आणि २०३२ मधील कॉमनवेल्थ गेम्स डोळ्यांसमोर ठेवून महाराष्ट्र शासन आणि केंद्र सरकार विविध क्रीडा प्रकारांतील खेळाडूंना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देत असून, प्रशिक्षण केंद्रांची निर्मितीही करत आहे. मिशन लक्षवेधच्या माध्यमातून जिल्ह्यात पाच खेळांची जिल्हास्तरीय प्रशिक्षण केंद्रे कार्यान्वित करण्यात येत आहेत. किक बॉक्सिंगमधील खेळाडूंनीही जिद्द आणि सातत्याच्या जोरावर पुढील स्तरावर यश मिळवावे. जिल्हा किक बॉक्सिंग असोसिएशनचे अध्यक्ष निलेश शेलार हे आंतरराष्ट्रीय स्तरावर किक बॉक्सिंगमध्ये भारताचे नेतृत्व करत आहेत, ही जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब आहे, असे खुरांगे म्हणाले.

आत्महत्येस प्रवृत्त केल्याच्या गुन्ह्यातील चार आरोपींचा अटकपूर्व जामीन मंजूर

शेवगाव - बोधेगाव ता.शेवगाव जि.अ.नगर येथील रहिवासी असलेले युवकाने राहत्या घरी पंख्यास गळाफास लावून घेत आत्महत्या केली म्हणून बोधेगाव गावातील १) विष्णू बाजीराव खाडे २) ज्ञानेश्वर बाजीराव खाडे ३) सारिका विष्णू खाडे ४) सविता ज्ञानेश्वर खाडे यांच्याविरुद्ध शेवगाव पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर नंबर ७२६/२०२६ अन्वये आत्महत्येस प्रवृत्त केल्याच्या व इतर गंभीर कलमाखाली गुन्हा दाखल झालेला होता. सदर प्रकरणातील हकीकत फिर्यादीच्या कथनानुसार की, आत्महत्या केलेल्या माझ्या मुलास आरोपींनी लाथा बुक्क्याने व महिलांनी चपल्याने मारल्यामुळे गावात अपमानित केले व आरोपी सतत शिवीगाळ करत, जीवे ठार मारून टाकण्याची धमकी देत आणि आरोपींच्या सतत त्रासाला कंटाळून मुलाने आत्महत्या केली, अशी फिर्याद दिली होती.

सदर अति गंभीर गुन्ह्यात अटकपूर्व जामीन भेटावा यासाठी आरोपींनी जिल्हा व सत्र न्यायालयात अँड सचिन पाठक गुरुजी यांच्यामार्फत जामीन अर्ज दाखल केला होता. सदर अर्जावर प्रखरपणे युक्तिवाद करून सदर आरोपींचा आत्महत्या केलेल्या तरुणांशी कुठलाही संबंध नाही व आत्महत्येच्या घटनेशी आरोपींचा संबंध नाही तरुणाच्या खिशामध्ये कोणत्याही प्रकारची चिठ्ठी अथवा आरोपीमुळे मी आत्महत्या करीत आहे असं पत्र सुद्धा सापडलं नाही. आरोपींच्या वकिलांनी न्यायालयात युक्तिवाद करताना सांगितले की, सदर गुन्ह्यात आत्महत्येस प्रवृत्त करण्यासाठी कोणताही ठोस पुरावा नाही. केवळ वादातून हा गुन्हा दाखल झाला आहे. गुन्हा दाखल करताना संबंधित पोलिसांनी कशा त्रुटी अपूर्ण ठेवल्या, ज्या कलमाखाली गुन्हा दाखल केला ती कलमच सदर गुन्ह्यांमध्ये लागू होत नाही या व अशा बऱ्याच नानाविध गोष्टी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. तसेच आरोपी हे शेवगाव परिसरातील प्रतिष्ठित रहिवासी शेतकरी कुटुंबातील असून ते तपासात सहकार्य करण्यास तयार आहेत. न्यायालयाने घालून दिलेल्या अटी शर्तीचे पालन करण्यास तयार आहे. असा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने आरोपींचा अटकपूर्व जामीन मंजूर केला. आरोपींनी तपासात सहकार्य करावे आणि पुराव्यात हस्तक्षेप करू नये, अशा अटी घातल्या आहेत. या कामी आरोपींतर्फेड.सचिन पाठक यांनी काम पाहिले. आरोपींचा अटकपूर्व जामीन अर्ज मंजूर करण्यात यश आले.



विविध राज्यांतून शोधून काढलेले अडीच लाखांचे हरवलेले मोबाईल पोलिसांनी मालकांना परत केले.

विविध राज्यांतून शोधून काढलेले अडीच लाखांचे हरवलेले मोबाईल पोलिसांनी मालकांना केले परत

नगर -नागरिकांचे गहाळ झालेले व हरवलेले मोबाईल शोधून काढण्यासाठी अहिल्यानगर सायबर पोलीस ठाण्याच्या वतीने विशेष तांत्रिक शोध मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत सायबर पोलिसांच्या तांत्रिक पथकाने अत्यंत बारकाईने व कौशल्यपूर्ण तांत्रिक विश्लेषण करून भारतातील विविध राज्यांमध्ये सक्रिय असलेल्या एकूण आठ स्मार्टफोन्सचा शोध घेऊन ते यशस्वीरीत्या हस्तगत केले आहेत.

जप्त करण्यात आलेल्या या सर्व मोबाईल फोन्सची अंदाजे बाजारातील किंमत दोन ते अडीच लाख रुपये असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. हस्तगत करण्यात आलेले हे सर्व मोबाईल फोन सायबर पोलीस ठाण्यात संबंधित मूळ तक्रारदार व मालकांना पाचारण करून योग्य कायदेशीर पडताळणीअंती सन्मानाने परत सुपूर्द करण्यात आले. आपले हरवलेले महागडे मोबाईल फोन पुन्हा सुरक्षित स्थितीत हाती मिळाल्यामुळे सर्व नागरिकांनी अत्यंत समाधान व्यक्त केले असून, अहिल्यानगर सायबर पोलिसांच्या कार्यतत्परतेबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार मानले आहेत.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन आणि अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलूबर्मे यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी आणि अंमलदार यांच्या पथकाने पार पाडली आहे.

राज्य केमिस्ट अ‍ॅण्ड ड्रगिस्ट असोसिएशनच्या निवडणुकीत 'शिंदे पॅनल'ला बहुमत; अध्यक्षपदी सलग दहाव्यांदा निवड

नगर - महाराष्ट्र राज्य केमिस्ट अँड ड्रगिस्टअसोसिएशनच्या (एमएससीडीए) सन २०२६-२०२९ या कालावधीसाठी शिर्डी येथे झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत आप्पासाहेब शिंदे पॅनलने बहुमत मिळवत विजय संपादन केला. या निवडणुकीत शिंदे यांची संघटनेच्या अध्यक्षपदी सलग दहाव्यांदा निवड झाली आहे.

महाराष्ट्र राज्य केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनच्या (एमएससीडीए) सन २०२६-२०२९ या कालावधीसाठी शिर्डी येथे झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत आप्पासाहेब शिंदे पॅनलने बहुमत मिळवत विजय संपादन केला. या निवडणुकीत शिंदे यांची संघटनेच्या अध्यक्षपदी सलग दहाव्यांदा निवड झाली आहे.

नवनिर्वाचित कार्यकारिणीमध्ये उपाध्यक्षपदी रामदास भोसले आणि सुनील भंगाळे यांची निवड झाली आहे. संघटनेच्या सचिवपदी अनिल नावंदर यांनी मताधिक्याने विजय मिळवला, तर कोषाध्यक्षपदी वैजनाथ जागुष्टे यांची निवड झाली आहे. महाराष्ट्र राज्याचे जनसंपर्क अधिकारी म्हणून अजित पारख यांची निवड करण्यात आली असून, सोलापूर येथील बसवराज मनुरे यांची कायदेशीर सल्लागारपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच सहसचिवपदी सुनील छाजेड आणि संघटन सचिवपदी पंकज नानवाणी यांनी विजय मिळवला आहे.

असोसिएशनची दोन दिवसीय कार्यकारिणी सभा, निवडणूक प्रक्रिया शिर्डी येथे पार पडली. आयोजनासाठी जनसंपर्क अधिकारी अजित पारख व अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष दत्ता गाडळकर यांच्या मार्गदर्शनाखाली सचिव आबासाहेब बेद्रे, खजिनदार प्रशांत उबाळे, शशांक रासकर, चेतन कर्डिले, सूर्यकांत भुजाडी, गणेश वाणी, सचिन शिंदे, अतुल चांगले, रवींद्र गुलाटी, अमित धाडगे, रुपेश भंडारी, आशुतोष कुकडे, साहेबराव आहेर, अवधूत बोरुडे, शैलेंद्र औटी, तात्याराम बांदल, सुहास जरांगे, सूरज लांडे, ज्ञानेश्वर दरंदले, युवराज खेडकर, बाळासाहेब ढेरंगे, विजय जगताप, संदेश जाजू, सचिन अमृतकर, मनोज खेडकर, भरत सुपेकर, महेश आठरे, कमलेश गुंदेचा, नितीन सातपुते, अभिजीत गांगर्डे आणि सोमाणी मनीष यांनी योगदान दिले.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

नगर शहरात १ नोव्हेंबर रोजी द भक्ती बीट्स - देव । देश । धर्म विशेष सांगितीक कार्यक्रम

नगर - अनाहत एक कलासृष्टी प्रस्तुत द भक्ती बीट्स - देव । देश । धर्म या अभिनव संकल्पनेतून भजन जॅमिंग अँड फ्युजन हा विशेष सांगीतिक कार्यक्रम १ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता सावेडी येथील माऊली सभागृहात विनामूल्य आयोजित करण्यात आला आहे. महावीर ग्रुप यांच्या सहकार्यातून, तर विचार भारती आणि समर्थ सत्संग परिवार यांच्या सहयोगातून हा भक्तिरसपूर्ण सांगीतिक सोहळा रंगणार आहे.

या कार्यक्रमात तबला, पखवाज, हार्मोनियम आणि ढोलक यांसारख्या पारंपरिक वाद्यांसोबत गिटार, की-बोर्ड आणि आधुनिक तालवाद्यांची सुरेल साथ रसिकांना अनुभवता येणार आहे. भक्तिरसपूर्ण गायन, पारंपरिक सुरावटी, दमदार ताल आणि आधुनिक फ्युजन यांच्या माध्यमातून भजनांचा एक वेगळाच संगीताविष्कार सादर केला जाणार आहे. त्यामुळे पारंपरिक भजनांचा आनंद घेतानाच आधुनिक संगीताची ऊर्जा अनुभवण्याची संधी संगीतप्रेमींना मिळणार आहे.

कार्यक्रमात उमेशराज साळुंके, गणेश बैरागी, सौरभ साठे, गौरी रत्नपारखी, महेशराज साळुंके, ज्ञानेश्वर पाठक, विधान बैरागी, भावेश राणे, किर्तेश बाविस्कर, सागर वाघमारे, धनंजय गोहेर, अनिकेत साळुंके आणि यश फुलारे हे गायक व वादक आपल्या कलागुणांचे सादरीकरण करणार आहेत.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसाद बेडेकर करणार आहेत. विविध गायक आणि वादकांच्या कलाविष्कारातून भक्तिसंगीताची विविध रूपे आणि आधुनिक संगीताचा नवा अनुभव रसिकांसमोर उलगडणार आहे, असा विश्वास अनाहत एक कलासृष्टीचे अध्यक्ष प्रसाद सुवर्णपाठकी, ओंकार देऊळगावकर आणि अविनाश शिरापूरी यांनी व्यक्त केला.

भाड्याने देणे
दुकानासाठी २४०० स्के. फु.
ऑफिससाठी १७०० स्के. फु.
प्रेमदान चौक येथे
रोहन रियल्टी
9881241060

भाड्याने देणे
माळीवाडा महात्मा फुले रोडवर, रोडटच
४५० ते ५०० स्के. फुट चे
२ शॉप्स खाली-वर
भाड्याने देणे आहे
9890108171

पाहिजेत
एम.जी रोड येथे मेन्स रेडीमेड दुकानासाठी
अनुभवी हेल्पर
त्वरीत पाहिजेत
(जागा-३)
(भरपूर पगार,दिवाळी बोनस)
9422300550

पाहिजेत
लेडिज अकौऊंटन्ट
मराठी, इंग्रजी व कॉम्प्युटर अकौटंस्चे ज्ञान व अनुभव आवश्यक
संपुर्ण माहितीसह अर्ज करा किंवा समक्ष भेटा -
न्यु महावीर एंटरप्राईजेस
मार्केटयार्ड, अ,नगर मो.9422673199, 9537271513

चाहिए
चाहिए भारी मात्रा में सिक्योरिटी गार्ड,वा सिक्योरिटी सुपरवायझर वा मामा, मावशी अहिल्यानगर के लिए
संपर्क :
मिश्रा सिक्युरिटी
अँड फायर सर्विस
9422222241/8888886073

आनंदाची दिवाळी, ऑफर्सची बरसात!
Guru SUPERMARKET

रवा 1Kg MRP : ₹ 65/- OFFER : ₹ 55/-	मैदा 1Kg MRP : ₹ 65/- OFFER : ₹ 55/-	बेसन 1Kg MRP : ₹ 170/- OFFER : ₹ 140/-
दळ्या 250g MRP : ₹ 55/- OFFER : ₹ 42/-	चना दाल 1Kg MRP : ₹ 150/- OFFER : ₹ 115/-	भडंग 500g MRP : ₹ 120/- OFFER : ₹ 80/-
मक्का पोहा 500g MRP : ₹ 50/- OFFER : ₹ 41/-	पातळ पोहा 500g MRP : ₹ 55/- OFFER : ₹ 47/-	दगडी (क्रांती) पोहा 500g MRP : ₹ 60/- OFFER : ₹ 50/-
भाजका पोहा 500g MRP : ₹ 60/- OFFER : ₹ 47/-	सोलापुरी पोहा 400g MRP : ₹ 65/- OFFER : ₹ 53/-	मुरमुरा 500g MRP : ₹ 70/- OFFER : ₹ 50/-

WIDE RANGE OF QUALITY DRYFRUITS BOXES
गुरु सुपरमार्केट
माळवी संकुल समोर झोपडी कॅंटीन मागे,अहिल्यानगर
दिवाळीपर्यंत दर सोमवारी दुकान चालु राहील.

Career Ki Shuruwat DiSHA ke saath
Get Any Course Just in
2700/-
MS-OFFICE, ADV. EXCEL, Tally Prime, Advance Tally, TAXATION, 2D CAD, 3D CAD, CORELDRAW, PHOTOSHOP ILLUSTRATOR, IN DESIGN, C PROGRAMMING C++, CANVA, HTML.
An ISO 9001:2015 Certified
DiSHA COMPUTER INSTITUTE
दिल्ली गेट शाखा
आनंद केशव टावर्स, सुपेकर मेडिकलच्या वरती, पहिला मजला, दिल्ली गेट, अ.नगर.
9371051769
जुने बस स्टॅंड शाखा
अक्षर प्लाझा बिल्डिंग, पाटीदाती समोर स्टेट बँकेशेजारी, अ.नगर.
9371151769
पाईपलाईन शाखा
रुपा गार्डन बिल्डिंग, भिस्तबाग चौक, पाईपलाईन रोड अहमदनगर
7447761769

विकणे/ भाड्याने देणे
सारसनगर येथे नवीन
3BHK
बंगला विकणे आहे
2BHK
फ्लॅट भाड्याने आहे
9604914748

सावेडी येथील नामांकित शोरुमसाठी
त्वरित पाहिजेत
सेल्समन/सेल्सगर्ल- १०
१ ते २ वर्षाचा अनुभव
कॅशिअर-०४
(आकर्षक पगार) -अजलिह समक्ष भेटा -
Franchise by - DS VENTURES One Stop Shop
SONY GIFTS PVT. LTD.
Address : Opp. Gold's Gym, TV Center, Savedi Road, A.Nagar
7887395983

Shankarleela INFRASTRUCTURES PVT. LTD.
पाहिजेत
आम्ही खालील पदासाठी कुशल व अनुभवी उमेदवारांच्या शोधात आहोत
सीनियर अकाउंटंट - पदे 2 | ज्युनिअर अकाउंटंट - पदे 2
साईट सुपरवायझर - पदे 4
साईट इंजिनिअर (बी.ई. सिव्हिल) - पदे २
आत्ताच अर्ज करा!
ऑफिसचा पत्ता : ३०१, एपी.स्क्वेअर, प्रोफेसर चौक, सावेडी, अ.नगर
संपर्क : 7063638080 | 7037374949

पाहिजेत
कापड दुकानाकरीता
मुली/महिला -२
रेवती कुर्तीज्
मोचीगल्ली, अहिल्यानगर
8055314108
8055314107

पाहिजेत
चार वर्षाच्या मुली संभाळण्यासाठी
आया पाहिजे
योग्य पगार दिला जाईल
9403619486

विकणे आहे
श्री दत्त देवस्थान ट्रस्ट, वेदांतनगर, अहिल्यानगर येथे रिकामे तेलाचे व तुपाचे डबे तसेच पेपर पुठ्ठा जुना आहे त्या स्थितीत विकणे आहे. प्रत्यक्ष वस्तु/माल पाहून इच्छुक व्यक्ती/व्यापाऱ्यांनी आपले दरपत्रक दिनांक १०/११/२०२६ पर्यंत खालील पत्त्यावर पाठवावे.
श्री. मिलिंद गोविंद क्षीरसागर कायम विश्वस्त
श्री दत्त देवस्थान ट्रस्ट
वेदांतनगर, सावेडी, अहिल्यानगर फोन नं :- ०२४१-२४२३५८५

ना नफा ना तोटा पहिली तीन वर्ष.. कृपया त्याचा फायदा घ्या
कृपया जवळच्या किराणा ड्रायफ्रुट दुकानदारांना संपर्क करा
रत्नकमल चहा
दिवाळी धमाका पॅकेटमध्ये
कुकर, दहा किलो पिशवी, आरती संग्रह, पाऊच यांचे रॅडमली कुपन

इतर कंपन्यांपेक्षा ५० ते ७० रुपये कमी किलो मागे स्वस्त दर्जा त्यापेक्षाही उत्तम..
ब्रॅंडेड कंपनीचा चहा व
रत्नकमल चहा
एक वेळेस जरुर तुलना करुन पहा
आशिष ट्रेडर्स चहा पावडरचे ठोक व किरकोळ विक्रेते
रत्नकमल, बुरुड गल्ली, मारुती मंदिरासमोर, अहिल्यानगर - ४१४००१
Contact : 8767369367

दिवाळी महासेल.. स्टॉक असेपर्यंत...
महिलांसाठी : साडी, कुर्ती, लेगीन्स, वन पीस,ब्लाउज भारी, टॉप, लोवर — रु.२००/-ला काहीही १ व रु.५०० ला ३
लेडीज : स्लॅक ते XL टू पीस, कॉर्ड सेट, नाईट ड्रेस — रु.२५०/-
टू पीस 3 XL ते 6 XL — रु.३००/-
* लहान मुला-मुलींचे ड्रेस रु. २०० पासून पुढे
* लहान व मोठ्या मुलींचे भारी कपडे रु.३०० पासून पुढे
* बेडशीट+पिलो कव्हर
100 x 100 चे ८०० चे रु.४००/-
108 x 108 चे रु.१२०० चे रु.५००/-
वेळ : दुपारी १२ रात्री ८ वाजेपर्यंत
* ब्रॅण्डेड लेडीज २ पीस थ्री पीस रु.१००० पासून पुढे
* जेन्टसचे ब्रॅण्डेड शर्ट, टी-शर्ट 6XL पर्यंत तसेच फॉर्मल पॅण्ट व जीन्स ४४ साईजपर्यंत व जम्बो बेडशीट उपलब्ध.
अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल मयुरी लेडिज मॉल
मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कुल जवळ, आगरकर मळा, अहिल्यानगर ९०२८२०११८८

फेब इंडियन
हॅण्डलूम एण्ड हॅण्डीक्राफ्ट
आर्ट & क्राफ्ट एक्झीबीशन

Diwali SPECIAL
आमच्या एक्झीबिशन मध्ये कोणत्याही दुकानातून रु. 1999 पेक्षा जास्त खरेदी करा आणि लकी ड्रॉमध्ये जिंका आकर्षक बक्षिसे

• चंदेरी आणि पटोरा साडी
• बनारसी साडी-ड्रेस मटेरिअल्स
• पंच वर्क • पश्चिम बंगाल साडी
• लखनवी चिकन • कोटा सिल्क
• काश्मीर सूट आणि पश्मिना शाल
• जयपूर बेडशीट्स • राजस्थानी मोजरी
• भदोई कार्पेट • ज्वेलरी • खादी शर्ट
BOOKS • गृह उपयोगी वस्तु
वेळ : स. ११.०० ते रा. १०.०० पर्यंत
पार्किंग व एन्ट्री फ्री
ओपन ग्राउण्ड - पारिजात चौक
तांबटकर मळा, गुलमोहर रोड, अहिल्यानगर

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खाली परिशिष्टामध्ये नमूद केलेली मिळकती या **संतोष धर्मा आव्हाड व सचिन तुकाराम पवार** यांनी खरेदी दस्त क्र. ६९००/२०२६ अन्वये दि. १९/०९/२०२६ रोजी खरेदी घेतलेल्या असून सदर मिळकतीचे खरेदीखताबाबत फेरफार क्र. ५६५७ घेण्यात आलेला असून अद्याप त्यांचे नावाची नोंद झालेली नाही. तरी सचिन तुकाराम पवार व संतोष धर्मा आव्हाड यांनी गोषवारा-२ वरुन सदर मिळकतीबाबत आमचे अशिल विश्वजित रमेश कासार यांना खरेदी देण्याचे ठरविले असून त्याप्रमाणे बोलणी अंतिम झालेली आहे व विसारापोटी रक्कम देखील स्वीकारलेली असून नोंदणीकृत साठेखत व जनरल मुखत्यारपत्र लिहून नोंदवून दिलेले आहे.

सदर मिळकत निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची असून त्यामध्ये त्यांचे शिवाय इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारे कसलाही मालकी हक्क, हितसबंध अगर बोजा नाही. अशी त्यांनी आमचे अशिलास खात्री दिली असून भरवसा दिलेला आहे. तथापी मिळकतीबाबत कोणाचेही गहाण, दान, बक्षिसपत्र, भाडेपट्टा, विसार पावती, खरेदीखत इत्यादी कोणत्याही प्रकारचा मालकी अगर इतर हक्क, हितसबंध अगर ताबा असल्यास त्यांनी १० दिवसांचे आत कागदपत्रानिशी आमची खात्री पटवावी. अन्यथा सदर मिळकत निर्वेध, नजोखमी व बिनबोजाची असल्याचे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कोणतीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी

परिशिष्ट

मिळकतीचे वर्णन :- जिल्हा अहमदनगर, पोट तुकडी तालुका नगर पैकी मौजे. बाबुर्डी घुमट येथील शेत जमीन मिळकत सर्व्हे नंबर २८९ चे क्षेत्र१ हे.३५ आर या पैकी संतोष धर्मा आव्हाड व सचिन तुकाराम पवार यांचे नावे असलेले पैकी ० हे. २९ आर क्षेत्राची मिळकत यांसी चतु:सिमा - रेकार्ड प्रमाणे येणे प्रमाणे त्यातील तदंगभुत वस्तूंसहीत वागणुकीचे व वहिवाटीचे हक्कासुध्दा

अहिल्यानगर ता. ३०/१०/२०२६

ॲड. आनंद भगवानराव व्यवहारे (बी.ए.एलएल.बी)
ऑफिस - प्रेमदान हॉटेल मागे, सावेडी रोड, अहिल्यानगर,
मो.नं. ९८२२७९८२२३

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खाली परिशिष्टामध्ये नमूद केलेली मिळकत हि **विनय कल्याण वाखुरे** यांचे मालकी वहिवाटीची मिळकती असून सदर मिळकत आमचे अशिल विश्वजित रमेश कासार यांना खरेदी देण्याचे ठरविले असून त्याप्रमाणे बोलणी अंतिम झालेली आहे.

सदर मिळकत निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची असून त्यामध्ये त्यांचे शिवाय इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारे कसलाही मालकी हक्क, हितसबंध अगर बोजा नाही. अशी त्यांनी आमचे अशिलास खात्री दिली असून भरवसा दिलेला आहे. तथापी मिळकतीबाबत कोणाचेही गहाण, दान, बक्षिसपत्र, भाडेपट्टा, विसार पावती, खरेदीखत इत्यादी कोणत्याही प्रकारचा मालकी अगर इतर हक्क, हितसबंध अगर ताबा असल्यास त्यांनी **१० दिवसांचे** आत कागदपत्रानिशी आमची खात्री पटवावी. अन्यथा सदर मिळकत निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची असल्याचे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही कोणतीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी

परिशिष्ट

मिळकतीचे वर्णन :- जिल्हा अहमदनगर, पोट तुकडी तालुका नगर पैकी मौजे. केडगांव येथील मिळकत गट नंबर १२६/ब पैकी प्लॉट नंबर ४२ चे क्षेत्र 0.१० आर हि मिळकत विद्यमान मालक विनय कल्याण वाखुरे यांचे मालकी वहिवाटीची मिळकत यांसी चतु:सिमा - रेकॉर्ड प्रमाणे येणे प्रमाणे त्यातील तदंगभुत वस्तूसहीत वागणुकीचे व वहिवाटीचे हक्कासुध्दा

अहिल्यानगर, ता. ३०/१०/२०२६

ॲड. आनंद भगवानराव व्यवहारे (बी.ए.एलएल.बी)
ऑफिस - प्रेमदान हॉटेल मागे, सावेडी रोड, अहिल्यानगर,
मो.नं. ९८२२७९८२२३

दर्जेदार व माफक दरात
फ्लेक्स प्रिंटींग
9403232323

जाहिर प्रकटन

मी श्री.प्रभाकर कृष्णराव काळे असून राहणार मुळा पब्लिक स्कुल जवळ, राहुरी रोड,मु.पो.सोनई,तालुका नेवासा, जिल्हा अहिल्यानगर. ४१४१०५ या द्वारे तमाम सर्व लोकांस या जाहिर प्रकटनाद्वारे निवेदन देतो की,

माझे नोंदणीकृत करारनामा (ॲग्रीमेंट टू सेल) दस्त नंबर २८०३/२००८ हवेली -४,पुणे या मूळ दस्तऐवज,त्या सोबतची पावती आणि इन्डेक्सची मूळ नक्कल माझ्या कडूनदिनांक १५/१०/२०२६ च्या सुमारास नजरचुकीने गहाळ झाला असून, त्या बाबत सोनई पोलीस स्टेशनमध्ये वरीलप्रमाणे दस्त गहाळ झाल्याची तक्रार रजिस्टर नं. २४६/२०२६ नुसार दाखल केली असून, तरी वरीलप्रमाणे कागदपत्रे यदा कदाचित कुणाला सापडल्यास किंवा कुणाकडे आढळल्यास कृपया कुणीही त्याचा गैरवापर करू नये. तसेच ज्या कुणाला सदरील कागदपत्रे सापडतील त्यांनी कृपया मला वर नमूद केल्यानुसार पत्यावर संपर्क साधून माझेकडे पोहोचकरावे

दिनांक २९/१०/२०२६

घोषणाकर्ता
श्री. प्रभाकर कृष्णराव काळे
मोबाईल नंबर- ९९२२००९०४१

कॅन्सर बरा होऊ शकतो !

मोफत कॅन्सर तपासणी व अल्पदरात उपचार व शस्त्रक्रिया शिबीर
सोमवार दिनांक 2 नोव्हेंबर 2026 । सकाळी 10 ते दुपारी 2 वाजेपर्यंत
शिबिरामध्ये खालील कॅन्सर रूग्णांची मोफत तपासणी केली जाईल.
तोंडाचा कॅन्सर । घसा व अन्ननलिकेचा कॅन्सर । फुफ्फुसाचा कॅन्सर । मुत्राशयाचा कॅन्सर
मुत्रपिंडाचा कॅन्सर । प्रोस्टेट कॅन्सर । हाडांचा कॅन्सर । गर्भाशयाचा कॅन्सर ।
स्तनाचा कॅन्सर । अंडाशयाचा कॅन्सर । मोठ्या आतड्याचा गुदाशयाचा कॅन्सर ।
लहान मुलांचा कॅन्सर । ब्लड कॅन्सर
तज्ञ डॉक्टर्स - डॉ. अनिकेत शिंदे कॅन्सर सर्जन | डॉ. तुषार मुळे कॅन्सर फिजिशियन
बालरोग रक्तविकार तज्ञ - डॉ. शिल्पा बलसारा । फिजिशियन - डॉ. गजेंद्र गिरी, डॉ. स्वप्निल शिंदे, डॉ. प्राजक्ता पारधे । स्त्रीरोग तज्ञ - डॉ. रविंद्र मुथा, डॉ. कृतिका पाटील, डॉ. निलोफर धानोरकर । रेडिओलॉजिस्ट - डॉ. मितेश कटारिया, डॉ. मस्ती फलके, डॉ. सोनाली सोलट, डॉ. निखिता जैन (कटारिया), डॉ. हेना सुराणा । मायक्रोबायोलॉजिस्ट - डॉ. नरेंद्र पाटील
पॅथोलॉजिस्ट - डॉ. मुकुंद उंडे, डॉ. सरिता झरेकर, डॉ. जिज्ञासा मुनोत
आमची वैशिष्ट्ये -
• आधुनिक तंत्रज्ञान व जागतिक दर्जाची उपकरणे
• अनुभवी व समर्पित तज्ञ डॉक्टरांची टिम
• मानसिक समुपदेशन व आधार
• रेडिएशन उपचारावर समुपदेशन व सल्ला
मॅमोग्राफी, एमआरआय, सिटीस्कॅन, सोनोग्राफी, पॅथोलॉजीच्या सर्व तपासण्या एकाच छताखाली
केमोथेरपी डे-केअर । 6 मॉड्युलर ऑपरेशन थिएटर्सची सुविधा देखील उपलब्ध
महात्मा फुले जन आरोग्य योजने अंतर्गत सर्व प्रकारच्या सर्जरी व केमोथेरपी मोफत केली जाईल तसेच सर्व उपचार व तपासण्या अत्यंत अल्प दरात केले जातील.
जैन सोशल फेडरेशन संचलित
आनंदऋषिजी हॉस्पिटल व हार्ट सर्जरी सेंटर
124, आनंदऋषिजी मार्ग, अहिल्यानगर 414001
0241-2320474 / 75 / 76
एमआरआय ₹ 2500/- | सिटीस्कॅन ₹ 1250/- | मॅमोग्राफी ₹ 100/- | सोनोग्राफी ₹ 950/-
अहिल्यानगर जिल्ह्यातील 260 बेडचे अद्यावत एकमेव N.A.B.H मान्यता प्राप्त रुग्णालय
NABH (FULL ACCREDITED) & ISO 9001:2015 HOSPITAL
24 X 7 ॲम्ब्युलन्स व मेडिकल सुविधा उपलब्ध

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही **श्री.बलवंत महादेव पवार** यांना वारसाहक्काने आलेली मिळकत होती व आहे. सदर मिळकती बाबत आमचे अशिलाने बलवंत महादेव पवार यांचे बरोबर मेमोरेंडम ऑफ अन्डरस्टॅंडीग केलेले हाते व त्यानुसार सदर मिळकतीचे विकसन करण्यासाठी विकसन करारनामा करण्याचे ठरलेले हाते. M.O.U पोटी आमचे अशिलांने बलवंत महादेव पवार यांना मोठी रक्कम अनामत दिलेली होती व आहे. सदर मिळकतीचा ताबा मिळाल्यानंतर व जमीन एन. ए. करुन घेतल्यानंतर विकसन करारनामा करून मिळकतीचे विकसन करण्याचे ठरलेले होते. दरम्यानचे काळात सदर पुर्तता होण्या पुर्वी सदर बलवंत महादेव पवार हे मयत झालेले आहे. सदर M.O.U नुसार त्यातील सर्व अटी व शर्ती हे मयत बलवंत महादेव पवार यांचे वालीवारसांवर बंधनकारक होते व आहे. सदर M.O.U नुसार बलवंत महादेव पवार हे सदर मिळकत तिऱ्हाईत इसमांचे हक्क, हितसंबंध निर्माण करणार नाहीत असे त्यांनी कबूल केलेल होते.

आमचे अशिलांचा सदर मिळकत हितसंबंध आहे, व त्यांचा सदर मिळकती संबंधाने M.O.U अस्तित्वात आहे व ते मिळकतीचे विकसन करण्यासाठी करार करण्यास सदैव तयार व इच्छुक होते व याबाबत सर्वांना माहिती व्हावी व कुणीही सदर मिळकती संबंधाने व्यवहार करू नये म्हणून सदरची जाहीर नोटीस देण्यात येत आहे. याउपरही सदर मिळकती बाबत कुणीही व्यवहार केल्यास सदर व्यवहार आमचे अशिलांचे मिळकतीतील हितसंबंधा बाबत बंधनकारक राहणार नाही व व्यवहार करणारा क्लीअर टायटल मिळणार नाही, याची नोंद घेण्यात यावी. कुणाचीही फसवणुक होऊ नये म्हणून सदरची जाहीर नोटीस दिली असे.

परिशिष्ट

डिस्ट्रीक्ट अहिल्यानगर सबडिव्हीजन तालुका नगर पैकी मौजे चाहुराणा बुद्रुक येथील शेतजमीन महानगरपालिका हद्दीतील मिळकत त्याचा सर्व्हे नं. ५३/१अ चे क्षेत्र ३ एकर ० गुंठे या पैकी पुर्वेकडील क्षेत्र ५२.५० आर (५२५५.४१ चौ.मी.) यापैकी बलवंत महादेव पवार यांचे मालकीची व हिश्यात आलेले २३२३.४२ चौ. मी. (२५,००० स्क्वे. फुट) क्षेत्र

यासी चतु:सिमा
पुर्वेस- स. नं. १३४/२अ,२ब व ३ दक्षिणेस- ९ मी. रस्ता व स. नं. ५३/१ब
पश्चिमेस- ९ मी. रस्ता व स. नं. ५३/१अ पैकी
उत्तरेस- १२ मी. रस्ता व स. नं. ५३/१अ
येणेप्रमाणे चतु:सिमा पुर्वक मिळकत तदंगभुत वस्तुंसह काही एक राखून न ठेवीता.

दि.३०/१०/२०२६, ठिकाण-अहिल्यानगर

ॲड. जावेद ए. खान
रा. ४९, कहकशा बंगला, मौलाना आझाद शाळेजवळ, इरीगेशन, ऑफिस मागे, अहमदनगर, मो. ९२७०६७७२०१

जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते कि, खालील परिशिष्टात नमुद केलेली मिळकत **श्री. मनिष अशोकलाल पोखर्णा व सौ. सपना मनिष पोखर्णा रा. मार्केट यार्ड, पुणे -३७** यांचे खरेदी मालकिची आहे. सदर विद्यमान मालकाने नमुद मिळकत आमचे पक्षकारास कायमस्वरुपी विक्री करण्याचे ठरविले आहे. आमचे पक्षकार लवकरच खरेदी व्यवहार पुर्ण करणार आहेत. सदर मिळकत निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची असलेबाबत खात्री - भरंवसा विद्यमान मालक यांनी दिला आहे.

यदाकदाचित नमुद मिळकत बाबत काही वाद - विवाद, करार, साठेखत, गहाण- दान, बक्षिस - जप्ती अथवा कोणताही वाद असल्यास संबंधितांनी हि जाहिर नोटीस प्रकाशित झालेपासुन १५ दिवसांचे आत खालील पत्यावर लेखी रजिस्टर पोस्टाने अस्सल कागदपत्रांसह कळवावे व हरकत बाबत खात्री करून द्यावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास नमुद मिळकत हि निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची आहे असे समजुन खरेदी व्यवहार पुर्ण करतील. तसेच संबंधितांनी त्यांचे हक्क - हितसंबंध जाणिवपुर्वक सोडुन दिले आहेत असे समजले जाईल व तद्नंतर कोणाचीही कोणतीही हरकत चालणार नाही याची नोंद घ्यावी म्हणुन हि जाहिर नोटीस दिली असे.

परिशिष्ट

मिळकत वर्णन : मौजे चाहुराणा बुद्रुक तालुका नगर जिल्हा अहमदनगर येथील महानगर पालिका हद्दीतील सर्वे नंबर ६१/६२/६३/१/२/६४/६५/ हिस्सा नंबर ३७/ प्लॉट नंबर ५० त्याचे क्षेत्रफळ २९९.०२ चौ. मी. संपुर्ण प्लॉट मिळकत.

त्याची चतु:सिमा खालीलप्रमाणे -
पूर्वेस - ९ मिटर रस्ता — दक्षिणेस - प्लॉट नंबर ४९
पश्चिमेस - प्लॉट नंबर ५८ — उत्तरेस - प्लॉट नंबर ५१
येणे प्रमाणे मिळकत तदंगभुत हक्क व वहिवाटीसह.

जाहिर नोटीस दिली. जावक क्र. २६१/२०२६.
दिनांक- ३०/१०/२०२६, अहिल्यानगर

ॲड. महेश श्रीनिवास काबरा (बी.कॉम.,एल.एल.बी.)
संपर्क : सावेडी कार्यालय :- प्लॅट न. १०२, दर्शन छाया अपार्टमेंट, सावेडी, कुष्ठधाम रोड, अहिल्यानगर - ४१४००३,मो- ९४२२२२५४७५
www.bankguru.net

दैनंदिन मुव्ही-शो च्या वेळा खालील प्रमाणे
दिनांक : 23 ते 29 ऑक्टोबर 2026
टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात
SCREEN - 1
दशमी

03:00 PM 150/-
गांव थी गावकी..

12:00 Noon 150/-
प्रहार (हिंदी)

09:00 PM 150/-
सोहळा

06:00 PM 150/-
SCREEN - 2
रजनी : द जेलर २ (हिंदी)

12:00 Noon 150/- 09:00 150/-

03:00 150/-
कामकाज (मराठी)

06:00 PM 150/-
आशा स्क्वेअर
कॅन्टीन सुविधा अत्यल्प दरात उपलब्ध
कोतवाली पोलीस स्टेशन जवळ, माणिक चौक, अ.नगर

टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात
दिनांक : 30 ते 05 नोव्हेंबर 2026
रजनी : द जेलर २ (हिंदी)

09:00 AM 03:45 PM
12:30 PM 06:00 PM
02:45 PM 07:00 PM
09:15 PM 10:15 PM
उडता तीर (हिंदी)

09:00 AM 01:45 PM
11:00 AM 04:30 PM
10:00 PM
प्रहार (हिंदी)

10:00 AM 03:45 PM
09:45 PM
दृश्यम ३

11:45 PM
आदर्श कुटुंब हाऊस नं.४९ (तेलुगु)

06:45 AM

हनुमान वंश (हिंदी)
12:45 PM
Ahmednagar's First & Most Luxurious Cinematic Paradise !
- For Screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher*
- Offer Valid On Window Booking & Phone Booking
CONNPLEX SMART THEATRE
AVAILABLE ON bookmyshow
3rd Floor, Kohinoor Mall, Premdan Chowk, Savedi, A.Nagar Mo. 6353564618 / 7790094001

यंदाची सुवर्णखरेदी, भरघोस फायद्याची..
दिवाळी धमाका ऑफर
₹999/-* प्रतीग्रॅम मजुरी (22 कॅरेट सर्व दागिन्यांची)
+
₹111/-* चांदी चक्क फ्री (प्रतीग्रॅम सोने खरेदीवर)
सोनेखरेदीवर लकी ड्रॉ कुपनव्दारे 11 एलईडी टिव्ही (43") जिंकण्याची सुसंधी* (प्रती एक ग्रॅम एक लकी कुपन.)
ऑफर कालावधी - 11 ऑक्टोबर 2026 ते 30 डिसेंबर 2026 पर्यंत वैध
चंदुकाका ज्वेल्स™
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
बुधवार चालु
Conditions Apply*

यंदाच्या दिवाळीत, फक्त घर नाही...
नात्यांमधला प्रत्येक आवाजही उजळू द्या!
मोफत श्रवण तपासणी
ऐकू कमी येते का? मग ही सुवर्णसंधी तुमच्यासाठी!
श्रवण यंत्रावर 30 ते 50% पर्यंत सूट
शिबिर दिनांक: 2 ते 12 नोव्हेंबर 2026
वेळ: स.10 ते संध्या 7 पर्यंत
आजच Appointment Book करा
9371121210
NEUMA Hearing Aid & Speech Therapy Clinic — Your Hearing, Our Priority
न्यूमा हिअरिंग एड अँण्ड स्पीच थेरपी क्लिनीक

सातवे पुण्यस्मरण

असा एकही दिवस,
एकही क्षण
तुझ्या आठवणी
शिवाय गेला नाही.

भावपूर्ण श्रद्धांजली !

स्व. अक्षय शरद नरसाळे

स्वर्गवास दि. ३१.१०.२०१९

सदैव तुझ्या आठवणीत...
श्री. शरद नरसाळे । सौ. सुनीता शरद नरसाळे
श्री. धनवान दिघे । सौ. अदिती धनवान दिघे
नरसाळे, औटी, म्हस्के, बेरड, अकोलकर, भालसिंग व पिंपळे परिवार

एक कर्तृत्ववान लोकनेता...

अहिल्यानगर चे जेष्ठ नेते
आदरणीय स्व. भानुदासजी कोतकर साहेब
यांना भावपूर्ण श्रद्धांजली !

शोकाकुल :
आमदार संग्रामभैय्या जगताप व
सौ. वर्षा सुजित काकडे
(नगरसेविका अहिल्यानगर महानगरपालिका)
काकडे परिवार आणि प्रभाग क्र. १६ मधील समस्त नागरिक

भावपूर्ण श्रद्धांजली

ज्यांच्या आठवणी नेहमीच प्रेरणादायी राहतील, अशा महान आत्म्याला माझी नम्र श्रद्धांजली.

स्व.भानुदासजी कोतकर

- शोकाकुल -

श्री.दिपक काळे
श्री स्वामी समर्थ डेव्हलपर्स
समस्त काळे परिवार.

"तुम्ही आमच्यात नसलात तरी तुमचे विचार आणि प्रेम सदैव आमच्या मनात जिवंत राहील."

भावपूर्ण श्रद्धांजली

स्व.भानुदासजी कोतकर

- शोकाकुल -

श्री.सुरेश नामदेव लगड
श्री.नरेंद्र नामदेव लगड
आदेश कन्स्ट्रक्शन,लगड परिवार.